

# ।। वृक्ष मंदिर ।।

अनिल अनंत वाकणकर

# वृक्ष मंदिर

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

अनिल अनंत वाकणकर

# वृक्ष मंदिर

अनिल अनंत वाकणकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# वृक्ष मंदिर (सामाजिक कादंबरी)

अनिल अनंत वाकणकर

श्रीमंत पेशवे मार्ग, श्रीवर्धन, जिल्हा रायगड, ४०२११०.

मोबाईल क्रमांक:- ९०११८५७४१४

aawakankar@gmail.com

Mobile: 9011857414

ब्लॉग : https://aawakankar.blogspot.in/

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ५ जून २०१८  (विश्व पर्यावरण दिन)

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखकाचा परिचय

संपूर्ण नांव:- अनिल अनंत वाकणकर.



पत्ता:- श्रीमंत पेशवे मार्ग,

श्रीवर्धन, जिल्हा रायगड,

४०२११०.

मोबाईल क्रमांक:-
९०११८५७४१४

वाचना संबधी:- गेली जवळपास
४० वर्षे अनेक प्रकारची पुस्तके वाचली. त्यातल्यात्यात कांदबरी हा प्रकार जास्त आवडीचा. योगिनी जोगळेकर, वि. स. खांडेकर, बाबा कदम, रणजित देसाई हे लेखक जास्त आवडीचे. श्रीवर्धन येथे वाचनालयात उपलब्ध असणाऱ्या जवळपास सर्वच कादंबऱ्या वाचल्या आहेत. या शिवाय समर्थ रामदास स्वामींचे सर्व वाङ्मय, प. पू. पांडुरंग शास्त्री आठवले याची प्रवचने या अंगाचे वाचनही आवडीचे आहे.

स्वत:चे लेखन:- समर्थ रामदास स्वामींनी याला किर्तन भक्ती असे नांव दिले आहे. आपण जे जे वाचले आहे त्यातले जे आकलन झाले ते स्वत:जवळ न ठेवता दुसऱ्याला सांगणे ही एकप्रकारची किर्तन भक्तीच आहे. माझे आतापर्यंत कोणतेही साहित्य प्रकाशित झाले नाही. तरीही मी एक प्रवास वर्णन, तिन कथा आणि एक लघु कादंबरी लिहीली आहे. हे सर्व साहित्य माझ्या https://aawakankar.blogspot.in/

या ब्लॉगवर उपलब्ध आहे.

## प्रास्ताविक

वृक्ष मंदिर या लघु कादंबरीचा विषय गेले जवळपास १५ ते २० वर्षे माझ्या डोक्यात घोळत होता. ज्यावेळी महाराष्ट्र सरकारने सामाजिक वनिकरण हे खाते निर्माण केले तेव्हापासुन ही कथा माझ्या मनात आकार घेत होती. गेली अनेक वर्षे मी समर्थ साहित्याचा अभ्यास करीत आहे. त्याचप्रमाणे प.पू. पांडुरंगशास्त्री आठवले प्रेणित स्वाध्याय परिवाराच्या स्वाध्यायाला जात असे. स्वाध्याय परिवारा तर्फे योगेश्वर शेती त्याचप्रमाणे मत्स्यगंधा हे प्रयोग प्रत्यक्षात राबलेले मी प्रत्यक्ष पाहिले आहेत. आपल्या पारंपारीक एकादशीव्रताचा समाजाच्या दृष्टीने उपयोगी उपक्रम स्वाध्याय परिवारा तर्फे राबवले जातात.

समर्थ रामदासस्वामी हे तर निसर्गप्रेमीच होते. रानावनात रमणारे योगी होते. त्याचे बागप्रकरण तर प्रसिद्धच आहे. तुकाराम महाराजांचे वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे हा अभंगही प्रसिद्धच आहे. या सर्वामधुन प्रेरणा घेऊन वृक्ष मंदिर ही लघुकादंबरी साकारली आहे. कितपत जमली आहे ते वाचकच सांगतिल. पर्यावरण रक्षण, बेकारी आणि व्यसनाधिनता यावर वृक्ष मंदिरासारखे उपक्रम निर्माण झाले तर माझ्या या लेखनाचे सार्थक झाले असे मला वाटेल.

श्रीवर्धन

दिनांक

अनिल अनंत वाकणकर.

समर्थकृपेने घडलेली हीकीर्तनभक्ती

समर्थचरणी अर्पित.

अनिल अनंत वाकणकर

ई साहित्य प्रतिष्ठानची इतर काही प्रकाशने

दासबोध खंड १ ते ५

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dasbodh_khand_1.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dasbodh_khand_2.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dasbodh_khand_3.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dasbodh_khand_4.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dasbodh_khand5.pdf

मनाचे श्लोक

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/manache_shlok_ebook.pdf

श्री रामदास स्वामींचे चरित्र


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/jjrs_an.pdf


याशिवाय सर्व मराठी संतांच्या सर्व अभंगगाथा, ज्ञानेश्वरी, रामायण, महाभारत, गीतारहस्य आणि अशाच असंख्य अध्यात्मिक साहित्याची खाण म्हणजे


www.esahity.com

येथील सर्व पुस्तके विनामूल्य असतात.



संत चोखामेळा अभंगगाथा



गीतारहस्य शताब्दी वर्ष
खंड पहिला
श्रीमद्भगवद्गीतारहस्य
अथवा कर्मयोगशास्त्र
बाळ गंगाधर टिळक


तुका झालासे कळस
खंड ४


ग्रंथराज
दासबोध
खंड पहिला


ऋग्वेद
प्रथम मंडल


जय जय रघुवीर समर्थ !
लेखक
अविनाश महादेव नगरकर


संत नामदेव गाथा
खंड पहिला


मना सज्जना

# ।। वृक्ष मंदिर ।।

लेखक

अनिल अनंत वाकणकर, श्रीमंत पेशवे मार्ग, श्रीवर्धन, जिल्हा रायगड.

# १

**शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे । वसिष्टापरी ज्ञान योगेश्वराचे ।।**

**कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा । नमस्कार माझा सद्‌गुरु रामदासा ।।**

**जSय जSSय रघुवीSर समर्थ।।**

माई भिक्षा वाढा!! असा खणखणित पुकारा करीत तो दारात उभा राहिला. स्वच्छ पांढरा लेंगा, त्यावर स्वच्छ पांढरा नेहरु शर्ट, डोक्यावर स्वच्छ पांढरी टोपी, काखेत शबनमसारखी पिशवी अडकवलेल्या त्या भिक्षेकऱ्याने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. साधारण ४५ ते ५० वयाचा वाटणारा तो भिक्षेकरी चेहऱ्यावरून तरी चांगल्या सुखवस्तु घरातला वाटत होता. जरी त्याची दाढी वाढलेली होती तरी ती अस्ताव्यस्त दिसत नव्हती. अशा व्यक्तिमत्वाचा माणूस भिक्षा मागतोय हे पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटत होते.

त्याच्याकडे बघून लोक चर्चा करत होती. कोणी म्हणत होते नवस म्हणून भिक्षा मागत असेल! कोणी म्हणत होते कुठल्यातरी संस्थेच्या मदतीकरीता भिक्षा मागत असेल! परंतु तो मात्र या कोणत्याही कोलाहलाकडे लक्ष न देता नि:संकोचपणाने घरातल्या गृहीणीला भिक्षा वाढण्याचे आवाहन करत होता. तेवढ्यांत त्या घरांतील गृहिणी सुपात भिक्षा म्हणून धान्य घेऊन आली. तेव्हा त्याने माई मला धान्य नको काही शिळपाकं असले तरी शिजवलेले अन्न द्या म्हणून विनवणी केली. नंतर तिने आणलेल्या भिक्षेतली थोडीशीच स्विकारून उरलेली नम्रपणाने परत केली. अशा तऱ्हेने पांच घरी भिक्षा मागून गोळा झालेले अन्न घेऊन तो गावाबाहेर असलेल्या मारुतीच्या देवळाकडे निघाला. त्याच्या पाठोपाठ गावातली बच्चे कंपनीदेखील तो

काय करतोय ते बघायला धावली. मात्र तो मारुतीच्या देवळात शिरताच दूर उभी राहून तो काय करतोय याचे निरीक्षण करु लागली.

मारुतीच्या देवळात शिरताच त्याने आपल्या खांद्यावरची शबनम तेथील ओवरीत असलेल्या खुंटीला अडकवली आणि आजुबाजुचे निरिक्षण करु लागला. मारुतीच्या देवळाच्या परिसरांत सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरलेले होते. तिथेच एका कोपऱ्यांत सिगारेट विड्यांची थोटके, काड्यापेटीच्या अर्धवट जळालेल्या काड्यांचा ढीग पडला होता. लगेचच त्याने मंदिराच्या परिसरांतच असलेल्या निर्गुडीच्या झुडुपांच्या फांद्या मोडून घेतल्या आणि त्यांच्या सहाय्याने मंदिराचे सर्व आवार लख्ख करून टाकले. या सर्व कामाला त्याला जवळ जवळ दिड तास लागला.

नंतर त्याने स्वत:कडे बघितले. आपला अगदी अवतार झाला आहे हे त्याच्या लक्षांत आले, सगळे कपडे धुळीने माखले होते. क्षणभर विचार करून त्याने आपला झब्बा, लेंगा आणि टोपी काढून आपल्या शबनम मध्ये ठेवले आणि आतल्या हाफपँट आणि बनियनवर तो नदीवर गेला. तेथे नदीत बुडी मारून स्वच्छ आंघोळ केली. येताना ओलेत्यानेच आपल्या हातात नेलेला तांब्या भरून आणला. येतायेताच कुंपणीला असलेल्या पांढऱ्या चाफ्याची फुले काढून आणली. आणि त्यांच्या सहाय्याने मारुतीची मनोभावे पूजा केली.

मारुतीची पूजा करून झाल्यावर आपल्या शबनम मधून आणलेली भिक्षा बाहेर काढली. त्या अन्नाचा मारुतीला नैवेद्य दाखवला. नंतर त्यातला थोडा भाग नदीमध्ये माशांना खायला घातला, थोडा भाग कावळयांना काढून ठेवला आणि उरलेले अन्न घेऊन आपले भोजन केले. भोजन होताच भोजन केलेली जागा साफ केली. त्यानंतर आपल्या बरोबर आणलेली सतरंजी अंथरली आणि थोडावेळ वामकुक्षी करु लागला.

*******

रोजच्या सवयीप्रमाणे गणा, हेरंब, जितू आणि हेमंत या चौकडीने दिवस मावळताच आपला मोर्चा मारुतीच्या देवळाकडे वळवला. मारुतीच्या देवळाच्या कोपऱ्यामध्ये पत्ते कुटत बसणे हा त्या चौकडीचा रोजचा उद्योग होता. खरं म्हणजे दिवसातले १०-१२ तास त्यांचा वेळ या मंदिरात सिगारेटी आणि विड्या फुंकत रमी खेळत बसणे यात जायचा. आज गणाच्या मामाचे वर्षश्राद्ध होते म्हणून ते सर्वजण शेजारच्या वडवली गावात गेले होते. त्यामुळे आज त्यांच्या या कार्यक्रमात खंड पडला होता. तरीपण संध्याकाळी घरी येताच घरचे ढोरा गुरांचे काम मार्गी लाऊन त्यांनी आपला मोर्चा मारुती मंदिराकडे वळविला होता.

आत्ता संध्याकाळचे सहा साडेसहा वाजले असतील. नुकताच सूर्य मावळला होता. अजुन थोडा संधीप्रकाश बाकी होता. ते चौघेजण नेहमीच्या सवयीप्रमाणे विड्या ओढत गप्पा मारत देवळाकडे येत होते. देवळापासून १००-२०० फुटावर आल्यावर तिथे त्यांना काहितरी चुकतेय असे जाणवत होते.

जितू गणाला म्हणाला, काय रे गणा! आपण आज जागा चुकलोय काय? आपल्या देवळाचा परिसर एवढा चकाचक कसा काय दिसतोय ?

खरचं की रे गड्या! आपण गेली दोन चार वर्ष इथं येतोय पण मंदिर एवढे लख्ख फक्त मारुतीच्या जत्रेलाच बघतो! हे काहीतरी वेगळंच झालंय!!, गणाने आपला रिप्लाय दिला.

बोलत बोलत ते चौघजण पुढे आले तो त्यांना दिसले की, एक माणूस जागोजागी गोळा केलेल्या पाला पाचोळयाच्या ढीगांना पेटवीत आहे. तिथे असे

सात आठ कचऱ्याचे ढीग केलेले दिसत होते. ते बघून अचंब्याने ते चौघेजण जागेवरच थांबले. सर्व ढीग जवळजवळ जळालेच होते, ते बघीतल्यावर तो माणूस मागे वळला आणि देवळात निघून गेला. देवळातून हातात काहीतरी घेऊन तो माणूस परत बाहेर पडला आणि नदीकडे निघून गेला. त्यानंतर ते चौघेजण देवळात आपल्या नेहमीच्या कोपऱ्याकडे गेले. त्यांनी देवळात सगळीकडे पाहीले तो तेथेही सर्व लखलखित केलेले दिसत होते. कुठेही धुळ आणि काडी कचऱ्याचे नामोनिशाण दिसत नव्हते. तिथेच खुंटीला शबनम लावलेली दिसत होती. जवळच खिडकीमध्ये सतरंजीची घडी ठेवलेली दिसत होती.

एकंदरित असे सगळे वातावरण पाहून त्यांना आपल्या तोंडात असलेल्या विडीची लाज वाटायला लागली आणि त्यांनी आपल्या तोंडातली विडी जवळच जळत असलेल्या कचऱ्याच्या ढिगात टाकून दिली. एकंदरीतच या बदललेल्या वातावरणाने त्यांची विचारशक्ती कुंठीत झालेली होती. आपण येथे कशाला आलो आहोत याचाच त्यांना विसर पडला होता.

त्यातून पहिला भानावर आला तो हेमंत, तो म्हणाला चला! असे विचार करत काय राहिलात! आपली रोजची वेळ झाली आहे! रमीचे चार डाव टाकू आणि मग घरी जाऊ. असे म्हणून त्याने खिशातून पत्याचा कॅट काढला आणि कोपऱ्यातल्या ट्यूब लाईटचे बटण दाबले. लगेचच खाली बसून त्याने पत्ते पिसून चौघांना वाटले. मग बाकीचे तिघेपण पत्ते खेळायला बसले. बोलता बोलता हेरंबने आपल्या खिशातून विडीचे बंडल काढले, त्यातली विडी काढून तोंडात धरली आणि गणाकडे माचीसकरता हात पुढे केला. गणाने आपल्या खिशातली माचीस काढली आणि त्यातली काडी ओढून हेरंबची विडी पेटवली. हेरंब पाठोपाठ सर्वांनी आपापल्या विड्या शिलगावल्या आणि आपापले पत्ते उचलून रमीचा डाव खेळायला सुरवात केली.

त्यांचा जेमतेम एक डाव पुरा होतोय तो मघाचाच माणूस मंदिराच्या दारातून आत येताना दिसला. त्याच्या खांद्यावर धुतलेल्या कपड्यांचे पिळे आणि हातात पाण्याने भरलेला तांब्या दिसत होता. आत आल्या आल्या त्याने देवळातले स्विचबोर्ड शोधून गाभाऱ्यातली ट्यूब लाईट लावली. नंतर आपल्या शबनम मधून धुपाची पुडी काढली आणि बाहेर जाऊन मघाशी पेटवलेल्या पाचोळयाच्या ढिगातून जे थोडे निखारे होते ते तिथल्याच एका खापरामध्ये गोळा करून घेतले. ते निखारे घेऊन तो  देवळात परत आला आणि त्या धगधगत्या निखाऱ्यांवर हातातल्या पुडीतला धूप घातला. धूप घातल्याबरोबर तो गाभारा त्या धुपाच्या सुगंधित धुराने भरून गेला. मग त्याने गाभाऱ्यातल्या कोनाड्यामध्ये असणाऱ्या दगडी समईमधील वात सरशी केली आणि तिची काजळी झटकली. त्यामुळे ती समईची ज्योत चांगला प्रकाश द्यायला लागली.

अशाप्रकारे देवळातली दिवा बत्ती होताच त्याने मारुतीच्या मूर्ती समोरच बैठक मारली आणि तोंडाने आपल्या खणखणित आणि स्वच्छ सुरात मारुतीस्तोत्र म्हणायला सुरवात केली.

भिमरुपी महारुद्रा, वज्र हनुमान मारुती

वनारी अंजनीसुता रामदूता प्रभंजना............

भिमरुपी म्हणून झाल्यावर त्याने रामरक्षा स्तोत्र असेच खणखणित आणि स्पष्ट शब्दात म्हणायला सुरवात केली. लांबून ऐकणारालाही त्यातला शब्द अन् शब्द अगदी स्पष्ट ऐकायला येत होता.

देवासमोर पद्मासन घालून बसलेल्या त्या गृहस्थाचे धीर गंभीर आवाजातील ते पठण ऐकून देवळाच्या कोपऱ्यांत बसून रमी खेळणारी चौकडी एकदम स्तब्ध झाली. त्यांच्या नकळत त्यांच्या हातातले पत्ते गळून पडले. झटका बसल्याप्रमाणे

आपल्या तोंडातल्या विड्या त्यांनी मघाचच्या शेकोटीत फेकून दिल्या आणि हात जोडून त्या अनोळखी गृहस्थाचे पठण ऐकू लागले.

रामरक्षेचे पठण संपताच त्याने रामदासांची करुणाष्टके म्हणायला सुरवात केली.

अनुदिनी अनुतापे तापलो रामराया ।

परमदीनदयाळा नीरसी मोहमाया ।।

अचपळ मन माझे नावरे आवरीता ।

तुजवीण सीण होSतो धावSSरे धावSS आताSS......

अतिशय करुण आणि आर्त अशा कंपायमान होणाऱ्या आवाजात म्हटल्या जाणाऱ्या त्या करुणाष्टकांचे स्वर कानावर पडताच त्या चौघांना आपले सगळे अपराध आपल्याच भोवती फेर धरून नाचतायत असा भास व्हायला लागला. समर्थ रामदासस्वामींच्या या प्रासादिक रचना आणि त्या म्हणणाऱ्याचा अतिशय करुणामय आवाज यामुळे ते चौघेही पाण्यातल्या ढेकळासारखे विरघळु लागले.

इकडे करुणामय आवाजात ते गृहस्थ म्हणत होते..........

जळत ह्लदय माझे जन्म कोट्यानुकोटी ।

मजवरी करुणेचा राघवा पुर लोटी।।

शेवटी त्यांनी देवा जवळ आपले मागणे सुरु केले........

युक्ति नाऽही बुद्धि नाऽही । विद्या नाऽही विवेकिता ।

नेणता भक्त मी तुझा । बुद्धि देऽऽऽ रघुनायका ॥१॥

मन हे आवरेना की । वासना वावडे सदा ।

कल्पना धावते सैरा । बुद्धि देsss रघुनायका ॥२॥

अन्न नाही वस्त्र नाही । सौख्य नाही जनांमध्ये ।

आश्रयो पाहतां नाही । बुद्धि देsss रघुनायका ॥३॥

अशाप्रकारे परमेश्वराकडे दीन होऊन मागणे मागून शेवटी शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे........... हे आठही श्लोक म्हणून त्यांनी बसल्या जागेवरच क्षणभर ध्यान लावले.

त्या गृहस्थांच्या या सर्व कृतींचे साक्षीदार असलेले ते चौघे एव्हाना पश्चातापदग्ध अशा अवस्थेत हात जोडून त्यांच्या पाठीमागे गाभाऱ्यात येऊन ऊभे राहिले होते. त्या गृहस्थांनी डोळे उघडताच त्या चौघांनीही त्याच्या पायावर आपले डोके टेकले आणि एकदम म्हणाले, “बुवाss आम्हाला क्षमा करा!”

अरेssरे आपण कोण? आणि माझी क्षमा मागण्यासारखे तुम्ही काही केले आहे असे मला वाटत नाही. कदाचित माझ्याच मोठ्या आवाजातील पठणाने आपल्याला त्रास झाला असेल, त्याबद्दल आपण लोकांनीच मला क्षमा केली पाहीजे.

बुवाss! असे बोलून तुम्ही आम्हाला आणखी लाजवु नका. चौघेही एका सुरात म्हणाले. आम्हीच पापी आहोत, देवाच्या दारात बसून चार चांगल्या गोष्टी करायच्या सोडून आम्ही जुगार खेळत, विड्या फुंकत बसतो. त्याबद्दल देवदेखील आम्हाला क्षमा करणार नाही. एका दमात गणा एवढे बोलला. त्यानंतर त्याला इतके गदगदुन आले की, त्याचे डोळे पाण्याने भरून आले आणि चेहरा सद्गदित झाला.

अरे! तुम्ही असे कां म्हणता!! ईश्वर हा तर पतितांना पावन करणारा आहे. ज्याला ज्याला आपल्या वाईट वर्तनाबद्दल पश्चाताप वाटतो आणि ज्याला आपल्याकडून झालेल्या दुर्वर्तनाचे परिमार्जन आपल्या वर्तणूकीने करायचे आहे, त्याला देव क्षमा तर करतोच परंतु त्याला त्याच्या चांगल्या कार्यामध्ये मदत सुद्धा करतो.

बुवा! तुमच्या रुपाने देवच आम्हाला आशिर्वाद देतोय, आश्वासन देतोय असे वाटते, जितू म्हणाला.

हे बघा पहिली गोष्ट म्हणजे मी कोणी बुवा वगैरे नाही. किंबहूना बुवा आणि बुवाबाजीची मला अतिशय चीड आहे. मी साधा माणूस आहे. निसर्गाच्या चमत्काराचा फार मोठा फटका बसल्याने मी मनाने खचून भरकटलेल्या अवस्थेत फिरत होतो. ईश्वराची कृपा म्हणून मी त्या अवस्थेत सज्जनगडावर पोचलो. समर्थांच्या सहवासात राहिल्याने माझ्यावर झालेल्या जीवघेण्या घावाची वेदना कमी झाली. माझे मन स्थिर झाले. माझ्या मनाला तेथे विश्रांती मिळाली. परंतु तेथेही नुसते बसून रहाणे मनाला पटले नाही. म्हणून काही काळ तेथे वास्तव्य केल्यावर समर्थांची आज्ञा घेऊन सज्जनगड सोडला. पाठीमागे कोणताही पाश राहिला नाही म्हणून सध्या निर्हेतुक गावोगाव फिरतो आहे.

आज सकाळी या रस्त्याने जात होतो. गाव बरा वाटला म्हणून विचार केला चार दिवस या गावात काढु. अर्थात तुमच्या गावातील लोकांनी परवानगी दिली तरच ते शक्य आहे.

असं का म्हणता बुवा! अहो आम्ही गावातले लोक पैशाने गरीब असू पण मनाने श्रीमंत आहोत. तुम्ही आमच्या घरी रहायला चला! असे म्हणून हेमंतने त्यांचे पाय धरले.

हे बघ, काय तुझे नांव ? त्या बुवांनी विचारले.

जी, माझे नांव हेमंत आहे.

तर हे बघ हेमंत, तुम्ही लोक परत परत बुवा म्हणू नका. खरोखरच मला त्या शब्दाची अतिशय चीड आहे. या बुवाबाजीनेच आपल्या समाजाचे वाटोळे केले आहे. ही बुवाबाजीची कीड जेव्हा आपल्या देशांतून जाईल तेव्हाच आपला देश, आपला समाज सुखी होईल. आणि सगळ्या क्षेत्रांत अग्रेसर होईल. तेव्हा तुम्ही मला फारतर काका म्हणा.

बरं ठिक आहे, आम्ही तुम्हाला काकाच म्हणू. तेव्हा आता अनमान न करता आमच्या घरी रहायला चला.

हे बघ हेमंत! मी जेव्हा सज्जनगडावरून बाहेर पडलो तेव्हा समर्थांच्या पायाजवळ एक निश्चय केला आहे. आता यापुढे कोणाच्या घरी रहायचे नाही, भिक्षा मागून त्यावरच उदरनिर्वाह करायचा. आजच्या काळात हे विसंगत आहे पण तरीही समर्थचरणाजवळ मी जो निश्चय केलाय तो कायम आहे. तेव्हा मी कोणाच्याही घरी येणार नाही हे माझे वज्रवाक्य आहे.

अहो काका! पण भिक्षा तर दिवसातून एकदाच मागतात. मग दिवसभर तुमचे कसे होईल? दिवसातून एकदा भिक्षा मागून मिळालेल्या अन्नावर पुरा दिवस काढायचा या नुसत्या कल्पनेनेच कासाविस झालेल्या हेरंबने विचारले. आम्ही सकाळी चहा, नंतर नाश्ता, दुपारी नाश्ता, दोनवेळा जेवण शिवाय दिवसातून असंख्यवेळा चहा पितो तरीही आमची केव्हाही कुठेही खायची तयारी असते.

अरे! नांव काय तुझे? तुमचे वय खाण्याचे आणि बलवान होण्याचे आहे. तेव्हा तुम्हाला भूक लागणारच. परंतु माझे तसे नाही. माझे आता अर्धे आयुष्य संपले आहे. त्यातच गेली अनेक वर्षे अनेक प्रकारची संकटे सोसल्याने माझी जगण्याची इच्छाच नाहीशी झालेली आहे. त्यामुळे देहधारणेपुरते अन्न मिळाले म्हणजे पुरते. तसाही माझ्या वयाच्या माणसांना मिताहारच योग्य आहे.

काका! आता आम्ही आमची ओळखच करून देतो. मी हेरंब, मी १२वी पर्यंत शिक्षण झाल्यावर दापोलीच्या कोंकण कृषी विद्यापिठातून डिग्री घेतली आहे. माझ्या घरी माझे आई वडील, धाकटी बहिण, आणि मोठा भाऊ असतो. माझा भाऊ शेजारच्या गावांत शिक्षक आहे. घरी पोटापुरती शेती आहे.

काका! मी गणा, माझे नांव गणेश असे आहे. परंतु सर्वजण मला गणा असेच म्हणतात. मी पण १२वी झाल्यावर तिकडे लांब भंडाऱ्याला जाऊन माझ्या आवडीचा सोशल फॉरेस्ट्रीचा कोर्स केलाय. त्यात मी पण डिग्री केली आहे. परंतु त्या कोर्सला बाजारात कोठे किंमत नाही म्हणून सध्या बेकार आहे. घरी आई वडिल आणि धाकटा भाऊ असतो. मोठ्या बहिणीचे लग्न होऊन ती इथून थोड्या अंतरावर असलेल्या गावात असते. घरी थोडीफार शेती आहे. वडील पौराहित्य करतात. आमच्याकडे या गावची ग्रामदेवता सोमजाई उपाध्येपण आहे.

काका! मी जितू म्हणजेच जितेंद्र. मी बारावी पर्यंत शिकलो. नंतर घरीच असतो. गावात आमचे कपड्याचे दुकान आहे. माझ्या घरी माझे आई वडिल, मोठा भाऊ असतात. माझे वडिल आणि भाऊ दुकान बघतात, त्यांचे आणि माझे पटत नाही म्हणून ते मला दुकानात येऊन देत नाहीत.

काका! मी हेमंत मीदेखील १२वी नंतर बी. कॉम केले परंतु कुठे नोकरी मिळत नाही म्हणून बेकार आहे. आमच्या घरांत मी मधलाच आहे. माझा मोठा भाऊ

तलाठी आहे आणि लहान भाऊ ग्रामसेवक आहे. बहिण लग्न होऊन सासरी गेली आहे.

अशाप्रकारे आम्ही चौघेही शिक्षण असूनही बेकार आहोत. काही कमवत नसल्याने गावाच्या दृष्टीने उडाणटप्पु आहोत. त्यामुळे आम्हाला घरांतही फारशी किंमत नाही. त्यामुळेच आम्ही टाईमपास म्हणून दिवसभर गावापासून लांब असलेल्या या मारुती मंदिरात रमी खेळत बसतो. तुम्हाला पाहिले आणि आम्ही काहितरी चुकीचे वागत आहोत हे आमच्या लक्षांत आले. आमच्या घरी आम्ही कधीही आलो गेलो तरी कोणी आम्हाला विचारत नाही. सगळयांनी आम्हाला वाळीत टाकल्यासारखे केलेले आहे.

तुम्ही सर्वांनी मला आपली ओळख करून दिलीत, माझ्यासारख्या अनोळखी माणसाजवळ आपले मन मोकळे केलेत, माझ्यावर दाखवलेल्या या विश्वासाबद्दल खरोखरच धन्यवाद. तुम्ही प्रत्येकाने मला आपापल्या घरी रहायला यायचे मनापासून निमंत्रण दिलेत याचे मला खूप कौतुक वाटते. तुमचे निमंत्रण मी स्विकारले आहे. मी जरी तुमच्या घरी रहायला आलो नाही तरी तुमच्या घरी भिक्षेला नक्की येईन.

तुम्हाला तुमच्या वाईट कृत्याबद्दल झालेला पश्चाताप या मारुतीरायाने ऐकला आहे. तो तुम्हाला क्षमा करून योग्य तो मार्ग निश्चितच दाखविल. आता इथून पुढे तुम्ही घरच्या लोकांबद्दल कटुता न बाळगता त्यांना जास्तीत जास्त मदत करण्याचे धोरण ठेवा. त्याचप्रमाणे जास्तीत जास्त सत्कृत्य करण्याचा प्रयत्न करा. तो राम तुम्हाला सहाय्य करेल. समर्थांनी म्हटलेच आहे, “केल्याने होत आहे, आधी केलेची पाहिजे!”

बरे आता बोलता बोलता खूप वेळ गेला आहे. रात्र होऊ लागली आहे, तेव्हा तुम्ही आपापल्या घरी जा पाहू.

पण काका तुम्ही आता रात्री खाणार काय? भिक्षा तर सकाळीच संपली असेल! हेरंब म्हणाला.

नाही, माझा काही खाण्या पिण्याचा प्रश्नच नाही, मी दिवसातून एकदाच खातो. त्यामुळे त्याची तुम्हाला चिंता नको.

मग काका मी घरनं ग्लासभर दूध आणतो, ते तरी घ्या. आणि आम्ही चौघेही रात्री झोपायला इथेच येतो, येताना तुम्हाला अंथरुण पांघरुण आणतो.

ठिक आह!, दूध वगैरे काही आणू नको, मी ते घेणार नाही. तुम्ही झोपायला येत असलात तर या. मंदिर तुमचेच आहे. अंथरुण पांघरुण वगैरे काही नको. एखादी जुनी घोंगडी आणली तरी चालेल.

# २

पहाटेचे चार वाजताच आपले काका म्हणजेच काल मारुती मंदिरात उतरलेला तो पांथस्थ आपल्या अंथरुणातून ऊठले. अंथरुण म्हणजे अर्थातच गणाने आपल्या घरून आणलेली जुनी घोंगडी त्यावर काकांनी आपली सतरंजी पसरली होती. अंथरुणातून उठताच त्यांनी आपल्या अंथरुणाची व्यवस्थित घडी करून ठेवली. अंथरुणात बसूनच कराग्रे वसते लक्ष्मी.... आणि समुद्र वसने देवी ही प्रार्थना म्हटली. त्यांनी बाहेर पाहिले तर फारसा उजेड नव्हता पण काळोखही नव्हता. तसेच ते मंदिरा बाहेर पडले आणि नदीच्या दिशेने निघाले. नदीवर आपले मुखमार्जन करून तेथेच आडोशाला आपले प्रातर्विधी उरकून ते परत मारुती मंदिरात आले. मंदिरात आल्या आल्या त्यांनी काल तोडलेल्या निर्गुडीच्या फांद्याचा छोटासा झाडु बनवला. त्या झाडुच्या सहाय्याने त्यांनी मंदिराचे सर्व आवार लख्ख झाडून काढले.

तिथपर्यंत बऱ्यापैकी दिसायला लागले होते. मग त्यांनी मंदिरामधील केरकचरा काढायला सुरवात केली. त्यांच्या या वावराने आपल्या चौकडीला जाग आली. बघतात तो काकांनी मंदिराचे आवार पूर्णपणे स्वच्छ केले होते. आता त्यांनी मंदिरातील साफसफाईला सुरवात केलेली होती. ते बघून गणा पुढे झाला व काकांच्या हातातला झाडू घ्यायला लागला. तेव्हा त्यांनी त्याला सांगितले तुम्ही आता इथे थांबण्याच्याऐवजी आपापल्या घरी जाऊन घरातल्या मंडळींना मदत करा.

काकांच्या सांगण्याप्रमाणे ते चौघे आपापल्या घरी गेले. इकडे आपल्या काकांनी मंदिराची झाडझुड पुरी होताच नदीवर जाऊन स्नान केले. येताना कालच्याप्रमाणेच पाण्याचा तांब्या भरून आणला. मग मारुतीरायाची पूजा करून ते सभामंडपात

आले. तेथे घोंगडीची घडी अंथरून त्यावर पद्मासन घालून ते बसले. मग सज्जनगडा वरील प्रथेप्रमाणे काकड आरती केली.

तिथपर्यंत सूर्योदय झाला होता. आजुबाजुचे वातावरण एकदम प्रसन्न झालेले दिसत होते. त्यांनी मग प्रभात समयी म्हणावयाचे मनाचे श्लोक म्हणायला सुरवात केली.

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा। मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा॥

नमूं शारदा मूळ चत्वार वाचा। गमूं पंथ आनंत या राघवाचा॥१॥

मना सज्जना भक्तिपंथेचि जावें। तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें॥

जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें। जनीं वंद्य ते सर्व भावे करावे॥२॥

प्रभाते मनी राम चिंतीत जावा। पुढे वैखरी राम आधी वदावा॥

सदाचार हा थोर सांडूं नये तो। जनीं तोचि तो मानवी धन्य होतो॥३॥

ते प्रासादिक आवाजात म्हणत असलेल्या या श्लोकांनी त्या परिसरातले वातावरण एकदम भक्तिमय झाले. शिवाय सूर्योदयाची वेळ असल्याने वातावरणही एकदम शांत होते. त्या शांत वातावरणांत त्यांचा खडा, पण भक्तिपूर्ण आवाज खूप दूर पर्यंत ऐकायला येत होता.

सुर्योदयाच्या वेळी स्वच्छ, प्रासादिक आणि धीर गंभीर सुरांमध्ये ऐकायला येणाऱ्या मनाच्या श्लोकांच्या आवाजाने सकाळीच प्रभात फेरीला बाहेर पडलेल्या हंबीररावांचे कान तृप्त झाले. इतका सुरेल आणि प्रासादिक स्वर त्यांनी यापूर्वी फक्त एकदाच ऐकला होता. पांच वर्षापूर्वी ते आपल्या पत्नीसह सज्जनगडावर गेले होते. तिथे त्यांनी गडावर होणाऱ्या काकड आरती पासून रात्री शेजारती पर्यंत होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमाला मोठ्या भक्ति भावाने हजेरी लावली होती. त्यावेळचे तिथले

प्रत्येक कार्यक्रमातले पठण त्यांनी आपल्या मनांत साठवुन ठेवले होते. तिथे ऐकलेला आणि तसाच स्वर आपल्या गावांत ऐकून त्यांना खूपच आनंद झाला.

रोज सकाळी चार मैल पायी फिरण्याचा त्यांचा नित्यक्रम होता. त्यानिमित्ताने गावाच्या परिसरांत घडणारे बदल त्यांच्या लक्षांत येत असत. आता ते आपला फेरफटका मारून परत फिरले होते. आपल्या गावाच्या वेशीत शिरताच त्यांना हे मनाच्या श्लोकांचे स्वर ऐकायला आले होते. त्या स्वरांची त्यांना एवढी मोहिनी पडली की, ते त्या स्वराचा मागोवा घेत घेत मारुती मंदिरात कसे आले ते त्यांनाच कळले नाही.

आत येऊन बघतात तो कमरेभोवती पंचा गुंडाळलेला उघडाबंब असा एक गृहस्थ, साध्यासुध्या जुन्या घोंगडीवर पद्मासन घालून डोळे बंद करून बसलेला आहे. तोंडाने “प्रभाते मनी राम चिंतीत जावा” या श्लोकांचे पठण चालले आहे. त्या माणसाला आजुबाजुला काय चालले आहे याची काहीही फिकीर दिसत नव्हती आणि त्याला त्याची शुद्ध आहे असेही जाणवत नव्हते. त्याचे आपले चालूच होते.....

घनश्याम हा राम लावण्यरुपी। महाधीर गंभीर पूर्णप्रतापी॥

करी संकटीं सेवकांचा कुडावा। प्रभाते मनी राम चिंतीत जावा॥६७॥

त्या अनोळखी गृहस्थाचे चाललेले अखंड पठण ऐकत हंबीररावही त्यात तल्लीन होऊन तिथेच जमिनीवर बसून राहिले. त्यांचीही ते श्लोक ऐकता ऐकता जणू समाधी लागली होती. मनाच्या श्लोकांचे पठण संपल्यावरदेखील काहीवेळ जणू तेच स्वर वातावरणांत भरून राहिले होते. क्षणभराने प्रथम भानावर आले ते हंबीरराव.

मग ते हात जोडून त्या गृहस्थांच्या समोर उभे राहिले व म्हणाले, राम राम महाराज! सकाळच्या रामप्रहरी आपल्या या श्लोकांच्या श्रवणाने कान आणि मन

अगदी तृप्त झाले. अशाप्रकारचे श्रवण मला एकदाच झाले होते. आपल्या या स्वरांनी मला येथे खेचून आणले. आपले मनापासून धन्यवाद. आपल्यामुळे मला एक दिव्य अनुभव मिळाला.

आपण या गावात नविन दिसता. आपली पाय माझ्या झोपडीला लागावेत अशी माझी इच्छा आहे. तेव्हा महाराज आपण माझ्या कडे याल कां?

त्यावर त्या गृहस्थांनी म्हणजे आपल्या काकांनी, जशी समर्थांची इच्छा! असे म्हणून संमती दर्शवली.

*******

हंबीरराव हे हनुमानवाडीचे सरपंच आहेत. हनुमानवाडी हे गांव शहरवजा खेडे आहे. हे गांव सिंधुदुर्ग आणि कोल्हापुर जिल्हा यांच्या सिमेवर परंतु सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आहे. हनुमानवाडी ही खेर्डी या मुख्य गावाची एक वाडी आहे. हनुमानवाडीची वस्ती सुमारे पांच हजार आहे. ही वाडी आजुबाजुच्या पंचक्रोशी करिता बाझारपेठेचे गांव आहे. गावात सर्व जाती जमातिचे लोक गुण्यागोविंदाने रहात आहेत. अर्थात येथे व्यसनी लोकही बरेच आहेत. तरीही गावात कुठलीही तेढ नाही. गावातले सगळेच लोक हंबीररावांना मानतात. अर्थात हंबीररावांचे व्यक्तिमत्वच तसे आहे. त्यांच्या तरुणपणी त्यांनी कुस्त्यांचे फड गाजवले होते. हंबीरराव हे दिसायला गोरेपान आणि रुबाबदार आहेत. ते स्वभावानेही दिलदार आहेत. कोणी अडला नडला तर त्याला ते सदैव आपलेपणाने मदत करीत असतात.

हंबीरराव जसे उदार, दिलदार होते तसेच धार्मिकदेखील आहेत. गावात येणाऱ्या सच्च्या हरिभक्ताचा आदर करणारे, त्याला आधार देणारेही आहेत. परंतु त्यांना ढोंगी बुबाबाजीचा अतिशय राग आहे. अशाप्रकारचे बुवाबाजीचे ढोंग

करणाऱ्याला ते चांगलाच धडा शिकवतात. त्यांच्या अनुभवी नजरेला खरा संत कोण आणि भगवे कपडे घालून लोकांना ठकवणारा ढोंगी कोण हे बरोबर जाणवते.

म्हणूनच आता त्यांनी मारुतीच्या देवळात "प्रभाते मनी" म्हणत असलेल्या महाराजांची प्रासादीक वाणी ऐकूनच ओळखले की, हे पाणी वेगळेच आहे. म्हणूनच त्यांनी ते नको नको म्हणत असताही त्यांना आग्रहाने आपल्या घरी आणले होते.

आपल्या घरांत शिरताच हंबीररावांनी त्यांचे स्वागत करत म्हटले, "या महाराज ! ही माझी गरीबाची मठी!!" आपण रामप्रहरी माझ्या घरी आलात त्याचा मला खूपच आनंद झाला आहे. या असे आसन ग्रहण करावे. असे म्हणून त्यांनी घरांत हाक दिली.

अहोss ऐकलं कां! आपल्याकडे बघा मोठे महाराज आले आहेत! जरा बाहेर या आणि येताना त्यांना दूधही घेऊन या.

बरं का महाराज पांच वर्ष झाली असतील आम्ही दोघेही सज्जनगडावर गेलो होतो. आपला आजचा देवळातला आवाज ऐकला आणि माझ्या सज्जनगडावरच्या आठवणी जाग्या झाल्या. क्षणभर आपण गडावरच आहोत असा भास झाला.

तेवढ्यात आतून राधाकाकू हातात दूधाचे पितळेचे चकचकीत ग्लास असलेली ताटली घेऊन आल्या. आपल्या हातातली ताटली त्यांनी बाजुच्या स्टुलावर ठेवली आणि त्या महाराजांच्या पाया पडायला पुढे झाल्या.

त्या आपल्या पाया पडतायत असे बघून महाराज आपले पाय मागे घेत म्हणाले, अहो माझ्या पाया पडायला मी काही कोणी महाराज वगैरे नाही किंवा कोणता बुवाही नाही. उलट मला या बुवाबाजीची अतिशय चीड आहे. मी आपला साधा माणूस आहे. या गावाच्या वाटेने जात होतो, गाव चांगला वाटला म्हणून

विचार केला या गावात दोन दिवस काढावेत आणि पुढे जावे. अर्थात आपल्या गावकऱ्यांनी रहायची परवानगी दिली तरच ते शक्य आहे.

तरीही राधाकाकूंनी त्यांना नमस्कार केला आणि त्या म्हणाल्या, हे बघा महाराज! तुम्ही कोण आहात? काय आहात? हे काही आम्ही तुम्हाला विचारले नाही. परंतु आपल्या आवाजात जो भाव आहे, आपल्या हावभावात जे शुचित्व आहे, ते पाहूनच माझ्या धन्यांनी आपल्याला आज घरी आणले आहे. आपण जर बुवाबाजी करणारे असता तर माझे धनी आपले असे स्वागतच न करते. कारण त्यांनाही बुवाबाजीची भयंकर चीड आहे. अहो ते म्हणतात, गावामध्ये अंधश्रद्धा पसरवणारा बुवा आढळला तर त्याला उघडा पाडून पोलीसांच्या ताब्यात देणे हे सरपंच म्हणून माझे कर्तव्यच आहे.

हंबीरराव या गावाचे सरपंच आहेत हे समजताच मात्र महाराज हंबीररावांच्या समोर गेले आणि आपले हात जोडून त्यांना म्हणाले आपण या गावचे सरपंच आहात हे ऐकून खूप आनंद झाला. आपल्याला म्हणजे गावच्या प्रमुखाला भेटून दोन दिवस गावात रहाण्याची परवानगी मागायची हे मी ठरवले होतेच. कारण समर्थांनीच दासबोधात म्हटले आहे.

कोणी एके ग्रामीं अथवा देशीं| राहणें आहे आपणासी |

न भेटतां तेथिल्या प्रभूसी| सौख्य कैंचें ||

योगा योगाने आपली भेट झाली बरे झाले. आता मी आपल्याला माझी माहिती सांगतो. त्याची आपणाला जरुरी वाटो अथवा न वाटो. परंतु ती आपणाला सांगणे मी माझे कर्तव्य समजतो. एक अनोळखी वाटसरु ज्याचा गावात कोणाशी काही संबध नाही आणि तो आपल्या गावात चार दिवस रहायच म्हणतोय म्हणजे तो कोणी चोर लफंगा असू शकतो ही शंका आपल्याला येणे वाजवी आहे.

अहो महाराज, असं काय म्हणता? आम्हाला काय माणसाची ओळख नाही? आपण कोणीही असाल पण चोर लफंगे निश्चितच नाही, हे माझी अनुभवी नजर मला सांगत आहे. असे सरपंच हंबीरराव म्हणाले.

त्यावर महाराज म्हणाले, तरीही तुमची इच्छा असो अथवा नसो मला माझी ओळख सांगणे माझे कर्तव्य वाटते. आणि ते सर्व आपण ऐकून मगच मला आपल्या गावात रहायची अनुमती द्यावी ही आपणाला विनंती आहे.

ठिक आहे महाराज, आम्ही तुमची सर्व हकीगत निश्चितपणाने ऐकु. पण त्या आधी आमच्या मंडळींनी आणलेल्या या दूधाचा आपण स्विकार करावा. मग निवांतपणाने आपली हकीगत आपण आम्हाला सांगावी.

त्यानंतर राधाकाकूंनी गार झालेले दूध परत गरम करून आणले. त्यानंतर हंबीरराव आणि महाराज यांनी दुग्धप्राशन केले. त्यानंतर राधाकाकूही तेथील खुर्चीवर बसल्या आणि महाराजांनी आपली हकीगत सांगायला सुरवात केली.

**********

# ३

महाराजांनी हंबीरराव आणि राधाकाकू यांच्या समोर आपली हकीगत सांगायला सुरवात केली. हकीगत सांगता सांगता ते पार आपल्या जुन्या काळांत गेले.

सरपंच! माझे नांव मंगेश सोमनाथ आंबेकर असे आहे. माझे गांव रायगड किल्याच्या जवळच असलेल्या दासगांव या जुन्या प्रसिद्ध बंदराच्या जवळच होता. सध्याच्या मुंबई गोवा हायवेवर दासगांव हे बंदर असलेले गांव आहे. जुन्या काळात मालाची वाहतूक रस्त्याने न होता जलमार्गाने व्हायची. कारण तेव्हा रस्ते फारसे नव्हतेच. दासगांवच्या बंदरात उतरलेला माल घाटावर पाठविला जायचा. दासगांव ही जुन्या काळची मोठी बाजारपेठ होती. सगळी सरकारी कार्यालये, हॉस्पीटल, शाळा, हायस्कूल या प्रमुख गोष्टी दासगांवमध्ये उपलब्ध आहेत. एक सुसज्ज सरकारी गेस्टहाऊसदेखील तेथे आहे.

अशा या दासगांव बंदराच्या खाडीच्या पलीकडील बाजुला डोंगर दऱ्यांच्या मधोमध आमचे "जाई" नावाचे गांव होते. दासगांव पासून साधारण पांच किलोमिटर अंतरावर असलेल्या या गावाची लोकसंख्या जवळपास पाचशे इतकी होती. गावात एकुण ७०-७५ घरे होती. गावात सर्व समाजाची घरे होती. गावाचा मुख्य व्यवसाय शेती होता. तरीही गावात अनेक कसबी कारागीर होते. पूर्वापार गलबते म्हणजे मालवाहतूकीच्या होड्या बांधण्याचे काम करणारे बरेच जण होते. त्यांच्याच पुढच्या पिढीतील मुलांनी फर्निचर तयार करण्याचे कसबही आपलेसे केलेले होते.

अशाच एका कसबी सुतारकाम करणाऱ्या घरात माझा जन्म झाला. वास्तवीक आम्ही त्या गावची पुरोहीत आहोत. परंतु याज्ञीकीच्या जोडीला आमच्या घरामध्ये

कसबी सुतारकामाचीही परंपरा होती. बालपणापासून आम्ही जसे वेदमंत्र शिकलो तसेच सुतारकामही शिकलो. आमच्या गावांत पूर्वप्राथमिक शाळा होती. त्या शाळेंत मी इयत्ता चौथी पर्यंत शिकलो. नंतर दासगांवला हायस्कूलमध्ये जाऊन मॅट्रीक पर्यंतचे शिक्षण घेतले. हायस्कूलला बऱ्याच वेळा चालतच जायला लागायचे. आमच्या गावापासून पांच किलोमिटर पर्यंतचे अंतर चालत, नंतर छोट्या होडीतून रोज मी दासगावला हायस्कूल करता जात असे. वर्गामध्ये मी सतत पहिल्या पाचात असायचो. हायस्कूलमधील शिक्षण पूर्ण झाल्यावर पुढील शिक्षण घ्यायचे तर महाडला किंवा मुंबईला जायला पाहिजे होते. आमच्या घरची परिस्थिती खाऊन पिऊन सुखी अशी होती. खलाटीत शेत होते आणि गावांत घर हीच आमची इस्टेट. त्यातून काबाड कष्ट करून वर्षभर पुरेल इतके भात व्हायचे. भाताचे पिक काढल्यानंतर त्याच शेतात उत्तम वाल व्हायचा. थोडेफार याक्षीकीचे उत्पन्न होते. जोडीला वडील आणि भाऊ सुतारकामही करीत. परंतु हातात रोख रक्कम फारशी नसायची. त्यामुळे मला कुठे शिक्षणाला पाठवायचे तर कॉलेजची फी, रहाण्याचा जेवण्याचा खर्च याकरिता लागणारी रोकड आमच्याकडे नव्हती.

परंतु हायस्कूलमधील आमचे मुख्याध्यापक कुलकर्णी सरांनी मनावर घेतल्याने हा प्रश्न सुटला होता. त्यांच घर महाड मध्ये होते. तिथे त्यांचे आई वडिल आणि भाऊ रहात होते. त्या त्यांच्या घरी त्यांनी माझी रहाण्याची खाण्यापिण्याची सोय केली होती. त्यांनीच विशेष प्रयत्न करून मला फी माफी मिळवुन दिली होती. माझ्या घरच्या लोकांनी कुलकर्णी सरांच्या घराला वर्षभर पुरेल इतके धान्य मला त्यांच्याकडे सोडायला जाताना पोचवले होते. तरीही एका अनोळखी आणि वेगळया संस्कारात वाढलेल्या परक्या मुलाला आपल्या घरात रहायला आणणे ही मोठीच जबाबदारी कुलकर्णीसरांनी घेतली होती. त्यांना माझ्याबद्दल एक विश्वास होता की, मी त्यांचे नांव खराब तर करणार नाहीच पण जोमाने अभ्यास करून त्यांनी दिलेल्या संधीचे मी सोने करून दाखवीन.

कुलकर्णी सरांनी दिलेल्या संधीचा मी पुरेपुर उपयोग करून घेतला. त्यांच्या घरातच राहिल्यामुळे माझ्या नकळत अनेक प्रकारची स्तोत्रे मी शिकलो. कुलकर्णी सरांच्या घरी त्यांचे वडील आणि भाऊ समर्थ रामदासांचे भक्त होते त्यांच्यामुळेच समर्थ साहित्याचाही परिचय झाला. महाडच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयांत मी दरवर्षी मेरीट मध्ये येत असे. शेवटच्या म्हणजे बी. कॉम्. च्या अंतीम परिक्षेत मी इकॉनॉमीक्स या विषयामध्ये सुवर्णपदक मिळवुन कुलकर्णी सरांनी दाखवलेल्या विश्वासाला सत्यात उतरवले. माझ्या घरच्या लोकांनीही मला शिक्षण घेता यावे म्हणून खूप कष्ट घेतले होते. आतापर्यंत माझ्या मोठ्या भावंडांचे विवाह झाले होते. त्यांना मुले बाळे झाली होती.

शिक्षण पूर्ण होताच मला स्टेट बँक ऑफ इंडीया मध्ये अकाउंटंट म्हणून नोकरी लागली. त्यानंतर माझेही एका अनुरुप मुली बरोबर लग्न झाले. आम्हालाही एक मुलगा आणि एक मुलगी अशी अपत्ये झाली. आमचा आणि आमच्या घरातील माझ्या भावंडांचे संसार मार्गी लागले. नंतर आम्ही आमचे रहाते घर लहान होते म्हणून जाई गावाच्या एका बाजुला डोंगराच्या पायथ्याजवळ असलेल्या आमच्या मालकीच्या माळरानावर एक सुंदर दोन मजली घरही बांधले. असे आमचे सगळे छान चालले होते. काही वर्षांनी माझी रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथे ब्रँच मॅनेजर म्हणून माझी बदली झाली. मग मी तेथे माझ्या पत्नी मुलांसह रहायला गेलो.

दरम्यान माझ्या वडिलांच्या वयाची पंचाहत्तर वर्षे दिनांक २८ जुलै २००५ ला पूर्ण होणार होती. त्यानिमित्ताने आम्ही आमच्या गावाला जाई येथे एक कार्यक्रम आयोजित केला होता. त्याची तयारी करायला म्हणून माझी पत्नी मुलांसह जाई येथे दिनांक २४ जुलैला गेली होती. म्हणजे मीच तिला व मुलांना सोडायला आमची कार घेऊन गेलो होतो. २५ तारखेला सोमवार होता मला बँकेत जाणे भाग

होते त्यामुळे मी त्यांना घरी सोडून २४ तारखेला संध्याकाळीच परत खेडला आलो होतो.

*************

त्यानंतर तो काळा सोमवारचा दिवस उगवला होता. “२५ जुलै २००५” या दिवसाने माझे सारे विश्वच अस्ताव्यस्त करून टाकले. महाड तालुक्याच्या त्या परिसरांत अहोरात्र धुंवाधार पाउस कोसळत होता. जणू ढगफुटीच झाली होती. तालुक्यातल्या सर्व नद्या दुथडी भरून वहात होत्या. रायगड जिल्ह्यातील महाड, दासगांव, गोरेगांव, नागोठणे, रोहा, पाली सर्व गावे पाण्याखाली गेली होती.

आमचा गावाची समुद्रसपाटी पासूनची उंची भरपुर होती. त्यामुळे सगळीकडच्या पुराच्या बातम्या ऐकल्यातरी मी निश्चिंत होतो. कारण आमच्या गावाला पुर येणे शक्यच नव्हते. सगळयाच गावांचा एकमेकांशी संपर्क तुटलेला होता. तरीही दासगावच्या खाडीपलीकडून रहदारी सुरु होती. म्हसळा तालुक्यातल्या आंबेत गावाहून महाडकडे जाणारी एस्. टी. बस आमच्या गावाच्या खालून जाणाऱ्या रस्त्याने जात असे आणि तो रस्ता एवढा पाऊस होऊनही चालूच होता. त्या रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनातून आमच्या गावातील घरे स्पष्ट दिसत असत. त्या दिवशी नेहमीप्रमाणे ती बस आमच्या गावाखालिल रस्त्याने गेली. त्या बसमधून महाडला जाणारा एकही प्रवासी आज त्या रस्त्यावर नव्हता याचे ड्रायव्हरला आश्चर्य वाटले. पण पावसामुळे आज कोणी घराबाहेर पडले नसेल असे समजुन तो पुढे निघाला. परंतु जाता जाता त्याच्या लक्षांत आले, रोज दिसणारी या गावातली घरेही आज दिसत नाहीत. तेव्हा काहीतरी गडबड आहे हे त्याला जाणवले. म्हणून त्याने लगेचच येणाऱ्या गावात गाडी थांबवली आणि त्या गावातल्या पोलीस पाटलांना आपली शंका सांगितली.

त्यावर त्या पोलीस पाटलांनी ड्रायव्हरला सांगितले, “तुम्ही आता महाड पर्यंत जातच आहात तर तिथल्या पोलीसांनाही कृपया ही खबर द्या!” तोवर मी आमच्या गावातील लोकांना घेऊन काय प्रकार आहे तो बघतो.

त्यानंतर तो ड्रायव्हर महाडला गेला त्याने तेथील पोलिस स्टेशनला आपली शंका बोलून दाखवली. दरम्यान आमच्या गावाच्या शेजारील गावातील पोलिस पाटलांनी गावातील चार पांच जणांना बरोबर घेतले आणि तेही काय प्रकार आहे तो बघायला आमच्या गावाकड निघाले. ते पांच सहाजण जागेवर जाऊन बघतात तो त्यांना धक्काच बसला अहो आमचे गाव ज्या ठिकाणी होते तिथे मातीचा प्रचंड डोंगर तयार झाला होता. गावाच्या दुसऱ्या टोकाला असलेला गुरांचा गोठा तेवढा त्या मातीच्या ढीगाच्या पार्श्वभूमीवर उभा असलेला दिसत होता.

आलेली लोक त्या मातीच्या ढीगाऱ्याला वळसा घालून लांब जवळपास दोन किलोमिटर अंतरावर असलेल्या त्या गोठ्यात पोचले. तिथे पांच सहा गायी आणि दोन बैल एवढी जनावरे बांधलेली होती. गोठ्याच्या एका कोपऱ्यांत एक वृद्ध गृहस्थ बेशुद्ध अवस्थेत झोपलेला आढळला. त्याला हलवुन जागे केल्यावर त्याला काहीच सांगता येईना. आलेल्या लोकांनी त्याला प्रथम तेथील माठातून पाणी प्यायला दिले.

त्यानंतर तो भानावर आला व त्याने सांगितले रात्रभर विजा चमकत होत्या. वीजांचे मोठ्ठे आवाज होत होते. प्रचंड पाऊस पडत होता. रात्री कधीतरी मोठ्ठा स्फ़ोट झाल्या सारखा आवाज आला. तो आवाज कसला म्हणून मी बघायला गेलो तर समोर गावातले दिवे दिसेनात की काहीच दिसेना. सगळीकडे मातिच माती दिसत होती. हे सगळे बघितल्यावर मला घेरी यायला लागली आणि मग मी या कोपऱ्यांत आडवा झालो. तो आता तुम्ही उठवलेत तेव्हाच जागा झालो. कोण तुम्ही माणसे? आणि इथे कसे काय आलात? माझ्या अंगातले अवसान एकदम निघून गेल्या सारखे झाले आहे. तेव्हा आता आलाच आहात तर जरा मला माझ्या घरापर्यंत सोडा. इथे समोर दिसते ते जाई माझे गांव आहे.

यथावकाश सर्व सरकारी यंत्रणा कामाला लागली. मातीचा ढिगारा बनलेल्या गावाला शोधण्याचा प्रयत्न केला गेला. त्यातून चारशे साडे चारशे माणसांचे मृत देह बाहेर काढले. जवळपास तेवढ्याच गुराढोरांचीदेखील मृत शरिरे बाहेर काढली होती. आमच्या गावातले त्या गुरांच्या गोठ्यात झोपायला गेलेले आमचे चुलते, मी आणि मुंबई येथे नोकरी धंद्या निमित्त गेलेल्या १०-१२ जणांव्यतीरिक्त कोणीही शिल्लक राहिले नाही.

माझ्यावर तर आकाशच कोसळले होते. आमच्या घरातले माझी पत्नी, दोन मुले, माझे आई-वडील, दोन भाऊ, त्यांच्या बायका, दोघांचीही दोन दोन मुले अशी आमच्याच घरातली एकुण तेरा माणसे त्या काळया रात्रीने आपल्या पोटात घेतली होती. या आघाताने मी पूर्ण खचून गेलो होतो. मी काय करतोय याचे मला भान नव्हते. या घटनेचे वृत्त समजताच प्रथम कुलकर्णी सरांच्या घरातले सर्वजण धावुन आले होते. त्यांना मी घरातला असल्यासारखाचा होतो.

त्यानंतर काही काळ मी त्यांच्याच कडे राहिलो होतो. परंतु माझे चित्त कशातच लागत नव्हते. गावातल्या जवळपास २५-३० लोकांचे उत्तरकार्य माझ्या या हाताने मी एकाचवेळी केले होते. उत्तर कार्य आटोपताच मी खेडला गेलो. परंतु तेथेही मी सावरु शकलो नाही. बँकेतील सहकाऱ्याच्या मदतीने जरासा सावरल्यावर मी माझ्या नोकरीचा राजिनामा दिला. बँकेचा चार्ज दिल्यावर मी निरुद्देश भटकत होतो. अनेक तिर्थक्षेत्रांना भेटी दिल्या तरीही माझे मन स्थिर होईना. अखेरीस मी सज्जनगडावर गेलो तिथे गेल्यावर मात्र माझे मन स्थिर झाले. हे जग नश्वर आहे याची खात्री पटली.

त्यानंतर मात्र मला सज्जनगडावरील माझ्या ऐतखाऊपणाचा कंटाळा आला. वाटू लागले हा देह नश्वर आहे तर त्याचे चोचले पुरवण्यांत काय अर्थ आहे? त्यामुळे

या नश्वर देहाचा समाजाकरिता जास्तीत जास्त उपयोग करायचा. त्याचे लाड करायचे नाहीत. त्याच उद्देशाने सध्या मी भटकत आहे.

गेली तिन चार वर्षे मी सज्जनगडावर होतो. तिथे मला समर्थांचा सहवास लाभला. रामदासी संप्रदाय जवळून पहाता आला. त्यामुळे आता उरलेले आयुष्य संसाराच्या व्यापात न पडता भिक्षा मागून देह जगवायचा. कोणाच्याही घरी रहायचे नाही असे समर्थांच्या चरणी वचन देऊन मी सज्जनगड सोडला आहे. पुढचा मार्ग आता समर्थच दाखवतील. एवढे लांबलचक संभाषण करून महाराज थांबले.

त्यांच्याकडे पाण्याचा पेला देत सरपंच म्हणाले, महाराज आपण बराच वेळ बोलत आहात आधी पाणी प्या. आपल्याला जेवढे दिवस या गावात रहायचे आहे तेवढे आपण निश्चिंत मनाने रहा. आपल्याला जर योग्य वाटले तर आपण कायम येथे राहिलेत तर आम्हाला आनंदच होईल. आपण जे काही कार्य करायचे ठरवाल त्यात सरपंच म्हणून आणि समर्थांचा एक भक्त म्हणून माझे पूर्ण सहकार्य आपल्याला मिळेल याची खात्री बाळगा.

महाराज! पण आपण रहाणार कुठे? नाहीतर असे करा, आमच्याकडेच रहा! राधाकाकू मनापासून बोलल्या.

बरोबर महाराज खरच येथे रहा! वाटलं तर भिक्षा मागून आणा आणि येथे जेवा, नाहीतर आमच्या बरोबर जेवा! हंबीरराव बोलले.

नाही जेवायला अथवा रहायला आता कोणाकडेच जायचे नाही! हा माझा निश्चय कायम आहे. या गावात आल्यावर माझी झोळी कम् शबनम मी मारुतीच्या देवळात लावली आहे. तेच ठिकाण माझ्या सारख्या रामदासांच्या अनुयायाला योग्य आहे. पोटापाण्याचा प्रश्नतर समर्थांनीच सोडविला आहे. भीक्षा मागणे हा तर समर्थ संप्रदायाचा आत्माच आहे.

महाराज! आपल्याला भिक्षा मागायला लावणे आम्हाला कसेसेच वाटते. समर्थांचा काळ वेगळा होता. आताच्या काळात भिक्षा मागायला गेल्यावर टर उडवणारेच जास्त आहेत. त्यात कदाचीत आपल्याला अपमानही सहन करायला लागेल. सरपंचांनी आपले मत मांडले.

अहो हंबीरराव, काळ बदलला हे बरोबरच आहे. पण माणसांचे स्वभावधर्म तसेच राहीलेत नां ! समर्थांनी म्हटलेच आहे.

भिक्षाहारी निराहारी| भिक्षा नैव प्रतिग्रहः |

असंतो वापि संतो वा| सोमपानं दिने दिने ||

भिक्षा म्हणिजे कामधेनु| सदा फळ नव्हे सामान्यु |

भिक्षेस करी जो अमान्यु| तो करंटा जोगी ||

तेव्हा पोटापाण्याची चिंता करण्याचे कारण नाही. मगाशी मी माझ्या पूर्वायुष्याबद्दल जे काही सांगितले ते कृपया आपल्या तिघांतच ठेवावे ही विंनती आहे. कारण मला आता ते ओझे वाहण्याची इच्छा नाही. महाराज म्हणाले.

त्याबद्दल आपण निश्चिंत रहा. आपण सांगितल्याशिवाय याबद्दल आम्ही कोणाजवळ शब्दही काढणार नाही. हंबीररावानी खात्री दिली. त्याबद्दल खात्री होतीच, तरीही धन्यवाद. येतो मी. जय जय रघुवीर समर्थ!

*********

# ४

पहाटेचे पांच वाजले होते. महाराज नेहमीप्रमाणे नदीवर जाऊन आपले प्रातर्विधी आणि स्नान उरकून आले. तिथपर्यंत रात्री मंदिरात झोपायला आलेल्या गणा, हेरंब, जितू आणि हेमंत यांनी आपले अंथरुण आवरून घेतले होते. महाराज नदीवरून येण्याच्या आधीच त्यांनी मंदिराचे आवार आणि मंदिर झाडून लखलखित केले होते. महाराजांना हनुमानवाडीला येऊन आता आठ दिवस झाले होते. या चौघांच्या आणि हंबीररावांच्या प्रेमळ आग्रहाला मान देऊन त्यांनी अजुन आपला येथिल मुक्काम हलवला नव्हता.

महाराज नदीवरून मंदिरात आल्यावर त्यांनी या चौघांनी केलेली साफसफाई पाहिली. त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसत होते. मंदिरात आल्यावर त्यांनी दररोजच्याप्रमाणे मारुतीची पूजा केली. तिथपर्यंत आपले चौघे मित्र घरी गेले होते. तासाभराने ते चौघेही आपले प्रातर्विधी आणि स्नान उरकून परत मंदिरात आले. तो पर्यंत सहा वाजले होते. महाराजांनी आपले नित्य प्रात:स्मरण सुरु केले होते.

त्यांचे नित्याचे पठण पूर्ण होताच महाराजांनी सूर्यनमस्कार घालायला सुरवात केली. या पांचही जणांचे आधी ठरले होते त्याप्रमाणे या चौघांनीही महाराजांच्या बरोबर सूर्यनमस्कार घालायला सुरवात केली. महाराजांनी त्यांच्या रोजच्या रिवाजाप्रमाणे १०१ नमस्कार घालून पूर्ण केले. गणाने आणि हेमंतने २१ सूर्यनमस्कार घातले, तर हेरंबने २५ घातले आणि जितूने ३० नमस्कार पूर्ण केले.

आज वर्षप्रतिपदा होती. नवीन वर्षाची सुरवात होती. या नवीन वर्षाची सुरवात आपल्या चौघा मित्रांनी नविन संकल्प करून केली होती. त्याची सुरवात त्यांनी सूर्यनमस्काराने केली होती. सूर्यनमस्कार घालून झाल्यावर मारुती

मंदिराच्या समोरील रस्ताही ही पांच जणांनी साफ केला. त्यानंतर जितूने आणि गणाने नदीवरून पाणी आणून दिले आणि महाराज, हेमंत आणि हेरंब यांनी सर्व मंदिर स्वच्छ धुवुन काढले. त्यानंतर चौघेही आपापल्या घरातली साफसफाई करण्यासाठी आणि गुढी उभारण्या साठी गेले.

******

चैत्र महिन्यातली प्रतिपदा असल्याने वातावरण एकदम प्रफुल्लीत होते. आंब्याच्या झाडांना मोहोर आलेला होता. मधूनच कोकिळा आपल्या मधुर गुंजनाने त्या प्रफुल्ल वातावरणात भर घालीत होत्या. सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण होते. हनुमानवाडीतल्या प्रत्येक घरी आज गुढी उभारलेली दिसत होती. प्रत्येक घरातील गुढीला वेगवेगळ्या रंगाची वस्त्रे वापरली होती. त्या निरनिराळया रंगाच्या गुढ्या पहात पहात महाराज रस्त्याने जात होते. तो त्यांना गावातल्या शाळेतदेखील गुढी उभारलेली दिसली. ते पाहुन त्यांना खूप आश्चर्य वाटले. म्हणून ते तडक शाळेच्या आवारात गेले.

शाळेच्या आवारात जाऊन पहातात तो तिथे एकदम उत्सवाचे वातावरण होते. शाळेचे सर्व आवार झाडून लख्ख केलेले होते. सर्वत्र रंगी बेरंगी पताका लावलेल्या होत्या. सर्व शाळेला आम्रपल्लव आणि झेंडूच्या फुलांच्या माळा लाऊन सजवले होते. शाळेच्या प्रवेशद्वारावर एक फळा ठेवलेला होता. त्यावर सर्व ग्रामस्थांना नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देणारा संदेश लिहिलेला होता. त्यावर सालाबादप्रमाणे आजच्या बालक पालक मेळाव्यामध्ये सर्वांचे स्वागतही केले होते.

शाळेच्या ऑफिस समोर छोटे स्टेज तयार केलेले दिसत होते. त्यावर सरपंच हंबीरराव, ग्रामसेवक, तलाठी, रेव्हेन्यू खात्याचे सर्कल इन्स्पेक्टर, सर्व ग्रामपंचायत

सदस्य बसले होते. समोर पटांगणात शाळेतील सर्व मुले एका बाजुला आणि दुसऱ्या बाजुला त्या मुलांचे पालकही बसले होते. स्टेजवर बसलेल्या सरपंचानी महाराजांना शाळेच्या आवारात शिरताना पाहिले आणि त्यांनी शाळेच्या शिपायाला जवळ बोलावले व ते त्याला म्हणाले, अरे, विश्राम! समोरून ते महाराज येताना दिसत आहेत त्यांना मी बोलावलय असे सांग आणि त्यांना इकडे घेऊनच ये.

विश्रामच्या बरोबर महाराजांना येताना पाहुन सरपंच पुढे झाले. त्यांना हाताला धरून स्टेजवर घेऊन येत सरपंच म्हणाले, या महाराज आपल्याला या सर्वांची ओळख करून देतो. हे आपले ग्रामसेवक पंडित साहेब, हे या शाळेचे मुख्याध्यापक शेळके गुरुजी, हे आपल्या आणि बाजुच्या दोन गावचे तलाठी धुमाळ साहेब, हे आपल्या भागाचे सर्कल इन्सपेक्टर आपटे साहेब आणि या गोवेले येथिल स्टेट बँकेच्या मॅनेजर आचार्य मॅडम. आणि बरं का मंडळी हे महाराज आपल्या गावात पाव्हणे आले आहेत मोठे सत्पुरुष आहेत.

महाराज! आमच्या शाळेतर्फे आपले हार्दिक स्वागत! महाराजांच्या हातात पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करत शेळके गुरुजी म्हणाले. आज आमच्या शाळेचा विद्यार्थी पालक मेळावा आणि मुलांच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

नमस्कार! सरपंचांनी मला जरी महाराज ही उपाधी दिली असली तरी, मी समर्थ रामदास स्वामींच्या विचारांवर दृढ विश्वास असलेला त्यांचा भक्त आहे. मी बुवा महाराज वगैरे कोणी नसून अतिशय सामान्य गृहस्थ आहे. स्टेजवरील सर्वांना नमस्कार करीत महाराज म्हणाले.

हे बघा महाराज! आमचे सरपंच जेव्हा एखाद्याचा आदराने उल्लेख करतात, तेव्हा तो माणूस त्यांच्या कसोटीला पूर्णपणे उतरलेला असतो हे नक्की. सर्कल इन्स्पेक्टर आपटे म्हणाले.

थोड्याच वेळात सरपंचांच्या हस्ते नारळ वाढवुन कार्यक्रमाची सुरवात करण्यांत आली. त्यानंतर व्यासपीठावरील सर्वांची समयोचीत भाषणे झाली. त्या सर्वांच्या भाषणा नंतर शेळके गुरुजींनी महाराजांना पालकांना आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची विनंती केली. तेव्हा महाराज उठले आणि माईक समोर येऊन उभे राहिले, आणि त्यांनी बोलायला सुरवात केली.

उपस्थित सर्व सज्जनहो, मी खरं म्हणजे या गावात नवखा आहे. या गावातून जाणारा एक वाटसरु आहे. समर्थ रामदास स्वामींनी दाखवलेल्या मार्गाने जाण्याचा ध्यास घेतलेला त्यांचा एक भक्त आहे आणि इतकीच माझी ओळख आहे. गेले आठ दिवस आपणच वाढलेल्या भिक्षेने माझा उदर निर्वाह चालू आहे. तेव्हा असा फाटका माणूस मी काय बोलणार? तरीही आपली इच्छा आहे, आपण मला बोलायची संधी दिली आहेच तर समर्थांचे विचार आपल्या पर्यंत पोचवण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

आज येथे विद्यार्थी आणि पालक असा दोघांचाही मेळावा आहे. तेव्हा आजचे श्रोते बालक पण आहेत आणि पालकही आहेत. समर्थांना बालके खूप आवडायची. ते मुलांबरोबर मुल व्हायचे. समर्थ रामदास स्वामी जेव्हा नाशिकजवळच्या टाकळी येथे गायत्री पुर:चरण करत होते. तेव्हा तिथल्या मुलांबरोबर त्या काळात खेळले जाणारे खेळ खेळायचे. समर्थांनी दासबोधात मुलांना अक्षर कसे काढावे, वेलांट्या कशा द्याव्यात, अकार उकार मकार कसे द्यावेत, दोन शब्दांमध्ये किती अंतर असावे, दोन ओळी मध्ये किती अंतर असावे या सगळ्या गोष्टी लेखन क्रिया या

आपल्या समासात सांगितल्या आहेत. त्याचबरोवर आपली दिनचर्या कशी असावी हेदेखील सांगितले आहे. त्यांनी नेहमीच प्रयत्नवादाला प्रोत्साहन दिले आहे.

आळसाने काय दुष्परिणाम होतात याचे सविस्तर वर्णन त्यांनी दासबोधामध्य केलेले आहे. संसारी माणसांकरिता त्यांनी आदर्श व्यक्तिचे व्यक्तिचित्रच या महान ग्रंथात दाखवले आहे. चांगले गुण कोणते, वाईट गुण कोणते, उद्योगी पणाचे फायदे कोणते या सर्व गोष्टींचे त्यांनी त्यात व्यवस्थित विवेचन केले आहे. आज आपल्यासमोर अनेक प्रलोभने आहेत. टिव्ही व्हीडीओ यांचे आकर्षण आहे. हल्ली तर मोबाईलचे युग आहे. पूर्वी टि व्ही ला इडीयट बॉक्स म्हणायचे. हल्ली त्याची जागा मोबाईलने घेतली आहे. कदाचित इकडे खेडेगावात ते लोण आले नसेल. पण ते यायला वेळ लागणार नाही.

आपण म्हणतो मुले ऐकत नाही. मुले म्हणतात आमच्या आई वडिलांना आमच्याकडे लक्ष द्यायला वेळ नाही. पण हे कुठेतरी थांबायला पाहिजे. मुले शाळेत पाच सहा तास असतात परंतु आपल्या पालकांजवळ उरलेले पंधरा सोळा तास असतात. मुलांवर जर चांगले संस्कार झाले तरच ते पुढे चांगले सुजाण नागरिक होतील. त्यामुळे पालकांनीही आपल्यावर संयम ठेवायला हवा. मुलांपुढे चांगला आदर्श ठेवायला हवा.

आज आपल्याकडे साधन सामुग्री आहे, शिक्षण आहे, मनुष्यबळ आहे सगळेकाही आहे. एवढे सगळे असूनही, जवळ योग्य क्षमता असूनही आपले तरुण बेकार आहेत. मग ते वाममार्गाला लागतात. त्याची जबाबदारी कोणाची, पालकांची? त्या बेकार तरुणांची? का समाजाची? त्या वाट चुकलेल्या तरुणांना योग्य मार्गदर्शन करून, त्यांच्यातल्या गुणांना वाव मिळेल असे कार्य त्यांच्यावर विश्वासाने सोपवले तर ते अशा कामाला खात्रीने यशस्वी करतील यात शंकाच नाही.

आज परिस्थिती अशी आहे. आपल्या कडील नद्या कोरड्या पडल्या आहेत, पाऊस पडला तर इतका पडतो की त्यामुळे ओला दुष्काळ निर्माण होतो. तर कधी पाच पाच वर्षे अजिबात पाऊस पडतच नाही. त्यामुळे अशी परिस्थिती येते की खायला अन्न नाही, जनावरांना वैरण नाही. हे सगळे कशामुळे घडते तर आपण राक्षसासारखे सगळे खात सुटलोय. निसर्गाकडून नुसते घ्यायचेच आपल्याला माहीत आहे. आपण निसर्गाचेही काही देणे लागतो हेच विसरून गेलोय. आजच्या गुढीपाडव्याला आपण आज असा संकल्प करुया की, निसर्गाला मी काय देणे लागतो आहे हे मी शोधीन आणि ते त्याचे त्याला परत करीन.

मंडळी मी भावनेच्या भरांत जरा जास्तच बोललो असे मला वाटतय. त्यामध्ये आपला अपमान करण्याचा माझा उद्देश नव्हता. तरीही मोठ्या मनाने आपण मला क्षमा करावी ही विनंती. आपले दोन्ही हात कोपरा पासून जोडून त्यांनी सर्वांची क्षमा मागितली आणि कोणाला काही समजायच्या आंत ते तडक स्टेजवरवरून खाली उतरले आणि मंदिराकडे निघून गेले.

*******

# ५

चैत्र महिना चालू झालेला असल्याने त्यामुळे हवेत उष्मा खूपच वाढलेला आहे. दोन दिवसापुर्वीच गुढी पाडवा झालेला होता. नदीतल्या पाण्याची पातळी आता कमी कमी होत चालली होती. गावातल्या डोंगराकडील बाजूच्या घरांना पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष आता जाणवायला लागले होते. त्या भागात असलेल्या विहिरींचे पाणी आता  पूर्णपणे आटले होते. त्यामुळे तिकडची लोक पाण्यासाठी मारुती मंदिराच्या जवळ असलेल्या नदिच्या डोहामध्ये पाणी न्यायला येऊ लागले होते.

आज शनिवार असल्याने पहाटे उठल्यावर महाराजांनी आपले प्रातर्विधी उरकताच काल ठरविल्याप्रमाणे, गणा आणि जितुला उठवले होते. नंतर त्या दोघांनी हेमंत आणि हेरंब यांना उठवले होते. त्यांनीही नदीवर जाऊन आपले प्रातर्विधी उरकले आणि येतानाच दोन दोन बादल्या भरून पाणी घेऊन आले. तिथपर्यंत महाराजांनी मंदिराचे आवार साफ केले होते.

त्यानंतर सर्वांनी मिळून मारुती मंदिर पाण्याने धुऊन काढले. चौघाही मुलांनी आज महाराजांच्या बरोबर नदीवरच आंघोळ केली. त्यांच्याही घरी आता पाण्याची चणचण जाणवायला लागली होती. नेहमीप्रमाणे आंघोळ करून येताना महाराजांनी पाण्याचा तांब्या भरून आणला होता. मुलांनी रुईच्या झाडाची पाने आणि फुले मारुतीच्या पूजेसाठी आणली होती. त्या पानाफुलांच्या सहाय्याने महाराजांनी मारुतीची पूजा केली. त्यानंतर ते त्या महारुद्र हनुमानावर रुद्रसूक्त म्हणून अभिषेक करायला मारुतीच्या पुढे बसले. त्यांनी आपल्या संथ परंतु स्पष्ट आवाजात सुरवात केली....

हरी ॐ इडादेवहुर मनरयज्ञनीर.......

त्यानी आपल्या खड्या आणि सुस्पष्ट आवाजात रुद्राचे पठण सुरु केले. चौघेही मुले मंदिराच्या सभामंडपात बसून ते ऐकु लागले. महाराजांचा रुद्राभिषेक झाल्यावर त्यांनी पांच जणांनी मिळून आरती केली. तिथपर्यंत नऊ वाजले होते. त्यानंतर मुले आपापल्या घरी गेली. महाराज आपले नित्याचे दासबोध वाचन करायला बसले. मंगलाचरण झाल्यावर महाजांनी आपल्या रोजच्या समासाचे वाचन सुरु केले.

महाराजांचे एकासुरात वाचन सुरु होते. इतक्यात हंबीरराव आणि शेळके गुरुजींनी मंदिराच्या आवारात प्रवेश केला. ते दोघेही दर शनिवारी मारुतीच्या मंदिरात दर्शनाला येत असत. आवारात प्रवेश करताच शेळके गुरुजींना मोठे आश्चर्य वाटले. ते हंबीररावांना म्हणाले, सरपंच आपण आपल्या नेहमीच्या मारुती मंदिरातच आलो आहोत नां?

का हो! अस कां म्हणता? सरपंच म्हणाले. मग त्यांचे आजुबाजुला लक्ष गेले आणि ते म्हणाले, अरे खरचं की! आधी माझ्या लक्षांतच आले नाही. आवार एकदम लख्खं झालेलं दिसत आहे!

बोलत बोलत दोघे पुढे जात होते तो त्यांना मंदिरातून दासबोध पठणाचा महाराजांच्या संथ परंतु सुस्पष्ट आवाज ऐकु यायला लागला. ते दोघेही आतमध्ये जाऊन महाराज वाचत असलेल्या ओव्या ऐकु लागले.

कित्येक राजे नांदती| कित्येक दरिद्र भोगिती |

कितीयेकांची उत्तम स्थिती| कित्येक अधमोद्धम ||२|| श्रीराम ||

वडिल समर्थ धाकुटा भिकारी| ऐका याची कैसी परी |

वडिला ऐसा व्याप न करी| म्हणोनियां ||१२|| श्रीराम ||

जैसी विद्या तैसी हांव| जैसा व्याप तैसें वैभव |

तोलासारिखा हावभाव| लोक करिती ||१३|| श्रीराम ||

विद्या नसे वैभव नसे| तेथें निर्मळ कैंचा असे |

करंटेपणें वोखटा दिसे| वोंगळ आणी विकारी ||१४|| श्रीराम ||

महाराजांचे लक्ष वाचता वाचता सहजच समोर गेले तो त्यांना तेथे शेळके गुरुजी आणि सरपंच उभे असलेले दिसले म्हणून त्यांनी ग्रंथामध्ये खूण घालून तो बाजुला ठेवला.

त्या दोघांना सामोरे जात ते म्हणाले, या! सरपंच साहेब, या! शेळके गुरुजी आपणही या! एवढ्या उन्हाचे कसे काय आलेत?

आम्ही दर शनिवारी मारुतीच्या देवळात येतो. बऱ्याचवेळा मी आणि सरपंच एकत्रच येतो. कारण आम्ही एकमेकांच्या शेजारीच रहातो. पण महाराज आपण कमालच केलीत. मागच्या वेळी एका शनिवारी आम्ही चर्चा करत होतो, “आता हनुमान जयंती जवळ आली आहे तेव्हा सगळी साफसफाई करायला हवी”. पण आज आम्ही बघतो तो काय, सगळीकडे चकचकाट दिसतो आहे. एवढेच नाही मंदिरही अगदी धुवुन लख्खं केलेले आहे. शेळके गुरुजी बोलले.

काय सांगु महाराज आमच दुर्दैव, आमच्याच गावातली उनाड मुले येथे पत्ते खेळत बसतात आणि विड्या ओढत या मंदिरात घाण करून ठेवतात. मी किती

सांगितले अगदी दम पण दिला तरी चार दिवस बंद होतात. पण परत आपले ये रे माझ्या मागल्या असं होतय. सरपंच म्हणाले.

त्या हेमंत, हेरंब, गणा आणि जितू यांच्या घरची लोकदेखील परवा माझ्या कडे तक्रार करीत होती! शेळके गुरुजी म्हणाले.

पण महाराज आपल्याला मात्र खूप त्रास झालेला दिसतोय, आमच्या पोरांनी केलेली घाण निस्तरायला. खूप मेहनत पडली असेल. एवढी सर्व सफाई केलीत तरी कधी? सरपंच म्हणाले.

सरपंच, गुरुजी आपला खूप मोठा गैरसमज झाला आहे. देवळाची आणि आवाराची साफसफाई मी काही एकट्याने केली नाही. तुम्ही आता ज्यांना उनाड आणि बिघडलेली मुले म्हणालात नां, त्या चौघांच्या मदतीने मी हे आवार आणि मंदिर साफ केले आहे. पोरांनी मला जास्त काम करु दिलेच नाही. महाराज म्हणाले.

पण महाराज, ही किमया झाली कशी काय? अहो! गावात कोणाचेही न ऐकणारी, सतत उद्धटपणाने आम्ही आमच्या मनाला वाटेल ते करु अशी दुरुत्तरे करणारी मुले एकदम सुतासारखी सरळ आलीच कशी? नक्कीच तुमच्याकडे काहितरी जादुची कांडी असली पाहिजे. शेळके गुरुजी म्हणाले.

आपण समजता तशी ही मुले वाईट नक्कीच नाहीत! आता ती उद्धटपणा वगैरे करीत होती ती परिस्थितीने गांजल्यामुळे. चहू बाजुने त्यांची कोंडी झाल्याने ती बिथरली आहेत, परंतु मनाने खूप चांगली आहेत. त्यांच्या या दुखण्याचे औषध आहे त्यांना योग्य मार्ग दाखवणे! चांगली शिकली सवरलेली मुले जेव्हा उपेक्षीत होतात

तेव्हा हा असा जगावेगळा मार्ग धरतात. परवा त्या मुलांनी अक्षरश: माझे पाय धरले. आतापर्यंत केलेल्या दुर्वतनाबद्दल झालेल्या पश्चातापाने बिचारी धाय मोकलून रडत होती. त्यांच्या त्या वर्तनानेच खरेतर माझा पाय या गावात अडकला आहे. त्यांना काही योग्य मार्ग दाखवता आला तर मला खूप आनंद होईल. महाराजांनी खुलासा केला.

बरोबर आहे आपण म्हणता ते! ती चौघेही चांगली शिकलेली आहेत. शाळेत असतानादेखील ते अभ्यासात सतत पुढे असायचे. पण शिक्षण संपल्यावर त्यांना योग्य काम मिळाले नाही, म्हणून त्यांना निराशेने घेरले आणि ती एकलकोंड्या सारखी वागायला लागली! शेळके गुरुजी म्हणाले.

खरं आहे आपले म्हणणं! पण आता याला उपाय काय? पोरांना लायनीला तर लावलच पाहिजे! काय करावे सुचत नाही! सरपंच म्हणाले.

सरपंच! अहो एवढे निराश होऊ नका! अहो इच्छा आहे तिथे मार्ग आहेच! हे निश्चित! सरकार निरनिराळया योजना तयार करते. निरनिराळे रोजगार उपलब्ध करून देते. या योजनांचा फायदा मात्र गरजुंच्याऐवजी भलतीच लोकं घेतात. हे चौघे आणि गावातली इतर मंडळी यांच्या हाताला योग्य काम मिळेल अशी एखादी सरकारी योजना असेलच. अर्थात कष्ट करायची तयारी हवी, आणि ती या चौघांची आहेच, महाराज म्हणाले.

बरे तुम्ही दोघे असे उभ्या उभ्या बोलण्यापेक्षा आधी दर्शन घेऊन या! मग आपण बोलुया.

खरंच की! आपण बोलतच राहिलो, दर्शन घ्यायचे राहूनच गेले! सरपंच म्हणाले.

आपण दर्शन घेऊन येई पर्यंत मी माझा राहिलेला समास वाचून पुरा करतो. असे बोलून महाराज राहिलेले वाचन पुरे करायला गेले.

सरपंच आणि शेळके गुरुजी दर्शन घेऊन आले आणि हनुमान जयंतीच्या उत्सवासंबंधी बोलत बसले होते. तोच महाराज आपले वाचन संपवुन त्यांच्यात सामिल झाले.

काय कसली चर्चा चालली होती? महाराजांनी सहजच विचारले.

त्यावर शेळके गुरुजी म्हणाले, आता चार दिवसावर हनुमान जयंती आली. तेव्हा त्या उत्सवासंबंधी बोलत होतो. हनुमान जयंती झाली की, देवीच्या डोंगरावर चैत्री पोर्णिमेला सोमजाई देवीचा उत्सव असतो.

किती लांब आहे देवीचे देऊळ? महाराजांनी विचारले.

फार लांब नाही, समोर डोंगर दिसतोय नां! तोच देवीचा डोंगर. गावापासून पांच किलोमिटर अंतरावर देवीचा डोंगर आहे. मंदिरापर्यंत जायला मात्र खडी चढण आहे. पण वर गेल्यावर मात्र अगदी माथेरान महाबळेश्वरला गेल्यासारखे वातावरण आहे. वरती छान पाण्याची पोखरण आहे. ऐन उन्हाळ्यात थंड आणि मधुर पाणी तिथे उपलब्ध असते. शेळके गुरुजींनी माहिती दिली.

पण महाराज, ते पोखरणीच्या पाण्याचे सोडले तर मात्र सगळा रखखाट आहे. सावलीला एकही झाड नाही. पूर्ण डोंगर बोडका झाला आहे. या पंचक्राशीतल्या लोकांचे ते श्रद्धास्थान आहे. शेकडो लोक जत्रेला येतात. पण या ऐन उन्हाळयांत त्यांना बसायला सावली नाही. आजुबाजुला जवळपास २०० एकर पडीक सरकारी जागा आहे. पण सगळी जागा खड्या खड्यांनी भरलेली आहे. सरपंचांनी आपली व्यथा मांडली.

पण काय हो सरपंच! ती २०० एकर जागा लागवडीखाली नाही आणता येत? देवीच्या जवळ ज्याअर्थी पाणी आहे त्याअर्थी आजुबाजुला पण पाणी असू शकते. शिवाय ती जागा चांगली लेव्हल करून जर तिथे पाणी मुरवले तर ते पाणी पाझरून आपल्या गावच्या नदीचे पाणी पण वाढेल! तुम्हाला काय वाटते? महाराजांनी आपली कल्पना मांडली.

बरोबर आहे तुमचे, पण एवढा खर्च कोण करणार? शिवाय ती जागा सरकारी आहे, कोणी खर्च करणारा भेटलाच तर तो आपला खर्च वसुल करण्याकरीता काहीतरी मागणारच नां! सरपंच म्हणाले.

**********

# ६

हनुमानवाडीच्या पूर्वेला असलेले सोमजाई मंदीर गावापासून जवळपास पांच सहा किलोमिटर अंतरावर आहे. हे सोमजाई मंदिर ज्या टेकडीवर आहे त्या टेकडीला देवीचा डोंगर असेच म्हटले जाते. दरवर्षी चैत्र पोर्णीमेला येथे जत्रा भरते. या जत्रेला हनुमानवाडीच्या पंचक्रोशीतील लोक मोठ्या भक्तीभावाने येतात. देवीच्या मंदिरात जाण्यासाठी पायथ्यापासून मोठी चढण चढावी लागते. सर्वसामान्य माणसाला ती चढण चढून जाण्यास एक तास तरी लागतो.

चढण चढून गेल्यावर मात्र आपण एवढा डोंगर चढल्याचे सार्थक झाल्याची भावना निर्माण होते. देवीच्या डोगरावर सोमजाई मंदिरचा परिसर खूप मोठा आहे. जवळपास आठ एकराच्या मैदानसदृष्य पठाराच्या मधोमध हे मंदिर बांधलेले आहे. मंदिर अतिशय साधे कौलारु छपराचे आहे. मंदिराच्या समोरच पोखरण किंवा पुष्करिणी आहे. मंदिराच्या परिसराच्या पलिकडे एक मोठी रिकामी जागा आहे. ती जागा म्हणजे ओसाडवाडीच आहे. सगळीकडे खुरटे गवत उगवुन वाळून गेलेले आहे. कुठे बोरी बाभळीची झुडपे उगवलेली दिसतात. मंदिराचा परिसर आणि ही जागा याच्या मध्ये पावसाळी वहाणारा ओढा आहे. त्याला आक्टोबर पर्यंत पाणी असते. एरवी तो कोरडाच असतो.

सोमजाईच्या मंदिराचीही एक आख्यायिका होती. गणेशच्या पूर्वजांच्या स्वप्नात देवी आली आणि तिने मी डोंगरावर रहायला आले आहे असे त्यांना सांगितले होते. मी मातीच्या आड दबून राहिले आहे. मला बाहेर काढ आणि माझे मंदिर बांध. म्हणून देवीने कुठे खोदायचे ती जागा त्यांना स्वप्नात सांगितली होती. आपल्या स्वप्नाची कथा त्यांनी गावकऱ्यांना सांगितली. मग सर्वांनी मिळून खूणेचे झाड शोधून काढले. त्या झाडाखाली चार पाच फुट खणल्यावर त्यांच्या पहारी कशावर तरी आपटल्या. मघ त्यांनी सावकाश खणायला सुरवात केली असता तीन

देवींचा आकार असलेली ओबड धोबड मूर्ती मिळाली. त्याच जागेवर सध्याचे मंदिर बांधले गेले. काही वर्षांनी देवीला कौल लावुन नवीन तीन मूर्ती स्थापन करण्याची परवानगी घेऊन सध्याच्या सरपंचांच्या आजोबांनी देवीची संगमरवरी दगडाच्या महाकाली, महासस्वती आणि महालक्ष्मीच्या मूर्ती खास जयपुरहून तयार करून घेतल्या होत्या. त्या मूर्तींची विधिवत स्थापना करण्यांत आली होती. सध्या मंदिरात त्याच मूर्ती पूजेमध्ये आहेत. जुन्या मूर्तीचे विसर्जन न करता तीदेखील गाभाऱ्यात एका बाजुला स्थापन करून ठेवलेली होती.

आता दुपारचे तीन वाजले होते. हवेत खूप उष्मा होता. उनही भरपुर होते. या अशा प्रखर उन्हात महाराज आणि आपले चौघे मित्र देवीचा डोंगर चढत होते. महाराज भराभरा चालत होते. त्यामानाने हे चौघे जरा हळू चालत होते. डोक्यावर तापत असलेल्या उन्हामुळे अंगातून वहाणारा घाम तसाच सुकून जात होता. सर्वांच्याच घशाला कोरड पडली होती. शेवटी धापा टाकत टाकत ते पांचहीजण देवीच्या समोरच असलेल्या पोखरणी जवळ आले. पोखरणी जवळ आल्यावर जी वाऱ्याची झुळुक आली इतकी सुंदर होती की तिने आतापर्यंत केलेले चढण्याचे श्रम कुठल्या कुठे पळून गेले ते समजलेच नाही. पोखरणीच्या मधोमध विहीरीसारखा एक चौकोनी हौद होता. तिथे जायला पोखरणीच्या मधोमध दगडी रस्ता तयार केलेला होता. पांचही जणांनी पोखरणीमध्ये जाऊन आपले पाय त्या थंडगार पाण्यात बुडवले. पाण्यांत पाय बुडवताच त्यांचा उरला सुरला शिणही दूर पळाला.

पाय धुतल्यावर सगळे मधल्या विहिरीवर गेले. हेमंतने तिथेच असलेल्या हात रहाटाने पाणी काढून सर्वांना प्यायला दिले. त्या मधुर आणि थंड पाण्याने त्यांचा उत्साह द्विगुणित झाला.

इतक्या उंचावर असूनही विहिरीला पाणी भरपूर दिसते! शिवाय चवही मधुर आहे! महाराज त्या चौघांना बोलले.

परवा शनिवारी शेळके गुरुजी आणि सरपंच मंदिरात आले होते तेव्हा त्यांच्या चर्चेत या देवळाचा उल्लेख झाला होता. म्हणून महाराजांना या सोमजाई मंदिरात जायचे होते. आज मंगळवार होता. भीक्षा मागून आल्यानंतर जेवण होताच त्यांनी या मंदिरात जायचे ठरवले. ते मंदिरात जायला निघाले तेव्हा गणा, जितू, हेरंब आणि हरेश तेथे आले होते. मग तेही महाराजांच्या बरोबर मंदिरात आले होते.

पाणी पिऊन आणि चेहऱ्यावर पाणी मारल्यावर ते पांचहीजण मंदिरात देवीच्या दर्शनाला गेले. देवीच्या गाभाऱ्यात महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती अशा तीन संगमरवराच्या मूर्ती होत्या. त्यांच्याकडे पाहिल्यावर लगेचच मन प्रसन्न होत असे. सोमजाई देवी ही महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती या त्रिगुणात्मक रुपांत आहे. महाराजांसह सर्वांनी देवीला दंडवत घातला. त्यानंतर महाराजांनी तिच्या तिनही रुपांचे ध्यान मंत्र म्हटले. देवीच्या सभामंडपात बसून मग त्यांनी श्रीसूक्त आणि देवीसूक्ताचेही पठण केले. सभामंडप तसा प्रशस्त होता. चारही बाजुन ओपन असल्यामुळे छान हवा आत येत होती.

गणेश, तुझ्या पूर्वजांच्या स्वप्नांत ही देवी आली होती असे मी ऐकले आहे. म्हणजेच तिचा वरदहस्त तुमच्या घराण्यावर नक्कीच आहे. तू जर योग्य प्रयत्न केलेस तर तुला ही आई सोमजाई देवी तुला खात्रीने यश देईल. महाराज गणेशला म्हणाले.

होय काका! मी प्रयत्नात कुठे कमी पडणार नाही. फक्त मला संधी मिळायला पाहिजे. मी सामाजिक वनीकरणामध्ये डिग्री केली आहे. त्यामुळे मला जरी एखादी ओसाड जमिन जरी मिळाली तरी मी तिचे नंदनवन करून दाखविन. वनीकरणाकरीता बागाईतीसारखे भरपुर पाण्याचीही गरज नाही आणि जागाही अगदी सखलच हवी असेही नाही. गणेशने आपल्यावतीने खात्री दिली.

काका, गणेश म्हणतो ते बरोबर आहे, आम्ही कष्टाला मागेपुढे बघणार नाही. फक्त आम्हाला संधी मिळायला पाहिजे. मी ही शेतीशास्त्रामध्ये डिग्री केली आहे. त्यामुळे मलाही जर एखादी ओबड धोबड जमिन मिळाली तर मी ती लेव्हल करून तिथे पाणी मुरवुन तिला सुजलाम सुफलाम करून दाखविन. हेरंबनेदेखील आत्मविश्वासाने सांगितले.

हरेश आणि जितूनेही आम्हाला योग्य संधी मिळाली तर आम्ही तिचे सोने करून दाखवु असे प्रतिपादन केले. त्यानंतर सगळेजण देवीच्या मंदिराचा परिसर पहायला गेले. तिथपर्यंत उन्हही जरा सौम्य झाले होते. फिरत फिरत ते मंदिराच्या बाजुला असलेल्या ओसाड जागेत गेले. खूप मोठी जागा दिसत होती. मात्र त्या जागेत कुठे उंचवटे तर कुठे खड्डे दिसत होते. मध्येच एका ठिकाणी ओलसर जागा दिसत होती. नुकतेच तिथले पाणी आटलेले होते. त्या जागेमध्ये सर्वत्र बोरीची आणि बाभळीची झुडुपे दिसत होती. पायाखालचे गवत सुखलेले दिसत होते.

काय रे गणेश! किती होईल ही जागा आणि या जागेत काय काय होऊ शकते? महाराजांनी कुतुहलाने विचारले.

काका, ही जागा १००-१५० एकरांपेक्षा जास्त वाटते! आपण आता ज्या ओलसर जागेवर उभे होतो ना, तिथे जर पाझर तलाव बांधला तर या सगळ्या जागेला त्याचे पाणी पुरेल. ही जागा म्हणजे सोने आहे. यात फळबाग होऊ शकते. आपल्या पूजेला जी पत्री लागते त्या पत्रीमध्ये जी जी झाडे सांगितली आहेत त्यातली बरीचशी झाडे येथे होऊ शकतील. हल्ली औषधी वनस्पतींचे उद्यान जर तयार केले तर त्याला मोठे मार्केट आहे. गणेश आणि हेरंबने एकदम सांगितले.

पण काय रे! ही जागा कोणाच्या मालकीची आहे काय? महाराजांनी विचारले.

ही मंदिराची जागा देवस्थानची असेल! बाजुची ही ओसाड जागा आहे ती नक्की कोणाची आहे माहित नाही. कदाचित फॉरेस्ट खात्याची असेल. सरपंचाना माहीत असेल. गणेशने सांगितले.

अशीच चर्चा करत करत ते देवीचा डोंगर उतरून परत मारुती मंदिरात आले. मंदिरात पोचे पर्यंत संध्याकाळ झाली. चौघे मित्र आपापल्या घरी गेले. महाराज सरळ नदीवर गेले, तिथे स्नान करून परत देवळात आल्यावर त्यांनी आपले दैनंदिन पठण सुरु केले. त्यांचे पठण संपते आहे तोच गावातून सात आठ मुले मंदिरात आली. हल्ली ही मुले महाराजांकडे सायंप्रार्थना शिकायला यायला लागली होती.

## ७

दुपारची वेळ होती. साडेबारा एक वाजला असेल. उन्ह मी म्हणतं होती. दोन दिवसांवर हनुमान जयंती आली होती. चैत्र महिन्यातल्या या दिवसात हवेत उष्मा खूपच वाढलेला होता. जो तो गारव्यामध्ये जाऊन बसायला बघत होता. त्यामुळे रस्ता जवळ जवळ निर्मनुष्यच होता. त्या धुळीने भरलेल्या रस्त्यावर सर्वत्र रखरखाट जाणवत होता. जरा जोरात वारा आला की सगळीकडे धुळ पसरत होती. त्यातही मधूनच गार वाऱ्याची झुळुक आली की तेवढीच जीवाची तल्खली कमी होई.

अशा त्या निर्मनुष्य आणि तापलेल्या रस्त्यावर महाराज अनवाणी पायांनी झपाझप पावले टाकीत कुठेतरी जात होते. आज सकाळपासून त्यांचा वेळ खूप धावपळीत गेला होता. त्यांना हनुमानवाडीत येऊन आता दहा बारा दिवस झाले होते. त्यांच्या रोजच्या निरनिराळया घरी माधुकरी मागण्याच्या पद्धतीमुळे ते गावातल्या सगळया लोकांना आता ते परिचीत झालेले होते.

सकाळपासूनचा त्यांचा दिनक्रम आता ठरल्यासारखाच झाला होता. ते रोज पहाटे ब्राह्ममुहूर्तावर उठत असत. उठल्या उठल्या प्रथम ते देवाचा गाभारा स्वच्छ झाडायचे. त्यानंतर एक तास ते ध्यानाला बसत. तिथपर्यंत त्यांच्या बरोबर तिथेच झोपायला येणारे गणा वगैरे चौघेजणदेखील उठत असत. मग सगळे मिळून देवालयाचे आवार स्वच्छ करीत असत. लगेचच ते नदीवर जाऊन स्वच्छ आंघोळी करीत असत. आंघोळी नंतर महाराज काकड आरती करीत असत. त्यानंतर प्रात:स्मरण, व्यायाम झाल्यावर हे चौघेही आपापल्या घरी जात असत. सकाळी साडेसात वाजता गावातली १०-१२ मुले महाराजां जवळ मनाचे श्लोक, छोटी स्तोत्रे शिकण्यासाठी येत असत. येत्या हनुमान जयंती पर्यंत मारुती स्तोत्र पाठ करण्याचा त्या मुलांचा निर्धार होता.

काल रात्री बोलता बोलता हेमंत म्हणाला होता, त्याची मोठी भावजय गेले अनेक दिवस आजारी आहे. अन्नावर वासना नाही, खूप अशक्तपणा आला आहे. त्वचादेखील पांढुरकी झाली आहे. त्यामुळे घरातले सगळे वातावरणच बिघडले आहे. त्याच्या या भावजयीचा स्वभाव खूप चांगला होता. त्याच्या घरातील सर्वजण त्याची हेटाळणी करीत असले तरी ती नेहमी त्याचीच बाजू घेत असे. त्यामुळे हेमंतचा तिच्यावर खूप जीव होता. हेमंतने महाराजांना रात्री हे सर्व सांगितले होते. तेव्हा महाराजांनी त्याला दिलासा दिला होता. त्याचवेळी उद्या दुपारी भिक्षेला जाताना त्याच्या घरी येऊन त्याच्या भावजईला भेटण्याचे त्यांनी कबुलही केले होते. आता ते झप झप त्याच्याच घरी चालले होते.

हनुमानवाडीतील मुख्य रस्त्यावरचे धुमाळांचे साधे घर कौलारु होते. घराच्या पुढे मागे अंगण होते. घराच्या मागे परसबाग होती. त्या परसबागेत घराच्या पूजेसाठी लागणाऱ्या फुलांची झाडे, पारिजातकाचे, पांढऱ्या चाफ्याचे, थोडाफार भाजीपाला, थोडीफार औषधी झाडे लावलेली होती. पुढच्या अंगणात शेवंती, गुलबाक्षी, गुलाब अशी फुलझाडे लावलेली होती. त्या झाडांना सकाळीच पाणी घातले होते तरीही ती कडक उन्हाने कोमेजली होती. हेमंत हा धुमाळांचा धाकटा मुलगा होता. त्या घरांत हेमंत आणि त्याचे लग्न झालेल्या भावांसह रहात होता. हेमंत त्याच्या मोठ्या भावाजवळ रहात होता.

महाराज झपझप पावले टाकीत हेमंतच्या वेशीतून आत शिरले. दारात हेमंत आणि त्याचा मोठा भाऊ त्याची वाटच बघत होते. महाराज आत शिरताच हेमंत त्यांना अंगणाच्या कोपऱ्यातील सिमेंटने बांधलेल्या पाण्याच्या टाकीजवळ नेले. त्या टाकीच्या गार पाण्याने आपले हात पाय स्वच्छ धुतले. थोडे पाणी आपल्या चेहऱ्यावरदेखील मारले.

ते म्हणाले, पाणी खूप छान आहे! थंडगार पाण्याने खूप बरे वाटले! या उन्हाने अंगाची लाही लाही होते, नाही?

हो आणि अशा भयंकर उन्हात तुम्ही अनवाणी पायाने चालत आलांत! खरंच धन्य आहे तुमची! हेमंत म्हणाला. बोलत बोलत दोघजणं घरात शिरली. तेथे हेमंतचा मोठा भाऊ दिनकर त्यांची वाट बघत होता.

या महाराज! बसा असे निवांत! आमच्या गरीबांच्या घराला आपले पाय लागले, आनंद झाला! अरे हेमंता, महाराजांना गुळ पाणी आणं! हेमंतचा भाऊ महाराजांचे स्वागत करीत म्हणाला.

होय दादा! आत्ता आणतो! हेमंत असे म्हणून गुळ पाणी आणायला आत गेला आणि घरातून ताटलीत गुळाचा खडा आणि तांब्यात पाणी घेऊन आला. ती ताटली आणि पाण्याचा तांब्या महाराजांना देत तो म्हणाला घ्या महाराज! गुळ पाणी घ्या!

त्यानंतर त्याने आपल्या भावाची महाराजांशी ओळख करून देत तो म्हणाला, काका! हा माझा मोठा भाऊ दिनकर. आपल्या आणि शेजारच्या दोन गावाचा तो तलाठी आहे.

नमस्कार महाराज! परवा मला शेळके गुरुजी भेटले होते, ते आपल्याबद्दल बरंच सांगत होते. आमच्या हेमंतला तर तुम्ही पारच बदलून टाकलेत. त्याची वहिनीतर तुमच्यावर खूपच खुष आहे. कारण हेमंत तिचा जीव की प्राण आहे. आमचे लग्न झाले तेव्हा हेमंत जेमतेम दहा वर्षाचा होता. तो तिला धाकट्या भावासारखा आहे.

हो हेमंतने रात्री सांगितले मला! त्या आजारी आहेत असेही तो म्हणाला होता! काय होतय त्यांना? महाराजांनी आस्थेने विचारले.

काय सांगु गेले गेले पंधरा वीस दिवस आजारीच आहे. अंग नुसत फिक्कट पडले आहे, अन्नावर वासना नाही तालुक्यातल्या डॉक्टरांकडे नेले होते. त्यांच्या औषधाने चार दिवस बरे वाटले परत पहिल्यासारखे सुरु झाले. कोण काय म्हणतय! कोण काय! दिनकर दादांनी सांगितले.

बरं! बरं! आपण बघुया त्यांना! येतील का त्या बाहेर ? महाराजांनी विचारले.

काका, तिला कशाला त्रास द्यायचा? आपणच आत जाऊया! हेमंत बोलला.

ठिक आहे, चला! असे म्हणून महाराज हेमंत आणि दिनकर दादांच्या पाठोपाठ वहिनींच्या रुममध्ये गेले.

आत जाताच हेमंतने वहिनींला हाक मारली, वहीनी उठं! बघं कोण आलेय तें!

हेमंतचा आवाज आल्यावर कॉटवर झोपलेली हेमंतची वहिनी ज्योत्स्ना उठून बसु लागली. ते पाहिल्यावर महाराज पुढे झाले आणि ते म्हणाले, वहिनी उठायची काही जरुरी नाही! त्यानी आपल्याला त्रास होईल आणि घाबरु नका तुम्हाला काही झाले नाही.

हेमंतनी महाराजांना बसायला खुर्ची दिली. त्यावर बसता बसता महाराजांनी विचारले, हं! आता मला सांगा तुम्हाला काय होतयं?

काही नाही हो! खूप अशक्तपणा वाटतोय आणि ही नख बघा कशी पिवळसर झाली आहेत! ज्योत्स्ना वहिनींनी सांगितले.

बघु! असे म्हणून महाराजांनी ज्योत्स्ना वहिनिंची नखे नीट निरखुन पाहिली. नंतर त्यांनी त्यांचे डोळेही पाहिले डोळयातही त्यांना पिवळसर झाक दिसून आली. नंतर ते हेमंतच्या दादांना म्हणाले, हे बघा दिनकरराव यांचे डोळे आणि नखेही पिवळी दिसायला लागली आहेत. माझ्या मते यांना काविळीचा त्रास होतोय. आता

पाणी आटत चालले आहे त्यामुळे ते प्रदुषित होते आहे. तेव्हा आता सगळयांनीच पाणी उकळून गाळून प्या. या काविळीवर मला एक झाडपाल्याचे औषध माहित आहे. आपण म्हणत असाल तर ते मी हेमंतबरोबर पाठवुन देईन. मात्र त्याला कडक पथ्य पाळायला लागेल.

हो कृपा करून पाठवुन द्या. आणि काय पथ्य पाळायचे तेही सांगा. दिनकरदादा म्हणाले.

तेलकट, तिखट, मसालेदार पदार्थ एकदम वर्ज्य, वातुळही खायचे नाही. एकदम सात्विक आहार घ्यायचा. हेच पथ्य आहे असे महाराजांनी सांगितले.

काही हरकत नाही! दुखण्यातून बरे व्हायला पथ्य पाळायलाच पाहिजे. दिनकरदादांनी वहिनींकडे बघत सांगितले. त्यावर ज्योत्स्ना वहिनींनी संमतीदर्शक मान हलवली.

महाराज, आपण आता आपण येथून जेऊनच जा! आता एवढ्या उन्हाचे भिक्षा मागायला कुठे जाणार? अरे हेमंत! महाराज आता आपल्या बरोबरच जेवतील! दिनकरदादांनी महाराजांना काही बोलु दिलेच नाही.

ठिक आहे! जशी समर्थांची इच्छा! पण एक करा मला आग्रह करायचा नाही. एकदाच पानात अथवा पत्रावळीत थोडेसे अन्न वाढा, मला आवश्यक तेवढेच मी घेईन. महाराजांनी निक्षुन सांगितले.

मग दिनकरदादांनी महाराजांच्या इच्छेनुसार त्यांना पत्रावळीत वाढले. त्यांनी रोजच्या प्रथेप्रमाणे काकबली आणि माशांचा भाग त्यातून काढला आणि उरलेले अन्न त्यांनी सेवन केले. जेवण होताच महाराज आपल्या स्वस्थानी मारुती मंदिरात निघून गेले.

# ८

सरपंच नुकतेच ओसरीवर येऊन बसले होते. त्यांची दैनंदिन पूजाअर्चा होताच राधाकाकूंनी त्याना नाश्ता आणि दूध घेण्यासाठी स्वयंपाकघरात बोलावले होते. नाश्ता करता करता त्यांनी आज संध्याकाळी सात वाजता मारुती मंदिरात विशेष सभा असल्याचे सांगितले. त्या सभेला त्यांनाही यायला हवे हे त्यांनी आवर्जुन सांगितले. ओसरीवरच्या खुर्चीत बसून ते आज आलेले पेपर बघत होते. तेवढ्यांत त्यांनी वेशीतून पांच सहाजण आत येताना दिसले त्यांच्या सोबत काही बायकाही दिसत होत्या.

तेवढ्यांत त्यांच्यापैकी अर्जुन शिर्के पुढे झाले आणि त्यांनी सरपंचाना नमस्कार करून आपली ओळख करून दिली. ते म्हणाले, नमस्कार काका! मी अर्जुन शिर्के! शेजारच्याच खेर्डी गावात रहातो.

नमस्कार! अर्जुन शिर्के म्हणजे, गोविंद शिर्केचा कोण? गोविंद शिर्के आणि मी एकाच वर्गात शिकायचो! सरपंच बोलले. पण ही मंडळी कोण? आपल्या भागातली दिसत नाहीत.

काका मी त्याच गोविंद शिर्केचा मुलगा! मला बाबा बोलले होते तुमच्याबद्दल. ही लोक स्वाध्यायी आहेत. आमच्याकडे खेर्डीला प. पू. पांडुरंगशास्त्री आठवले प्रेरीत स्वाध्याय केंद्र चालते. पुढच्या आठवड्यामध्ये आमच्याकडे खेर्डीला जिल्ह्याचे भावमिलन होणार आहे. त्या करिता ही लोक गुजराथमधून आली आहेत. स्वाध्यायाच्या परंपरेप्रमाणे ज्या गावात स्वाध्यायाचे काम नाही त्या गावात आमचे बंधु भगिनी भक्ती फेरीला जाऊन रहातात. स्वाध्यायाचे विचार लोकांना सांगतात. त्या करीता हे बंधु आणि भगिनी आपल्या गावात रहाणार आहेत. त्यासाठी आपली

परवानगी घेण्यासाठी आम्ही आपणाकडे आलो आहोत. अर्जुनने सविस्तर माहिती दिली.

ठिक आहे! पण आपण सगळे आत या नां! बाहेर उभे राहुनच का बोलणार आहात? आपण आत या बसा आणि बोला! सरपंचांच्या म्हणण्याप्रमाणे सर्वजण आतमध्ये येऊन स्थानापन्न झाले.

त्यानंतर सरपंचानी त्यांचे स्वागत केले. या मंडळी बसा! आमच्या हनुमानवाडीत मी आपले स्वागत करतो! अरे अर्जुन या मंडळींची ओळख करून देना! सरपंचांनी अर्जुनला सांगितले. तेवढ्यात सरपंचांनी आतून राधाकाकूंनाही बोलावले. राधाकाकू आल्यावर त्यांनी महिलांची विचारपुस केली. सर्वांना पाणी दिले. लगेचच अर्जुनने आलेल्या लोकांची ओळख करून दिली.

काका हे नवनितभाई सौराष्ट्रातील भावनगर जवळच्या साबर या गावातून आले आहेत. हे हरेशभाई, अशोकभाई आणि हे सागरभाई, या कुमुदताई, वैष्णवी ताई आणि या निर्मलाताई, ही सर्व मंडळी त्या साबर गावातीलच आहेत. अर्जुनने सर्वांची ओळख करून दिली. त्याचबरोबर आम्हाला आपल्या गावात चार दिवस भक्ति फेरीला परवानगी द्यावी अशी विनंती ही केली.

काही हरकत नाही! आपण सर्वजण खुषाल रहा गावामध्ये. चांगल्या कामाकरिता या गावात आला आहात तेव्हा आपले स्वागतच आहे. पण आता ही मंडळी रहाणार कुठे? आमच्याकडे रहात असलात तर उत्तमच. यांच्या बरोबर महिलादेखील आहेत तेव्हा, सगळेजणच रहातील आमच्याच घरात! काय? सरपंचांनी आपला विचार सांगितला.

त्यावर नवनितभाई म्हणाले, जय योगेश्वर सरपंचसाहेब! आपण आम्हाला आपल्याच घरी रहायला सांगताय याचा आम्हाला आनंद झाला. परंतु भक्तिफेरीला आल्यावर शक्यतो कोणाचाही घरी राहु नये असा रिवाज आहे. तेव्हा एखाद्या मंदिरात जमले तर ठिक होईल. कृपया आपण नाराज होऊ नका!

मंदिरात म्हणजे गावातल्या मारुती मंदिरात आपण राहू शकता. पण तिथे महिलांना रहायचे म्हणजे जरा प्रश्न आहे. कारण तिथे आडोसा असा नाही. तसा महिलांना कपडे वगैरे बदलायला आडोसा करून देता येईल! त्याचा काही प्रश्न नाही.

दुसरे म्हणजे तिथे सध्या तिथे आपल्यासारखेच या गावात पाहूणे आलेले रामदासी महाराज रहातात. म्हणजे ते तिथे जेवण वगैरे नाही बनवत. गावात भिक्षा मागून ते आपला उदर निर्वाह करतात. पण दिवसातला बराचवेळ ते तिथेच असतात. पहाटेपासून त्यांचे तिथे काहीना काही पठण वाचन चालू असते. गावातली मुलेही तिथे त्यांच्याजवळ काही ना काही शिकायला येतात. तर असे ठिकाण तुम्हाला चालेल कां? सरपंचांनी विचारले.

त्यावर नवनितभाईंनी उत्तर देण्याअगोदरच कुमुदताई बोलल्या, सरपंच साहेब! त्या मंदिरात जर असे सत्पुरुष रहात असतील तर आम्ही तिथेच राहू. तेवढाच आम्हालाही सत्संग होईल. आणि आम्ही जेव्हा भक्तिफेरीला बाहेर पडतो तेव्हा उघड्या माळरानावरही रहाण्याची तयारी केलेली असते. तेव्हा कपडे बदलायला आडोसा वगैरे करून देण्याचीही जरुरी नाही. आता आम्हाला निरोप द्या. आम्ही मारुती मंदिरात रहायला जातो.

तेवढ्यांत राधाकाकू पुढे झाल्या आणि म्हणाल्या, आपण एवढ्या लांबून आमच्या गावात आलात तेव्हा मी तशीच कशी जाऊ देईन? आता आपण इथेच जेवा मग दुपारी उन्ह उतरल्यावर तिकडे जावा.

त्यावर निर्मलाताई पुढे झाल्या आणि म्हणाल्या, ताई आपण जेवायचे निमंत्रण दिलेत आम्हाला खूप आनंद झाला! परंतु भक्तिफेरीचे काही नियम आहेत आणि त्या नियमाप्रमाणे आम्ही आमचा शिधा बरोबर घेऊन येतो. आम्हाला कोणाकडेही खायला प्यायला परवानगी नाही. कृपया राग मानु नका. आपण दिलेले पाणी आम्ही प्यायलो त्यात सSSर्व पाहूणचार आला.

मगं निघु का आम्ही सरपंचकाका? अर्जुनने विचारले.

त्यावर सरपंच बोलले, चला! मीच तुमच्या बरोबर येतो आणि तुमची सोय लाऊन देतो.

*******

आज चैत्र पोर्णिमा आणि आज हनुमान जयंती. हनुमानवाडीच्या दृष्टीने आजचा दिवस महत्वाचा होता. गेली अनेक वर्षे गावातील मारुती मंदिरात हनुमान जयंती उत्सव साजरा केला जात असे. आज मारुती मंदिराचा परिसर रंगी बेरंगी पताकांनी सजवलेला होता. मंदिराचे आवार स्वच्छ करून जमिनीवर पाणी मारून धुळ उडणार नाही याचा बंदोबस्त केला होता. या कामामध्ये गावातल्या तरुण मुलांनी उत्साहाने भाग घेतला होता. त्यामध्ये हेमंत, गणेश, हेरंब, जितेंद्र यांच्या व्यतिरिक्त पांडुरंग यादव, लक्ष्मण गोरिवलेदेखील मदत करीत होते.

आज पहाटेच महाराजांनी आपले दैनंदिन कार्यक्रम उरकल्यानंतर खास हनुमान जयंती निमित्ताने मारुतीरायांना रुद्राचा अभिषेक केला होता. हनुमान जयंती निमित्ताने आज संध्याकाळी सात वाजता येथे गावकऱ्यांची एक विशेष सभा आयोजित केलेली आहे. सरपंचांनी महाराजांना या सभेत गावकऱ्यांना देवाच्या चार गोष्टी सांगाव्यात अशी विनंती केली होती.

आता सकाळचे साडेनऊ वाजले होते. नुकतीच सर्व कार्यकर्ती तरुण मंडळी साफसफाईचे आणि सजावटीचे काम पूर्ण करून घरी गेली होती. महाराज झालेल्या सर्व कामांच्यावर नजर टाकीत मंदिराच्या आवारात उभे होते. तेवढ्यात त्यांना समोरून सरपंच आणि काही मंडळी येताना दिसत होती.

महाराजांनी त्यांना सामोरे जाऊन त्यांचे स्वागत केले. या सरपंच साहेब! आपण आत्ता या वेळी कसे काय? आपण तर एकदम संध्याकाळीच येणार होतेत नां?

होय महाराज! मी तसेच ठरवले होते. पण ही स्वाध्यायी मंडळी घरी आली होती, त्यांना घेऊन आलोय! ही लोक गुजराथ मधून भक्तिफेरी करिता आपल्या गावात आली आहेत. सरपंच म्हणाले.

मंदिराच्या आवारात शिरल्यावर आजुबाजुला सर्व चकाचका झालेले पाहून ते म्हणाले, संध्याकाळच्या सभेची तयारी पूर्ण झालेली दिसते. आवार एकदम झकपक झालेले दिसत आहे. पण चला आपण आतच जाऊ, तिथेच मी तुम्हाला सर्वांची ओळख करून देतो.

सगळेजण या दोघांच्या पाठोपाठ मंदिरात गेले. प्रथम सगळयांनी मारुतीरायाचे दर्शन घेतले. नंतर महाराजांनी तेथेच असलेली मोठी सतरंजी अंथरायला घेतली. ते

बघून सरपंच त्यांच्या मदतीला गेले. त्या दोघांना काम करताना पाहून अर्जुनने सतरंजी आपल्या ताब्यात घेतली आणि त्याने ती व्यवस्थित अंथरली. सतरंजी अंथरल्यावर सर्वजण त्यावर बसली.

सर्वजण बसताच सरपंचांनी त्यांची महाराजांना ओळख करून दिली. महाराज म्हणाले, आपण स्वाध्यायी आहात हे ऐकून आनंद वाटला. कारण प. पू. दादा ज्या रोह्याचे आहेत त्या जिल्ह्यातच माझे गाव आहे. मी दादांची अनेक प्रवचने ऐकली आहेत. ठाण्याला विद्यापिठातही जाऊन आलेला आहे. आमच्या गावात योगेश्वर कृषी हा दादांचा प्रयोगदेखील केला गेलेला आहे. पण दुर्दैवाने ते आता सगळे संपले आहे.

महाराज ही लोक आता चार दिवस येथेच रहाणार आहेत! आपल्याला काही त्रास तर नाही नां होणार? सरपंचांनी महाराजांना विचारले.

अहो सरपंच मला कसला त्रास होणार? उलट यांनाच माझा त्रास होऊ शकतो. मला काय मारुतीचे देऊळ काय आणि देवीच्या डोंगरावरचे सोमजाई मंदिर काय सर्व सारखेच आहे. उलट यांना जर अडचण होणार असेल तर मीच चार दिवस सोमजाई मंदिरात राहिन. महाराज म्हणाले.

या दोघांच्या संवादात हस्तक्षेप करीत नवनितभाई म्हणाले, सरपंच आणि महाराज मी आपणा दोघांनाही सांगतो, महाराजांना कुठेही जायची गरज नाही. उलट त्यांचा सत्संग आम्हाला मिळतोय याचा आम्हाला खूप आनंद आहे.

ठिक आहे! पण आता आपल्याला या महिलांकरिता काहितरी आडोसा करायला पाहिजे. सरपंच बोलले.

त्यावर महाराजांनी सरपंचांना सांगितले ती व्यवस्था मी करून घेईन. आपली तरुण कार्यकर्ते मंडळी जेवण झाल्यावर येणारच आहेत त्यांना मी ते काम सांगतो. ते आवडीने करतील.

*******

संध्याकाळचे साडेसहा वाजले होते. मारुती मंदिराच्या आवारात सगळीकडे लाईटिंग केलेली होती. मधून मधून खांब रोवुन त्यावर फ्लडलाईटसही लावले होते. खाली जमिनीवर जाजम अंथरले होते. मारुतीच्या गाभाऱ्यांत लावलेल्या उदबत्यांचा सुवास बाहेर सुद्धा दरवळत होता. त्याच्या जोडीला आवारात सर्वत्र मातीच्या घमेल्यामध्ये निखारे घालून त्यांत धूप घातलेला होता. त्यामुळे वातावरण एकदम सुगंधित झाले होते.

जाजमावर एका बाजुला सरपंच हंबीरराव, महाराज, शेळके गुरुजी, गणा, हेरंब, जितू, हेमंत, हेमंतचे मोठे भाऊ दिनकरदादा, पांडुरंग यादव, लक्ष्मण गोरिवले, गुजराथमधून आलेले स्वाध्यायी बंधू शिवाय गावातले इतर १५-२० लोक बसली होती. दुसऱ्या बाजुला राधाकाकू, निर्मलाताई, कुमुदताई, वैष्णवीताई, हेमंतची वहिनी ज्योत्स्ना शिवाय गावातल्या पांच सहाजणी बसलेल्या होत्या.

बरोबर सात वाजता लक्ष्मण गोरिवले उठून उभे राहीले. गाभाऱ्यात जाऊन त्यांनी मारुतीरायाला नमस्कार केला. मग बाहेर येऊन आवारात बसलेल्या सर्व लोकांच्या समोर येऊन सर्व गावकऱ्यांना नमस्कार केला. सर्व गावकऱ्याचे स्वागत करीत त्यांनी बोलायला सुरवात केली.

ते म्हणाले, माझ्या सर्व गावकऱ्यांनो हनुमान जयंतीच्या शुभ दिवसाला आपली आजची विशेष सभा सुरु होत आहे. आपल्या आजच्या सभेला गुजराथ मधून भक्ति फेरीला आलेले स्वाध्यायी बंधूदेखील हजर आहेत. मी त्यांचे गावकऱ्यांच्यावतिने त्यांचे स्वागत करतो. त्याचप्रमाणे आपल्या गावात गेले १०-१२ दिवसांपासून रहात असलेले रामदासी महाराजही आज आपल्या सोबत येथे उपस्थित आहेत. आपण सर्वजणांना आता ते परिचीत आहेतच. त्यांचेही आपल्या सर्व गावकऱ्यांच्या वतीने स्वागत करतो. कालच आपला सोमजाईचा उत्सवदेखील संपन्न झालेला आहे. सोमजाईमंदिर परिसराची तसेच आपल्या या मारुती मंदिराची अवस्था काय झाली होती ते आपण सर्व गावकरी जाणताच. पण त्या दोन्ही ठिकाणी आपल्या या महाराजांच्या प्रेरणेने आपल्या गावातील तरुणांनी खास सफाई मोहिम राबवली त्यामुळे त्या दोन्ही ठिकाणी झालेला कायापालट आपण अनुभवतोच आहोत. आता मी आपल्या सरपंचांना विनंती करतो की त्यांनी आजच्या ग्रामसभेच्या कामाला सुरवात करावी.

तत्पुर्वी आज आपल्या या हनुमान जयंतिच्या विशेष सभेमध्ये आपल्या गावातली आपलीच मुले महाराजांनी शिकवलेले मारुती स्तोत्र म्हणतील. तेव्हा आता प्रथम आपण आपल्याच मुलांच्या तोंडून मारुती स्तोत्र ऐकुया. लक्ष्मणने खूण करताच हेमंतने मारुती स्तोत्र म्हणणाऱ्या अकरा मुलांना मारुती मंदिराच्या कट्यावर तयार केलेल्या खास बैठकीवर बसविले. तिथे बसून त्या मुलांनी स्वच्छ आणि खड्या आवाजात मारुती स्तोत्र म्हणायला सुरवात केली.

भीमरुपी महारुद्रा, वज्रहनुमान मारुती|

वानरी अंजनीसुता, रामदुता प्रभंजना||१||

आपल्याच मुलांच्या तोंडून म्हटले जाणारे हे स्वच्छ आणि खड्या आवाजातील मारुती स्तोत्र ऐकून गावकऱ्यांना धन्य वाटले. त्या मुलांच्या पालकांच्या तोंडावर

तर स्पष्टपणाने आपल्या मुलांचा अभिमान दिसत होता. ते महाराजांकडे कृतज्ञतेने बघत होते. मुलांचे मात्र कोणाकडेच लक्ष नव्हते ते डोळे मिटून मारुतीस्तोत्र म्हणत होते.

रामदासी अग्रगण्यु, कपीकुळासी मंडणु|

रामरुपी अंतरात्मा, दर्शने दोषनासती||

|| इती श्री रामदासकृतं संकटनिरसनं मारुतीस्तोत्रं सम्पूर्णं ||

असे म्हणून त्यांनी आपले पठण पूर्ण केले. त्या मुलांचे पठण संपताच तिथे हजर असलेल्या सर्वांनी टाळया वाजवुन त्यांचे कौतुक केले. मारुतीरायाला नमस्कार करून ती मुले आपल्या जागेवर जाऊन बसले. मुले जागेवर जाऊन बसताच परत सरपंच उभे राहिले त्यांनी सर्व गावकऱ्यांचे व पाहुण्यांचे स्वागत केले. सभेचे नेहमीचे विषय संपल्यावर त्यांनी महाराजांना सांगितले, महाराज आता आपण आम्हाला मार्गदर्शन करावे ही विनंती आहे.

महाराज आपल्या जागेवरून उठले मारुतीरायाला वंदन केले आणि मंदिराच्या कट्टयावरील आसनावर जाऊन बसले. तिथे बसून त्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधायला सुरवात केली.

माननिय सरपंच साहेब, दिनकरदादा धुमाळ, गुजराथ मधून आलेल्या सर्व स्वाध्यायी बंधु भगिनी, हनुमानवाडीच्या गावकरी बंधु भगिनी आपणा सर्वांना माझा नमस्कार. गेले १०-१२ दिवस मी आपल्या गावात रहात आहे. आपणच घातलेल्या भिक्षेवर हा देह धारण करतो आहे. आपण सर्वजण मला महाराज म्हणता आहात. पण खरोखरच मी कोणी महाराज नाही. दुर्दैवाच्या मोठ्या फटक्याने मी मलाच ओळखत नव्हतो. परमेश्वराच्या कृपेमुळे मला सज्जनगडाचा मार्ग सापडला. तेथे समर्थांचा सत्संग झाला त्यामुळे मी परत माणसात आलो.

तेथील सत्संगाने मला कळले मी जो माझा संसार, माझे घर, माझी मुलेबाळे करत होतो. ते सर्व क्षणभंगुर आहे. हा देहदेखील माझा नाही. त्या देहावरदेखील अनेकजण आपला अधिकार सांगतात.

त्यानंतर मात्र मला सज्जनगडावरील माझ्या ऐतखाऊपणाचा कंटाळा आला. वाटू लागले हा देह नश्वर आहे तर त्याचे चोचले पुरवण्यांत काय अर्थ आहे? त्यामुळे या नश्वर देहाचा समाजाकरिता जास्तीत जास्त उपयोग करायचा. त्याचे लाड करायचे नाहीत. त्याच उद्देशाने मी सध्या भटकत आहे.

गेली तिन चार वर्षे मी सज्जनगडावर होतो. समर्थांचा सहवास लाभला. रामदासी संप्रदाय जवळून पहाता आला. त्यामुळे आता उरलेले आयुष्य संसाराच्या व्यापात न पडता भिक्षा मागून देह जगवायचा. कोणाच्याही घरी रहायचे नाही असे समर्थांच्या चरणी वचन देऊन मी सज्जनगड सोडला आहे. पुढचा मार्ग आता समर्थच दाखवतील.

आज आपण हनुमान जयंतीच्या निमित्ताने एकत्र जमलो आहोत. तेव्हा प्रथम आपण त्याते स्तवन करुयात.

मनोजवं मारुततुल्यवेगं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।

वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥

समर्थ रामदासस्वामींनी गावोगावी हनुमान मंदिराची स्थापना केली. त्यांनी स्थापन केलेला मारुती हा शक्तीचा उपासक आहे. त्याच्या एका हातात गदा आहे तर दुसऱ्या हातावर त्याने द्रोणागिरी पर्वत उचललेला आहे. मारुती हा बुद्धिमतां वरिष्ट आहे. तो अत्यंत बुद्धिमान होता म्हणूनच त्याला रामरायांनी आपला दूत म्हणून रावणाकडे पाठविले होते. त्या मारुतीरायांची उपासना म्हणजेच शक्तिची उपासना आपल्याला करायला पाहिजे. बुद्धिची उपासना आपण करायला पाहीजे. आपल्या युवकांना चांगले मार्गदर्शन देऊन त्यांना उद्योगी बनवले पाहिजे. आपली

युवाशक्ति जर बेकार राहिली तर ती वाईट मार्गाला लागेल. पण जर त्यांच्यातल्या गुणांना वाव दिला तर ते आपल्या घराचा, आपल्या गावाचा, आपल्या देशाचा उद्धार करतील यात शंका नाही. तेव्हा मला आपणाला एवढेच सांगायचे आहे की त्या युवाशक्तिला वाव द्या. त्यांना उद्योगी बनवा. एवढे बोलून मी माझे चार शब्द पुरे करतो.

महाराज जागेवरून उठताच सरपंच पुढे झाले व त्यांनी महाराजांच्या भाषणावर आपली प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, महाराज आपण सांगितलेले विचार मला तंतोतंत पटले आहेत. आज मी हनुमानजयंतीच्या प्रसंगी आपल्याला आश्वासन देतो की, मी गावातल्या तरुणांना त्यांच्या मध्ये असलेल्या कौशल्यानुसार उद्योग उपलब्ध करून देण्याचा पूर्ण प्रयत्न करेन. आता आपली ही हनुमान जयंती निमित्ताने आपण घेतली विशेष सभा मी आटोपती घेतो. तरीही आपण कोणीही घरी जाऊ नये. आता आपल्या समोर आपल्या गावात गुजराथ मधून आलेले आपले स्वाध्यायी बंधु त्याचा कार्यक्रम सादर करणार आहेत.

******

सरपंचांनी स्वाध्यायी बंधुंना त्यांचा कार्यक्रम सादर करण्यास सांगितल्यावर अर्जुन शिर्के उठले व त्यांनी प्रथम गावकरी बांधवांना आपली ओळख करून दिली. ते म्हणाले, सर्व हनुमानवाडीतील गावकऱ्यांना माझा “जय योगेश्वर”. मी आपल्या जवळच्या खेर्डी येथिल गोविंद शिर्केंचा मुलगा अर्जुन. आमच्या गावात प. पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या प्रेरणेने सुरु झालेले स्वाध्याय केंद्र आहे. त्या केंद्रात येत्या गुरुवारी पूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या स्वाध्यायी बंधूंचा भावमिलन कार्यक्रम होणार आहे. त्या कार्यक्रमाचाच एक भाग म्हणून आपल्या गावात गुजराथच्या सौराष्ट्र भागातील साबर या गावातून नवनीतभाई, हरेशभाई, अशोकभाई,

सागरभाई, निर्मलाताई, कुमुदताई आणि वैष्णवीताई हे स्वाध्यायी बंधू भगिनी भक्ति फेरीला आलेले आहेत. ते दोन दिवस आपल्या गावातील घराघरात वाडी वाडीत फिरतील आणि स्वाध्यायाचे विचार आपल्याला सांगतील. भक्तिफेरीचा एक भाग म्हणजे आज आपल्या या मारुती मंदिरात नवनीतभाऊ स्वाध्याय केंद्र घेतील.

अर्जुन शिर्के स्वाध्यायाची पार्श्वभूमी सांगत होते तिथपर्यंत अशोकभाई आणि निर्मलाताई यांनी मारुती मंदिराच्या कट्यावरील विशेष आसनावर त्यांच्या सोबत आणलेला प. पू. पांडुरंगशास्त्री आठवले, योगेश्वर श्रीकृष्ण, शंकर-पार्वती-गणपति यांचा एकत्र असलेला फोटो पाटावर ठेवला. त्या फोटोला ताज्या फुलांचा हार घातला. तुपाचे निरांजन लावले. चंदनाचा सुगंध असलेल्या उदबत्या लावल्या. त्यानंतर अर्जुन शिर्के यांनी नवनीत भाऊंना पुढे बोलावले.

नवनीतभाऊ मंदिराच्या कट्यावरील आसनावर गेले त्यांनी प्रथम मारुतीरायांना नमस्कार केला. पाटावर ठेवलेल्या योगेश्वर, गणपती, आणि दादांच्या फोटोला नमस्कार केला आणि कट्यावर गावकऱ्याच्या समोर बसले. सर्वप्रथम सर्व गावकऱ्यांना माझा जय योगेश्वर! त्यानंतर त्यांनी आपले डोळे मिटले व प्रगटस्वरांत योगेश्वर श्रीकृष्णाचे ध्यान मंत्र म्हटले.

**वसुदेवसुतं देवं कंस चाणूर मर्दनम् ।**

**देवकी परमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुम् ।।**

त्यानंतर हनुमान मारुतीचे ध्यान केले,

**मनोजवं मारुततुल्यवेगं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।**

**वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥**

आज आम्हाला हनुमान जयंतीच्या शुभदिनी आपल्याशी संवाद साधायची संधी दिल्याबद्दल माननिय सरपंच व आपणा सर्व ग्रामस्थांचे आभार मानतो. आपण सर्व त्या एका परमेश्वराची लेकरे आहोत. आपल्या सर्वांच्या शरिरात एकच लाल रंगाचे रक्त वहाते. एकाच मातीतून निर्माण होणारे अन्न आपण सेवन करतो. आपणा सर्वांना त्याच एका परमेश्वराने घडवले आहे. रोज आपण रात्री झोपतो ते सकाळी वेळेवर उठतो, दिवसभर आपली कामे करतो, भूक लागताच भोजन करतो रात्र होताच परत विश्रांती घेतो ती त्या परमेश्वराची आपल्यावर कृपा आहे म्हणूनच. आपण जे भोजन करतो त्याचे आपल्या शरिराला आवश्यक असणाऱ्या रक्तामध्ये आणि उर्जेमध्ये योग्य प्रमाणात तोच परिवर्तन करतो. त्याच्या या कृपेबद्दल आपण कृतज्ञता व्यक्त करणे म्हणजे स्वाध्याय.

स्वाध्यायामध्ये त्रिकालसंध्येला फार महत्व आहे. ती त्रिकाल संध्या म्हणजे काय आहे? सकाळी आपण वेळेवर उठतो ही त्याची आपल्यावर मोठी कृपाच आहे नाही का? उठल्यापासून आपण आपल्या शरिराचा भार त्या धरतीमातेवर सतत टाकत असतो. तीदेखील कोणतीही कुरकुर न करता आपला भार वहात असते. या सगळ्या गोष्टीकरीता आपण त्या परमेश्वराचे आभार मानायला हवेतच नां! म्हणूनच आपण सकाळी उठल्या उठल्या आपल्या हातामधल्या गोविंदाचे दर्शन घेतले पाहिजे.

आपले शरिर ज्या अन्नाच्या योगाने चालते. ते अन्न आपल्याला जो पुरवतो आणि त्या अन्नापासून शरिराच्या चलन वलनासाठी आवश्यक असणारे रक्त आणि उर्जा जो अचूकपणाने तयार करतो त्याच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले कर्तव्य आहे. मुख्य म्हणजे जो भूक निर्माण करतो त्याचे आपण अतिशय ऋणी असायला पाहिजे. आज अनेकांकडे गडगंज संपत्ती आहे पण त्यांची अन्नावर वासनाच निर्माण होत नाही. तेव्हा त्या परमेश्वराचे स्मरण आपण अन्न सेवन

करण्यापूर्वी करतो. आपण जे अन्न खातो ते त्याचा प्रसाद म्हणून खाल्ला तर त्याचा कोणताही दोष आपल्याला लागत नाही.

आपण दिवसभरात केलेली बरी वाईट कर्मे आपण त्याला अर्पण करतो. अनवधानाने आपण काही पाप कर्मे करतो त्याबद्दल रात्री झोपण्यापूर्वी आपण त्याची क्षमा मागतो. त्यानंतर त्या परमेश्वराला "त्वमेव माताच पिता त्वमेव त्वमेव सर्वं मम देव देव" असे म्हणून अनन्य भावाने त्याला शरण जातो. त्याची प्रार्थना करून झोपी जातो. अशाप्रकारे दिवसातून तिनवेळा आपण त्याची आठवण काढली तरी ती परमेश्वराला पुरेशी होते. हीच आपली त्रिकाल संध्या आहे.

मगाशी आपल्या महाराजांनी आपल्या प्रवचनामध्ये सांगितले की तरुणांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे काम दिल्यास, त्यांच्यातल्या गुणांना वाव दिला तर ते आपल्या घराचा, आपल्या गावाचा, आपल्या देशाचा उद्धार करतील हे बरोबरच आहे. प. पू. दादांनी म्हणजेच पांडुरंगशास्त्री आठवले यांनी याचाही विचार स्वाध्याय चळवळीत केलेला आहे. किनारपट्टीवरील मच्छीमार बांधवांसाठी योगेश्वर नौका, शेतकरी बंधूंसाठी योगेश्वर कृषी हे त्यांनी केलेल्या यशस्वी प्रयोगामुळे. अनेक गावातील बेरोजगार तरुणांना काम मिळाले. त्या कामात भक्ति असल्यामुळे ही तरुण मंडळी अतिशय आस्थेने काम करतात. त्यातून मिळणारे उत्पन्न प्रसाद म्हणून स्विकारतात. या अनोख्या त्यांच्या प्रयोगामुळे अनेकजण त्यांच्या नकळत व्यसनांपासून लांब गेले कारण त्यांना स्वाध्यायाचे व्यसन लागले.

आमच्याकडे अश्याच प्रकारचा आणखी एक प्रयोग दादांच्या प्रेरणेने केलेला आहे त्याचे नांव आहे "वृक्ष मंदिर". ज्या भागात पहाडी आहे, पावसाचे प्रमाण कमी आहे, पाणी कमी आहे जो भाग दुष्काळी बनला आहे अशा भागात हे प्रयोग सुरु आहेत. त्यातून हाताला काम मिळते आहे. पोटाला अन्न मिळते आहे. मात्र हे सगळे भक्तिभावाने केले जात आहे.

एवढे बोलून मी माझे हे वाङ्पुष्प योगेश्वराच्या चरणी अर्पण करतो आणि प्रार्थना करतो की परमेश्वरा सर्वांना सुखी ठेव, सर्वांना निरामय आरोग्य दे, सर्वांचे दु:ख दूर कर.

**सर्वेपि सुखिन: सन्तु सर्वे सन्तु निरामय:।**

**सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित दु:ख माप्नुयाSSत् ।।**

**ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥**

नवनितभाईंच्या चिंतनिके नंतर दोन तिन भावगीते झाली. त्यानंतर योगश्वराची आणि मारुतीची आरती होऊन आजचा कार्यक्रम संपन्न झाला.

***********

# ९

गोवेले स्वाध्याय केंद्राचा आज वर्धापन दिन होता. त्या निमित्ताने सिंधुदर्ग जिल्ह्याच्या स्वाध्यायींचा भावमिलन सोहळा आज साजरा केला जात होता. त्या निमित्ताने गोवेले गांव आज गजबजले होते. या सोहळ्याकरिता गुजराथ, गोवा, दिल्ली, केरळ या राज्यामधून स्वाध्यायी आलेले होते. ते गेले चार दिवस गोवेले परिसरातील गावांमध्ये भक्ति फेरी करिता गेलेले होते. त्यांच्या भक्तिफेरीची सांगतादेखील आज येथे होणार होती.

या कार्यक्रमाकरिता हनुमानवाडीहून सरपंच हंबीरराव, त्यांच्या पत्नी राधाकाकू, शेळके गुरुजी, महाराज, हेमंत, गणेश, हेरंब, जितेंद्र यांच्या व्यतिरिक्त पांडुरंग यादव, लक्ष्मण गोरिवले, हेमंतचे भाऊ दिनकरदादा, शिवाय ग्रामसेवक पंडित साहेब आणि सर्कल इन्स्पेक्टर आपटे साहेब एवढी लोक आली होती.

गोवेले येथिल स्वाध्याय केंद्र नेहमी गावातील मारुती मंदिरात भरत असे. आज भावमिलन सोहळ्याकरिता दोन अडिच हजार लोक उपस्थित रहातील अशी अपेक्षा होती. त्यामुळे गावातील शाळेच्या क्रिडांगणात हा सोहळा आयोजित केला होता. शाळेच्या क्रिडांगणामध्ये सुसज्ज मांडव घातलेला होता. तो फुलांनी सजवलेला होता. स्टेजवर योगेश्वर श्रीकृष्णाची आकर्षक अशी शाडुची मुर्ती सजवलेल्या टेबलावर ठेवलेली होती. त्या टेबलाच्या खालीच एका कोचावर प. पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांचा फोटो ठेवलेला होता. योगेश्वराच्या मूर्तीला आणि दादांच्या फोटोला गेंदेदार लाल गुलाबपुष्पांचा हार घातलेला होता. योगेश्वराच्या

बाजुला टेबलावर पांच ज्योतींची समई ठेवलेली होती. समईलादेखील फुलांच्या हाराने सजवले होते. योगेश्वरांच्या समोर पाण्याने भरलेला तांब्याचा चकचकित कलश ठेवलेला होता, त्यावर आंब्याचे पंचपल्लव आणि श्रीफळही होते. वातावरणांत एक वेगळाच सुगंध दरवळत होता.

सर्वप्रथम गोवेल्यातील वयोवृद्ध स्वाध्यायी गोविंद शिर्के यांना हाताला धरून स्टेजवर नेले. त्यांच्या हस्ते समईच्या पांचही ज्योतींचे प्रज्वलन करण्यांत आले. त्यानंतर त्यांना मानाने पहिल्या रांगेत नेऊन बसविण्यांत आले. आता आजच्या सोहळ्याचे सूत्रसंचालन गोवेल्याचे केंद्र प्रमुख अर्जुन शिर्के यांनी आपल्या हातात घेतले. उपस्थित असलेल्या सर्व स्वाध्यायींसह त्यांनी वसुदेव सुतं देवं.............. ही प्रार्थना म्हटली. या प्रार्थनेने आजच्या सोहळयाचा प्रारंभ झाला. प्रार्थना होताच एकेका गावच्या स्वाध्यायींनी अगोदरच ठरवुन ठेवलेली भावगीते सादर केली.

भावगीत गायना नंतर गुजराथमधील साबर येथून आलेल्या युवा बंधु भगिनिंनी दिप नृत्य सादर केले. ते बघून मंडपात उपस्थित असलेले सर्वचजण अतिशय प्रभावित झाले. कारण त्या नृत्याचे सादरीकरणच विलक्षण होते. डोक्यावर घेतलेल्या प्रज्वलित समया जराही न हलवता वाद्यांच्या ठेक्यात निरनिराळया पोज ती मुले मुली घेत होती. त्यांचे ते सादरीकरण संपताच टाळयांचा अक्षरश: गजर झाला.

अशाप्रकारे सांस्कृतिक कार्यक्रम पार पडल्या नंतर अर्जुन शिर्के स्टेजवर गेले. योगेश्वर श्रीकृष्णाला आणि दादांनावंदन केल्यावर ते तेथील आसनावर बसले. प्रथम त्यांनी सर्वांचे जय योगेश्वर असे म्हणून सर्वांचे स्वागत केले. मग त्यांनी वाङ्पुष्प फुलवायला सुरवात केली.

या मंडपात उपस्थित सर्वांचे गोवेले स्वाध्याय केंद्राकडून हार्दिक स्वागत. आज आमच्या गावाचे आमच्या केंद्राचे भाग्य थोर म्हणून या भावमिलन सोहळ्याचे यजमानपद गोवेल्याला मिळाले. गोवेले गांव अतिशय दुर्गम आणि पहाडी भागात वसलेले आहे. या अशा मागास आणि दुर्गम भागात जिथे जवळ कोणतेही शहर नाही, दळणवळणाची साधनेही पुरेशी नाहीत तिथे स्वत:ची शिदोरी बरोबर घेऊन निरनिराळ्या ठिकाणाहून आपला भाव घेऊन स्वाध्यायी बंधू येथे आलेले आहेत. त्यांचे सर्वांचे मी स्वागत करतो आणि त्यांना हे आश्वासन देतो की आम्हीदेखील असेच आपल्या भागांत आमचा बंधूभाव घेऊन येऊ.

आता मी श्री नवनीत भाईंना विनंती करतो की, त्यांनी आम्हाला मार्गदर्शन करावे. विशेषत: त्यांच्या कडे सुरु असलेल्या वृक्षमंदिरा बाबत आम्हाला फार उत्सुकता आहे.

********

नवनितभाईंनी आसनावर बसण्यापूर्वी योगेश्वर श्रीकृष्णाला आणि दादांच्या प्रतिमेला नमस्कार केला. त्यानंतर उपस्थित सर्वांनाही नमस्कार करून आपले विचार मांडायला सुरवात केली. सर्व स्वाध्यायी बंधू आणि भगिनिंनो प्रथमच मी आपणास सांगतो की मी कोणी परका नाही. तर आपला भाऊच आहे. त्यामुळे मगाशी अर्जुनभाऊंनी सांगितलेल्या दुर्गम भाग वगैरे गोष्टी बंधू प्रेमापुढे दुय्यम आहेत त्यांना महत्व देण्याची काहीच गरज नाही. आपण त्या एका योगेश्वराचीच लेकरे आहोत. असो, भगवद्गीतेमध्ये भगवंताने आपले अस्तित्व कशात आहे हे दहाव्या अध्यायात सांगितले आहे.

**यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन ।**

**न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ॥**

आपण स्वाध्यायी भगवद्गीतेतील विचारांचे आचरण करणारे आहोत. भगवद्गीतेमधील मी आत्ता सांगितलेल्या श्लोकांत भगवंतांनी आपले अस्तित्व या विश्वात कुठे कुठे आहे ते सांगितले आहे. ते म्हणतात ज्या पदार्थामध्ये मी नाही अशी वस्तुच या विश्वात अस्तित्वात नाही. आपल्याकडे एक म्हण आहे परमेश्वर जळी स्थळी काष्टी पाषाणी आहे. त्यामुळे देवाला शोधायला आपल्याला कुठेच जायची जरुरी नाही.

आपण तुळशीची पूजा करतो, वडाच्या झाडाची पूजा करतो, तेरड्याच्या झाडांची गौरी म्हणून पूजा करतो. आघाड्याच्या झाडाची ऋषी पंचमीच्या दिवशी पूजा करतो. उंबराच्या झाडाला गुरुदेव दत्तांच्या जागी मानतो. ज्या गवताला आपण पायदळी तुडवतो त्या दुर्वांनाही आपण पवित्र मानुन गणपतिला वाहतो. अशाप्रकारे आपण वनस्पतिंना देवत्व बहाल केलेले आहे. भगवद्गीतेमध्येच "अश्वत्थं सर्ववृक्षाणां" या श्लोकामध्ये माझे अस्तित्व सर्व वृक्षांमध्ये आहेच परंतु विशेषकरून पिंपळवृक्षामध्ये आहे असे वचन दिले आहे. तात्पर्य आपल्या आजुबाजुच्या प्रत्येक गोष्टींत परमेश्वर आहे. त्याला शोधायला कुठेही जायची जरुरी नाही.

हाच विचार घेऊन प. पू. दादांनी अनेक प्रयोग केले आहेत. योगेश्वर कृषी, योगेश्वर नौका हे त्यांचे प्रयोग तर महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी यशस्वी झाले आहेत. आमच्या कडे आमच्या गावात दादांचा "वृक्ष मंदिर" हा प्रकल्प चालू आहे. त्यामागे उद्देश "स्थानिक परिस्थितीनुरुप युवांच्या मदतीने सन्मार्गाने, अभिमानाने, आणि आत्मसन्मानाने त्यांच्यातील कौशल्य वापरून त्यांचा स्वत:चा, त्याच बरोबर कुटुंबाचा, समाजाचा, गावाचा उत्कर्ष घडवुन आणणे हा आहे".

आपल्या परंपरे नुसार आपण एकादशीचा उपवास करतो. एकादशीचा उपवास म्हणजे दैनंदिन आहारात बदल हे आपले समिकरण असते. परंतु स्वाध्याय

परंपरेनुसार एकादशीचा उपवास म्हणजे काय, तर महिन्यातले दोन दिवस आपण परमेश्वराला त्याच्या कार्याकरीता देणे. उपवास म्हणजे त्या दिवशी आपला दैनंदिन व्यवहार बाजुला ठेवुन देवाच्या सानिध्यात रहाणे. वृक्षमंदिरात हीच संकल्पना वापरलेली आहे. आमचे स्वाध्यायीबंधू भगिनी महिन्यातील दोन दिवस सोडून उरलेले दिवस आपापल्या प्रपंचाकरिता कष्ट करतात तर महिन्यातले फक्त दोनच दिवस वृक्षमंदिरातील पूजेकरिता देतात.

अशा या अनोख्या मंदिराला भेट द्यायला आपणापैकी कोणिही कधीही आले तर आपले आम्ही स्वागतच करु. त्याच्या करीता तुम्ही नियमित स्वाध्याय केंद्रात जात असलात तर उत्तमच. पण जात नसलात तरीही आपले तेवढ्याच आपुलकीने स्वागत होईल.

एवढे बोलून मी माझे चार शब्द पूर्ण करतो. जय योगेश्वर. शेवटी त्यांनी प्रार्थना म्हटली. “सर्वेपि सुखिन: सन्तु सर्वे सन्तु निरामया:। सर्वे भद्राणि पश्यन्तु माSकश्चित दु:ख माप्नुयाSत।।“

नवनीतभाईंच्या चिन्तनिके नंतर आणखी दोघांनी आपले विचार व्यक्त केल्यानंतर. आरती होऊन कार्यक्रम समाप्त झाल्याचे जाहिर करण्यांत आले.

गोवेल्याहून हनुमानवाडीला जाताना सर्वांचा वृक्ष मंदिर हाच चर्चेचा विषय होता. सर्वांच्या मनांत ही संकल्पना आपल्याकडे कशी काय राबवता येईल याबद्दल विचारचक्र सुरु होते.

*************

# १०

गोविंदराव जोशी हे हनुमावाडीतील पौराहित्य करणारे एकमेव व्यक्ती होते. त्यांचे सध्याचे वय ७२ आहे. हनुमानवाडीच्या परिसरांतील चार पांच गावांत ते पौराहित्य करतात. हनुमानवाडीतील सोमजाई मंदिराचे ते वंश परंपरागत उपाध्ये आहेत. देवीची दररोजची पूजा देवीचे भोपी गुरव करतात. परंतु आश्विन महिन्यातील देवीचे नवरात्र, चैत्रातील पोर्णिमा अशा उत्सवाच्या प्रसंगी गोविंदरावांच्या घराण्यातील व्यक्तीकडून देवीला श्रीसूक्ताचा अभिषेक करण्यांत येतो. देवीची चांदीची उत्सवमूर्ती त्यांच्या आजोबांपासून त्यांच्याच ताब्यात असते. चैत्र पोर्णिमेला देवीची पालखी निघते तेव्हा ती उत्सव मूर्ती पालखीत ठेवण्याचा मानही त्यांच्याकडेच आहे.

त्यांच्या पूर्वजांच्या स्वप्नात सोमजाई आली होती. त्यानंतर देवीच्या डोंगरावर खणून देवीची मूर्ती काढली गेली होती. जोश्यांच्या रोजच्या पूजेत एक तांब्याची पेटी होती. त्यांच्या आजोबांच्या वेळे पासून त्या पेटीची रोज पूजा करण्यांत येत होती. दर चैत्री पोर्णीमेला त्या पेटीला देव्हाऱ्यामधून बाहेर काढून ती पेटी चिंच मीठ लाऊन घासून लख्ख करण्यांत येत असे.

गोविंदरावांची तब्येत गेले पंधरा दिवस बरी नव्हती म्हणून सध्या रोजची देवांची पूजा करण्याचे काम आपल्या गणेश उर्फ गणू याच्याकडे होते. त्याला ती पेटी घासण्याचे माहित नव्हते त्यामुळे त्याने काही ती पेटी चैत्री पोर्णिमेला घासली नव्हती. चैत्र पोर्णिमेला सोमजाईचा उत्सव, त्यानंतर हनुमान जयंतीचा उत्सव या मुळे तो त्याकाळात घरी फारसा नसायचाच. सकाळी मारुती मंदिराजवळ नदीत आंघोळ करून तो घरी देवांची कशीबशी पूजा करायचा. दुपारी जेमतेम जेवायला हजर रहायचा. त्यातच त्यानंतर ते गोवेल्याला स्वाध्यायाच्या कार्यक्रमाला गेले

होते. त्यामुळे वडिलांच्या चौकशीला त्याला आजच वेळ मिळाला होता. आज आपल्या वडीलांशी बोलताना त्यांनी त्याला पेटी घासलीस कां असे विचारले. तेव्हा त्याने ती पेटी घासली नसल्याचे सांगितले. त्यावर त्यांनी त्याला उद्याच ती पेटी घासून स्वच्छ करायला सांगितली.

बाबांशी बोलून झाल्यानंतर जेवण झाल्यावर रात्री गणेश नेहमीप्रमाणे झोपायला मारुती मंदिरात गेला होता. तो मंदिरात गेला तेव्हा बाकी तिघेजण आधिच आलेले होते. त्यांची आपापसात चर्चा चालू होती. अर्थातच वृक्ष मंदिर हाच त्यांच्या चर्चेचा प्रमुख विषय होता. तेव्हा हे चौघे मित्र आणि महाराज चर्चा करीत होते. तेव्हा हनुमानवाडीत जर वृक्षमंदिरा सारखा प्रयोग करायचा असेल तर योग्य जागा कोणती यावर विचार चालला होता. तेव्हा सोमजाई मंदिराचा परिसर हीच योग्य जागा असल्याचे मत गणेश आणि हेरंब यांनी मांडले. त्यावर महाराज म्हणाले देवीचे आवार त्यामानाने लहान आहे पण त्याच्या बाजुची जी मोकळी ओबड धोबड जागा आहे ती माझ्या मते जास्त योग्य आहे.

पण ती सरकारी जागा आहे नां? तिथे कसे हे शक्य आहे? हेमंतने आपली शंका उपस्थित केली.

माझ्या अंदाजानुसार ती जागा सरकारी नसून सोमजाईचीच असेल! जितूने आपले मत मांडले.

माझाही अंदाज तोच आहे. जर ती जागा सोमजाईची असेल तर त्याचे काहीतरी कागदपत्र या गणेशकडे असणार. काहीतरी सरकारी दानपत्र, कदाचित एखादा ताम्रपट असू शकतो. महाराजांनी आपला अंदाज सांगितला.

माझ्या माहितीप्रमाणे आमच्याकडे काहीही कागदपत्र नाहीत. ताम्रपट वगैरे असल्याचे काही ऐकले नाही. फक्त माझ्या पूर्वजांपासून एक तांब्याची पेटी आमच्या देवांत आहे. तिची आम्ही रोज पूजा करतो. गणेशने सांगितले.

पेटी केवढी आहे रे? हेमंतने विचारले.

फार मोठी नाही! छोट्या ब्रिफकेस एवढी आहे! पण आम्ही ती कधी उघडली नाही. आजच मला बाबांनी ती पेटी चिंच मीठ लाऊन घासायला सांगितली आहे. दरवर्षी ती पेटी चैत्री पोर्णिमेच्या दिवशी बाबा घासायचे. पण यंदा ते आजारी आहेत त्यामुळे देवांची पूजा हल्ली मी करतो आणि मला याबद्दल काही माहित नसल्यामुळे मी काही ती पोर्णिमेला घासली नव्हती. म्हणून मी उद्या ती घासणार आहे. गणेश बोलला.

मग उद्या तू ती पेटी उघडून बघ नां! हेमंतने सांगितले.

ठिक आहे, मग मी उद्या ती उघडून बघतो. काका उद्या तुम्ही आमच्या घरी याल का? मग आपण ती पेटी उघडून बघुया. गणेशने आपली तयारी दर्शवली.

मी येईन पण आधी तू बाबांना हा विचार सांग आणि ते हो म्हणाले तरच आपण ती पेटी उघडून बघु. महाराजांनी महत्वाचा सल्ला दिला.

************

गणेश आज सकाळीच भेटायला आल्याचे पाहून गोविंदरावांना आश्यर्यच वाटले. त्या बाप लेकांची भेट दररोज जेवणाच्या वेळीच व्हायची. त्यात सध्या ते आजारी असल्याने जेवणाच्या वेळी होणारी भेटही व्हायची नाही. काल रात्री झालेल्या

चर्चेनुसार गणेशने आज देवाच्या पूजेमध्ये असणारी तांब्याची पेटी चिंच आणि मीठाने घासून झाल्यावर उघडण्याचे ठरविले होते. त्याकरिता तो बाबांची परवानगी मागण्याकरीता आला होता.

बाबा! काल तुम्ही मला सांगितल्याप्रमाणे देवांच्या पूजेतली पेटी घासणार आहे. पण माझा विचार ती पेटी उघडून त्यात काय आहे ते बघण्याचा आहे. पण त्याला तुमची परवानगी पाहिजे. असे म्हणून गणेशने रात्री मारुतीच्या देवळात झालेल्या चर्चेचा सारांश सांगितला.

माझी काही हरकत नाही! आम्ही असा कधी विचारच केला नव्हता. तुम्हाला जर त्या पेटीत काही ताम्रपट असेल असे वाटत असेल तर ती शंका फेडून घेऊ. असे म्हणून गोविंदरावांनी गणेशला ती उघडून बघायला परवानगी दिली.

बाबांची परवानगी घेतल्यावर मग त्याने आंघोळ करून देवांची रोजच्या पद्धतीने पूजा केली. पूजा करताना ती तांब्याची पेटी चैत्री पोर्णिमेला घासतात त्या पद्धतीप्रमाणे घासण्या साठी त्याने देव्हाऱ्यामधून बाहेर  काढली.

***********

देव्हाऱ्यामधून घासण्याकरीता बाहेर काढलेली ती पेटी त्याने मागच्या अंगणात नेली. तिथे त्या पेटीला प्रथम स्वच्छ पाण्याने धुतली. नंतर त्या पेटीला चिंच आणि मीठ एकत्र करून ती पेस्ट त्या पेटीवर लावली. पेस्ट लावल्यावर पंधरा मिनिटाने परत ती स्वच्छ पाण्याने धुतली. त्यानंतर ती पेटी भाताच्या तुसाच्या राखाडीने परत घासली. घासून झाल्यावर ती स्वच्छ कापडाने पुसली. त्यानंतर ती पेटी नवीन असल्या सारखी चमकायला लागली. त्या पेटीच्या झाकणावर आंब्याचे पान आणि फुल यांची डिझाईन असलेला चौकोन कोरलेला होता. त्या चौकोनामध्ये

महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती या तिन रुपातील देवीचे चित्र ठळकपण कोरलेले होते.

आतापर्यंत त्या पेटीचा बाहेरचा भागच दरवर्षी घासून पुसून लख्ख केला जायचा. आज प्रथमच गणेशने ती पेटी उघडण्याचा निर्णय घेतला होता. आता गणेशने ती पेटी अगंणातून मागच्या पडवीत आणून तेथे एका पाटावर ठेवली. त्यानंतर त्या पेटीला असलेली पट्टी सारखी कडी काढली. त्या कडीला धरून त्याने झाकण उघडायला सुरवात केली. परंतु पहील्या प्रयत्नामध्ये ती पेटी काही उघडेना. तेव्हा त्याने घरातून स्क्रू ड्रायव्हर आणून ते झाकण थोडेसे सैल केले. त्यानंतर मात्र त्या पेटीचे झाकण  उघडले.

पेटीचे झाकण उघडल्यवर त्यामध्ये एका लाल कापडामध्ये गुंडाळलेला आयताकृती तांब्याचा जाड पत्रा होता. त्या पत्र्यावर हवेचा परिणाम होऊन तो काळा झालेला दिसत होता. गणेशने तो पत्रादेखील मगाचप्रमाणे चिंच मीठ यांच्या पेस्टने घासला. त्यानंतर भाताच्या तुसाच्या राखाडीने परत घासला. नंतर पाण्याने स्वच्छ धुतल्यावर मात्र तो पत्रा चमकायला लागला. त्यावर अगम्य भाषेत काहीतरी मजकुर होता.

गणेशने तो मजकूर वाचायचा प्रयत्न केला. परंतु त्याला काही त्याचा बोध होईना म्हणून तो पत्रा घेऊन तो आपल्या बाबांना दाखवला. त्यांनी तो मजकूर पाहिल्यावर त्यांच्या तो मजकूर मोडीत असल्याचे लक्षांत आले. त्यांच्या लहानपणी त्यांनी मोडीचा अभ्यास केला होता. त्यामुळे त्यांना तो मजकूर वाचता आला. परंतु त्यांना त्यातून काही बोध होईना. कारण ती वाक्यरचना नेहमीची नव्हती. त्यांना एवढे लक्षांत आले की, सावंतवाडीच्या खेमसावंतांच्या राजे विजयसिंग यांनी हनुमानवाडीतील देवीचा डोंगर या नावाने असलेली २०१ एकर जमीन  सोमजाई

मंदीराच्या नावांने देवीच्या दैनंदीन पूजाअर्चा आणि उत्सवाकरीता त्यांचे पूर्वज त्र्यंबकभट जोसी यांच्या नावाने वंशपरंपरेने दान केलेली आहे.

थोड्याच वेळात आपला दैनंदिन पठण आणि वाचन पूर्ण करून महाराजही त्यांच्या घरी आले. यापूर्वी एक दोन वेळा ते येथे येऊन गेले होते. त्यामुळे गणेशच्या घरचे सर्वजण त्यांना ओळखत होते. त्यामुळे ते अंगणातून आत येताच गणेशचा धाकटा भाऊ अजयने त्यांचे स्वागत केले आणि त्याने गणेशला हाक मारली. अरे दादा! हे बघ मारुती मंदिरातले महाराज आले आहेत. बाहेर ये!

गणेशने बाहेर येऊन महाराजांना आपल्या वडीलांच्या खोलीत गेले. त्यांना बसायला खुर्ची देऊन तो आतमध्ये पाणी आणायला गेला. तो पाणी आणेपर्यंत महाराजांनी गोविंदरावांच्या प्रकृतीची चौकशी केली. त्यांना आता बरे वाटत होते. परंतु थोडा अशक्तपणा जाणवत होता. त्यावर महाराजांनी काही औषध सूचविले.

गणेश आतून पाणी घेऊन आला आणि त्याने पाण्याचे तांब्या भांडे महाराजांकडे दिले. त्यांचे पाणी पिऊन होताच त्याने तिथेच टेबलावर ठेवलेला तो ताम्रपट महाराजांना दाखवला. परंतु तो मजकूर मोडी लिपीत आहे एवढेच त्यांना त्यातून समजले. त्यांनी गोविंदरावांना विचारले, गणेशचे बाबा आपण मोडी शिकला असालच नां?

त्यावर गोविंदराव म्हणाले, होय! हा मजकूर मी वाचला परंतु ही लेखन पद्धती जुनी आहे. त्यामुळे नेमका अर्थ समजत नाही. एखाद्या ऐतिहासीक कागदपत्रे वाचणाऱ्या माणसाकडून हे वाचून घ्यायला पाहिजे.

माझ्या माहितीप्रमाणे आपले शेळके गुरुजी यांना मोडी वाचण्याचा छंद आहे. त्यांनी मुद्दाम मोडी वर्गाला जाऊन मोडीचे शिक्षण घेतले आहे. परवा त्यांच्याशी बोलता बोलता त्यांनी मला हे सांगितले होते. महाराज म्हणाले.

पण ते आमच्या घरी वाचायला येतील कां? कारण ही आमच्या रोजच्या पूजेतील वस्तू आहे. त्यामुळे ती काही घराबाहेर नेता येणार नाही. गोविंदरावांनी आपली अडचण सांगितली.

येतील नां! आपण त्यांना विनंती करु! तसं कशाला आज संध्याकाळी मीच त्यांना घेऊन येतो. फक्त आजच्या दिवस हा ताम्रपट देव्हाऱ्याच्या बाहेर ठेवा. महाराज बोलले.

काही हरकत नाही! नाहीतरी आज परत देव्हाऱ्यात ठेवायता म्हणजे परत आंघोळ करायला हवी. तेव्हा संध्याकाळी मात्र शेळके गुरुजींना घेऊन या. जर हंबीररावांना वेळ असेल तर त्यांना पण बोलावले आहे असा निरोप द्या. गोविंदरावांनी महाराजांना विनंती केली.

***********

गोविंदरावांच्या घरी माजघरात सतरंजी अंतरली होती. त्यावर सरपंच, शेळके गुरुजी, महाराज आणि दिनकरदादा धुमाळ बसले होते. त्यांच्या मधोमध चौरंगावर सकाळी देवाच्या पूजेतील तांब्याच्या पेटीमधून काढलेला ताम्रपट होता. शेळके गुरुजींनी नुकताच तो वाचला होता. त्यावरील मजकूराचा अर्थ असा होता. सावंतवाडीचे राजे खेम सावंत यांनी सोमजाई देवीच्या दैनंदिन पूजा, नैमितिक उत्सव याच्या खर्चाकरीता देवीचा डोंगर या नावाने असलेली २०१ एकर जमीन या दानपत्रान्वये गोविंदरावांचे पूर्वज त्र्यंबकभट जोसी यांना वंशपरंपरेने दान केली

होती. त्याबदल्यात त्यांनी खेमसावंतांचे आणि त्यांच्या प्रजेचे कल्याणाची प्रार्थना देवीकडे करावी. या जमिनिचे उत्पन्न देवीच्या खर्चाकरीताच वापरावे ही त्यात अट होती.

म्हणजे आम्ही इतके दिवस ऐकत होतो ही जागा सरकारी आहे ते चुकीचे होते. ही जागा तर देवीच्या मालकीची आहे. त्या जागेशी सरकारचा काही संबंध नाही. त्यामुळे ग्रामपंचायत त्यात काही हस्तक्षेप करु शकत नाही. तुमचे काय मत आहे दिनकरराव. सरपंचांनी दिनकर रावांना विचारले.

या ताम्रपटावरील मजकूरावरून असे दिसते खरे. उद्या मी ऑफिसमध्ये गेल्यावर उतारे बघतो म्हणजे नक्की काय ते समजेल. दिनकररावांनी आपली सावध प्रतिक्रीया दिली.

सरकारी दप्तरांत काहीही असले तरी सध्याच्या माझ्या आर्थिक परिस्थितीनुसार त्या जमीनीत मी काहीही सुधारणा करु शकणार नाही. देवीच्या भक्तांच्या सहकार्याने त्या जमिनीत आपण काही सुधारणा करण्याचा विचार आपण सर्वजण मिळून करत असाल तर त्यात मी काही आडकाठी आणणार नाही. फक्त या ताम्रपटात असलेल्या अटींचा भंग होता कामा नये. हे माझे आपणा सर्वांच्या आणि सोमजाईच्या साक्षीने दिलेले वचन आहे. तेव्हा त्या करिता काही योजना करायची असेल आणि त्यामुळे सोमजाईचे वैभव वाढणार असेल तर त्याकरिता मी आपल्याला पूर्ण सहकार्य करीन.

# ११

संध्याकाळचे सात वाजले होते. हंबीरराव आणि राधाकाकू देवघरात बसून आपली दैनंदिन सायंप्रार्थना म्हणत होते. तेवढ्यात त्यांच्या घरात कामाला असलेली सुमन त्यांना बोलवायला देवघरांत आली. ती आल्यावर राधाकाकूंनी विचारले, सुमन काही  काम होते कां?

त्यावर तिने सांगितले, काकू बाहेर दिनकरराव आले आहेत. काकांकडे काहीतरी काम आहे असे म्हणत होते!

ठिक आहे! आमचं झालेच आहे! त्यांना बसायला सांग मी आलोच इतक्यात. हंबीररावांनी सुमनला सांगितले.

आपली प्रार्थना संपवुन हंबीरराव बाहेर ओसरीवर आले. त्यांनी दिनकररावांना विचारले, फार वेळ बसायला नाही नां लागले?

नाही! नाही! मला फार वेळ नाही झालां! काय देवाचे काही चालले होते कां? मी त्यात अडथळा नाही नां आणलां? ते असो, मी आलो होतो अशाकरिता, काल आपले गोविंदरावांच्या घरी बोलणे झाल्याप्रमाणे मी आज त्या जागेचे उतारे पाहिले. ती सर्व जागा सोमजाई देवीच्याच नांवे आहे आणि वहिवाटदार म्हणून सध्या गोविंदरावांचे नांव आहे. दिनकररावांनी सरपंचांना सांगितले.

किती जागा आहे ती? सरपंचांनी विचारले.

एकुण दोनशे एक एकर जागा आहे. त्यात देवीच्या देवळाच्या आजुबाजुची आठ एकर जागाही येते. सगळी जमीन वरकस म्हणून नोंदली आहे. तेव्हा त्या जागेत काही पक्के बांधकाम करता येणार नाही. दिनकररावांनी सविस्तर उत्तर दिले.

ठिक आहे! उद्या रात्री आपण नेमकी सात आठं जणं मारुतीच्या मंदिरात बसुया आणि पुढील बेत ठरवुया! सरपंचांनी पुढचा बेत सांगितला.

*******

लक्ष्मण गोरिवले, गणेश जोशी आणि पांडुरंग यादव हे तिघेजण अगदी जिवश्च कंठश्च मित्र होते. त्यातला लक्ष्मण गोरिवले आणि पांडुरंग यादव हे कायम मुंबईला रहाणारे होते. लक्ष्मण आणि पांडुरंग हे दोघे एकाच चाळीत रहातात. दोघेही एकाच कंपनीत कामाला आहेत. दोघेही सध्या हनुमान जयंतीच्या निमित्ताने रजेवर गावाला आले आहेत. आता तिघे मित्र गणेशच्या घरी गप्पा मारीत बसले होते. गणेश उर्फ गण्या डिग्री असूनही बेकारच होता. जेव्हा ते मित्र एकत्र जमत तेव्हा त्यांच्या तासनतास गप्पा चालत. तिघेही एस्. एस्. सी. पर्यंत एकत्रच गोवेल्याच्या हायस्कूल मध्ये जात असत. लक्ष्मणने सावंतवाडी येथिल आय्. टि. आय्. मध्ये मेकॅनिकल चा डिप्लोमा केला होता. पांडुरंगनेही त्याच आय्. टि. आय्. मध्ये ईलेक्ट्रीकलचा डिप्लोमा केला होता.

आज त्यांचा गप्पांचा विषय होता काल गोवेले येथे झालेला स्वाध्यायींचा भावमिलन सोहळा आणि त्या आधी हनुमानवाडीमध्ये झालेला भावफेरीचा कार्यक्रम. मारुती मंदिरात मुक्काम केलेले गुजराथमधील स्वाध्यायी बंधू आणि भगिनी दोन दिवस घरोघर जाऊन लोकांना भेटत होते. त्यांच्या मारुती मंदिरात होणाऱ्या प्रवचनालाही हे तिघेजण आवर्जुन गेले होते. त्या गुजराथ मधील स्वाध्यायी बंधूच्या आग्रहामुळे हनुमानवाडीतील लोकांबरोबर हेदेखील गोवेल्याला गेले होते.

ते तिघेही गोवेल्याला झालेल्या कार्यक्रमात सांगितलेल्या स्वाध्यायाच्या विचाराने, तेथील शिस्तबद्ध कार्यक्रमाने प्रभावित झाले होते. विशेषत: डॉ. नवनीत शहा यांच्या प्रवचनाने त्यांना विचार करायला लावले होते. हे तिघेही कार्यक्रम संपल्यावर डॉ. शहांना खास भेटले होते. तेव्हा त्यांनी वृक्ष मंदिराबद्दल थोडीफार माहिती घेतली होती. त्यामुळे त्यांचे स्वाध्याय आणि वृक्ष मंदिर याबद्दलचे औत्सुक्य वाढले होते. परंतु डॉ. शहा यांना लगेचच जायचे असल्याने त्यांची ती उत्सुकता तशीच राहिली होती. म्हणूनच डॉ. शहांनी त्यांना आपला पत्ता आणि फोन नंबर दिला होता त्यांना वृक्ष मंदिर प्रत्यक्ष बघायला यायचे निमंत्रण दिले होते. आज या तिघांची चर्चा वृक्ष मंदिर या विषयाभोवतीच फिरत होती.

काय रे पांडुरंग! वृक्ष मंदिर म्हणजे आपण तुळशीची पूजा करतो तशी झाडांची पूजा करीत असतील काय? गणेशने आपली शंका उपस्थित केली.

अरे पण झाडांचे मंदिर कसे बांधणार? झाडावर जर मंदिर बांधले तर झाड मरेल नाही कां? पांडुरंगने उत्तरादाखल आपली शंका प्रकट केली.

आणि झाडांची जर पूजा केली तर ते तोडता कसे येणार? आणि मग त्या झाडाचा काय उपयोग? लक्ष्मणने आपले मत दिले.

अरे देवाने ही झाडे निर्माण केलीत प्राण्यांच्या आणि माणसांच्या उपयोग करिताच नां! झाडांची फळे, फुले, पाने लाकूड याचा उपभोग आपण घेतलाच पाहिजे. परंतु त्यात तारतम्य बाळगले पाहिजे. म्हणजे लाकडं वापरायची पण ती वाळलेल्या झाडाची. निसर्गाच्या कलाने घेऊन त्याचा उपभोग घ्यायचा. ओरबाडून नाही घ्यायचे. गरजे इतकेच घ्यायचे उगाच हावरटा सारखे केले तर आपल्या देवीच्या डोंगरा सारखे होईल. देवीचा डोंगर म्हणे पूर्वी हिरवागार असायचा. परंतु आताची त्याची अवस्था बघ. हे माणसाच्या हावरटपणामुळेच झाले आहे. गणेश पोटतिडकीने म्हणाला.

अरे लक्ष्मण! आपला गणेश हल्ली एकदम साधु झाल्यासारखा दिसतोय. त्या महाराजांनी त्याच्यावर चांगलीच जादू केलेली दिसते. पण काय रे गणेश! हे महाराज कोण? कुठले? अरे आपल्या सरपंचाना पण त्यांनी भुरळ पाडली आहे, म्हणजे काम जबरदस्त दिसतयं! पांडुरंगाने आपले निरिक्षण बोलून दाखवले.

अरे खरच ते अगदी साधे आणि सरळ माणूस आहेत. त्यांना सगळे महाराज म्हणतात पण त्यांना ते अजिबात आवडत नाही. उलट त्यांना या महाराज आणि बुवा या गोष्टीचा अगदी तिटकारा आहे. ते रोज गावात फक्त पांच घरी भिक्षा मागून आणतात. मिळालेल्या भिक्षेतील एक भाग माशांना, एक भाग कावळयाला देऊन उरलेल्या अन्नाचा नैवद्य दाखवुन ते जेवतात. रात्री काहीही खात नाहीत.

त्यांच्या पूर्वायुष्यात त्यांच्यावर कसलीतरी मोठी आपत्ती आलेली होती. त्यातून ते मनाने सैरभैर अवस्थेत सज्जनगडावर गेले. तिथे त्यांची मनस्थिती सुधारल्यावर ते बाहेर पडले ते प्रवास करता करता आपल्या गावात आले. ते मारुतीच्या मंदिरात मुक्कामाला होते. तुला माहित आहेच आमची चौकडीने त्या मंदिराची अवस्था काय करून ठेवली होती. ती सर्व घाण त्यांनी एकट्याने साफ केली. त्याच दिवशी रात्री ते मारुतीसमोर करुणाष्टके म्हणत होते. त्यांच्या स्वरातील आर्ततेने आमच्या मनाला कुठेतरी अपराधी पणाची जाणिव झाली. तोच क्षण आमच्या जीवनातील परिवर्तनाचा क्षण होता. नाहीतर तुम्हाला माहित आहेच आम्ही कोणालाच जुमानत नव्हतो. गणेशने सर्व वृतांत सविस्तर सांगितला.

तू सांगितलेल्या हकीगती वरून खरंच त्या महाराजांच्यात काहितरी सत्व असेल असे वाटते. ज्यांनी तुम्हाला एका क्षणांत बदलले म्हणजे ते खरोखरचं कोणीतरी साधु पुरुष असतील यात संशय नाही. त्यातच हंबिररावांसारखा कडक आणि संधीसाधुंच्या बाबतित सदैव जागृत असलेला माणूस त्यांना मानतो म्हणजे प्रश्नच नाही. लक्ष्मणने आपले मत दिले.

पण आपला मूळ विषय बाजुलाच राहिला. आपण ते वृक्ष मंदिर बघायला जायचे का? मला आमच्या कंपनीतर्फे एक महिना गुजराथमधील जामनगरला ट्रेनींगला जायचे आहे. हे जामनगर सौराष्ट्रातच आहे. मग आपण एक दोन दिवस तिकडे जाऊन येऊ. पांडुरंगने त्यांच्यासमोर प्रस्ताव ठेवला.

मी नक्की येईन, कारण आपल्या गावातच वृक्ष मंदिरासारखा प्रकल्प राबवायचा विचार चालू आहे. गणेशने माहिती दिली.

पण आपल्या कडे अशी कोणती जागा आहे, जिथे आपण हे वृक्ष मंदिर स्थापन करु शकु? लक्ष्मणने आपली शंका विचारली.

त्यानंतर गणेशने त्यांना ताम्रपटाविषयी माहिती दिली. त्यानंतर तो म्हणाला काल आमच्या घरी सरपंचकाका, महाराज, आपले दिनकरकाका आले होते. त्यानंतर आज दिनकरकाकांनी त्यांच्या ऑफिसमधील रेकॉर्डही चेक केले. देवीच्या डोंगराची सर्व जागा सोमजाईच्या मालकीची आहे. त्याला वहिवाटदार म्हणून आमच्या बाबांचे नांव आहे. त्यामुळे देवीच्या डोंगरावर हा प्रकल्प होऊ शकतो. पण त्याला पैसा खूप लागणार आहे. त्याची काही व्यवस्था झाली तर हे नक्की होईल. पाहूया सोमजाईची काय इच्छा आहे ती! गणेशने नवीन माहिती पुरवली.

अरे पण गणेश! याला तुमच्या घराण्यातल्या लोकांची परवानगी घ्यावी लागेल. लक्ष्मणने शंका उपस्थित केली.

तो काही प्रश्न नाही, बाबांनी याला कालच संमती दिली आहे. उद्या रात्री मारुतीच्या देवळात या संबधी निर्णय घेण्यासाठी एक बैठक आयोजित केली आहे. तुम्हाला त्यात खरंच रस असेल तर तुम्हीही तिथे या! मी तुम्हाला आमंत्रण देतो. गणेशने सांगितले. त्यानंतर त्यांची बैठक बरखास्त झाली.

# १२

मारुती मंदिरातील सभामंडपात एक मोठी सतरंजी अंथरली होती. त्यावर सरपंच हंबीरराव, दिनकरराव, शेळके गुरुजी, लक्ष्मण गोरिवले, पांडुरंग यादव, हेमंत, गणेश, हेरंब, जितेंद्र आणि महाराज बसले होते. काल ठरल्याप्रमाणे हंबीररावांनी आज सगळयांना येथे बोलावले होते. विषय होता अर्थातच देवीच्या डोंगरावर सुधारणा करून त्यावर परवा स्वाध्याय केंद्रात सांगितलेली वृक्ष मंदिर ही संकल्पना राबवण्याची. थोडावेळ इकडचे तिकडचे बोलणे झाल्यावर सरपंचांनी मुख्य विषयाला हात घातला. ते म्हणाले आज आपण येथे कशा करिता जमलो आहोत हे आपणा सर्वांना माहित आहे कां?

सरपंच आपण हा वृक्ष मंदिराचा प्रयोग करायच्या दृष्टीने विचार करण्यासाठी येथे जमलो आहोत हे आमच्या लक्षांत आले आहे. त्याकरिता सोमजाई मंदिराची जागा वापरायला आपल्या गोविंदरावांनी संमती दिली आहे हेदेखील आपण आता जाहिर करुयात. परंतु या प्रयोगाची सखोल माहिती काढणे जरुर आहे. त्यात सगळयांत महत्वाची गोष्ट आहे ती म्हणजे या सर्व कामाकरिता लागणारा पैसा आपण कसा उभा करणार आहोत? देवीच्या भक्तांनी या प्रकल्पात श्रमदान केले तरी भरपुर खर्च येणार आहे. त्याची आपण काय तरतूद करणार आहोत? याचे उत्तरही आपण या बैठकीत शोधणार आहोत. बरोबर नां, मी म्हणतोच ते? शेळके गुरुजींनी मुद्यालाच हात घातला.

काय काय कामे करावी लागतील याचा आधी आपल्याला अंदाज घ्यावा लागेल. त्यातील किती कामे श्रमदानाने करणे शक्य होईल? याचा सखोल अभ्यास करावा लागेल. हेरंबने आपले मत मांडले.

माझ्या मते सर्वात प्रथम आपल्याला. त्या जागेचे टप्प्या टप्प्याने लेव्हलिंग करावे लागेल. त्याकरीता लागणारे दगड आणि माती आपल्याला त्या जागेतूनच मिळु शकेल. गणेशने आपले कृषी विषयक ज्ञान वापरून सांगितले.

आपल्याला माती आणि दगड तिथेच कसे काय मिळतील? सरपंचांनी आपली शंका विचारली.

महाराज आणि आम्ही चौघेजण चैत्र पोर्णिमे पूर्वी देवीचा डोंगर फिरून पाहिला होता. तेव्हा आम्हाला एका ठिकाणी जमिन ओलसर असल्याचे लक्षांत आले होते. त्या ठिकाणी जर आपण एक प्रशस्त पाझर तलाव बांधला तर आपल्याला लेव्हलींग करण्या करीता लागणारे मटेरियल मिळेल. शिवाय त्या पूर्ण जागेला गडगा बांधायलाही दगड मिळतील. पण तिथे खोदण्यासाठी कदाचित सुरुंग लावावे लागतील. जर जांभा दगड मिळाला तर तो फोडायला त्यातली तज्ञ माणसे घ्यावी लागतील. गणेशने माहिती दिली.

या शिवाय आणखी काय काय खर्च लागेल. आपण ढोबळ अंदाज काढुया. दिनकरराव बोलले.

आपल्याला मोठ्या प्रमाणावर निरनिराळ्या प्रकारची रोपे लागतील. साधारण आठ हजार झाडे आपल्याला लावता येतील. त्याकरिता पाण्याची व्यवस्था करायला लागेल. तेवढे खड्डे खणायला लागतील. सर्व जागेला ढोरा गुरांपासून रक्षण करण्या करीता कुंपण किंवा गडगा बांधावा लागेल. माझ्या अंदाजाने आपल्याला आठ ते दहा लाख रुपये कमीत कमी खर्च येईल. यातील बरेचसे काम श्रमदानाने केले तरचा हा अंदाज आहे. हेरंबने आपला अंदाज सांगितला.

आतापर्यंत गप्प राहुन सर्व संवाद ऐकणाऱ्या महाराजांनी आता बोलायला सुरवात केली. ते म्हणाले, सरपंच, गुरुजी, दिनकरराव आपण आतापर्यंत आपले

अंदाज बांधलेत ते बरोबरच आहे. यावर माझा असा विचार आहे. आपल्या पैकी कोणितरी त्या नवनितभाईंच्या गावाला जाऊन प्रत्यक्ष  तिथे काम कसे चालते ते प्रत्यक्ष पाहून यावे. दरम्यानच्या काळात एखाद्या तज्ञ माणसाला बोलावुन या वृक्ष मंदिर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घ्यावा. त्यात कोणकोणती कामे करायला हवीत. त्याची खर्चासह सविस्तर यादी. प्रकल्पाचा आराखडाही करून घेता येईल. ती तज्ञ व्यक्ति कोणती झाडे कुठे लावावित याचीही तपशिलवार माहिती देईल. त्यामुळे आपल्याला नेमकी किती रक्कम उभी करावी लागेल याचाही अंदाज येईल.

महाराज म्हणतात ते बरोबर आहे. माझ्या माहितीत असा एक माणूस आहे. ते फॉरेस्ट खात्यातून रिटायर्ड झाले आहेत त्यांना असल्या कामाचा बराच अनुभव आहे. देवीचे काम आहे म्हटल्यावर ते पैसेही घेणार नाही. फक्त आपल्याला त्यांच्याबरोबर जाऊन त्यांना एक दोन वेळा ती पूर्ण जागा दाखवावी लागेल. दिनकरराव म्हणाले.

मग दिनकरराव लागा कामाला! तुमच्या त्या माणसाला बोलावुन घ्या आणि सविस्तर माहिती गोळा करा. आता राहिला प्रश्न गुजराथ मध्ये कोण जाणार? सरपंचांनी निर्णय घेऊन टाकला.

सरपंच काका, माझी गणेशची आणि लक्ष्मणची गुजराथला जाण्याच्या विषयावर चर्चा झाली आहे. मी पुढच्या आठवड्यांत जामनगरला म्हणजेच सौराष्ट्रात आमच्या कंपनीतर्फे ट्रेनिंगला जाणार आहे. नवनितभाईंचे गाव तिथून जवळच आहे. तेव्हा माझ्याबरोबर गणेशही तिकडे येणार आहे. आम्ही दोघेही तिथे जाऊन तो वृक्षमंदिराचा प्रयोग पाहून येऊ. त्यानंतर गणेश तुम्हाला सविस्तर माहिती देईल. पांडुरंगने सांगितले.

हे सगळे ठरले तर मग! हेरंबने विचारले.

तरीही लागणाऱ्या एवढ्या पैशाची व्यवस्था आपण कशी करणार आहोत? हेरंबने विचारले.

हे बघ हेरंब! आपल्यापुढे आता पैशाचा प्रश्न घेण्याचे कारण नाही. सर्वप्रथम आपल्याला या प्रकल्पासंबंधी परिपूर्ण माहिती गोळा करायला हवी. म्हणजेच आपल्याला नेमकी किती रक्कम लागेल याचा अंदाज येईल. आत्ता आपण जे ८-१० लाखाचा आकडा काढला तो एकतर ढोबळ आहे. दुसरी गोष्ट म्हणजे ही रक्कम काही एकरकमी लागणार नाही. बरोबर आहे नां मी म्हणतो ते? महाराजांनी विचारले.

बरोबर आहे! सगळयात आधी गणेश गुजराथ मध्ये जाऊन तो प्रकल्प पाहून येईल. तो येईपर्यंत दिनकररावांचे स्नेही आपल्याला सविस्तर प्रकल्प अहवाल देतील. या गोष्टीला जवळपास १०-१२ दिवस जातील. तेवढ्या काळांत आपल्याला सोमजाईच्या भक्तांची गावोगावी जाऊन भेट घ्यायला पाहिजे. हा प्रकल्प आपण ज्या भक्तांच्या सहकार्यांने करणार आहोत. तेव्हा आधी त्यांनाही मनाने तयार करायला हवे. सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे या प्रकल्पात महिलांचाही सहभाग असायला हवा तरच हा प्रकल्प यशस्वी होईल, तेव्हा गावोगावी होणाऱ्या बैठकांना महिलांनाही बोलवायला हवे. तेव्हा गावोगावी जाऊन बैठका घेऊन लोकांना ही गोष्ट समजाऊन सांगायची जबाबदारी कोण घेतोय? सरपंचांनी विचारले.

काका आम्ही ही जबाबदारी घेतली असती पण आमच्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. तेव्हा आमच्या जोडीला आपल्यापैकी कोणीतरी जबाबदार व्यक्ती आली तर मी आणि हेमंत गावोगावी जाऊन बैठका आयोजित करु. हेरंबने जबाबदारी स्विकारली.

ठिक आहे! मी या दोघांबरोबर जाईन. फक्त बैठका संध्याकाळी घ्यायच्या कारण मला दिवसा वेळ मिळणार नाही. लोकांनाही संध्याकाळची किंवा रात्रीची वेळ सोईस्कर होईल. दिनकररावांनी सांगितले.

मीदेखील येईन! शेळके गुरुजींनी सांगितले.

मग ठरलं तर! सगळया आघाड्यांवर एकाचवेळी काम सुरु करायचे. सरपंचांनी आजच्या बैठकीचा समारोप करण्याच्या हेतूने सांगितले.

बरं कां मंडळी! आपली ही तयारी पाहून माझा असा विचार आहे की, मी आता माझा मुक्काम मारुती मंदिरातून सोमजाई मंदिराकडे हलवावा. जेणे करून मी माझा फावला वेळ या कार्यात माझा खारीचा वाटा उचलण्याकरिता उपयोगी आणू शकेन. या गोष्टीला आपली कोणाची हरकत नाही नां! महाराजांनी आपला मनोदय जाहिर केला.

पण महाराज आपण गाव सोडून तिकडे त्या उजाड जागेत कसे रहाल? सरपंच आणि शेळके गुरुजींनी एकदमच विचारले.

अहो माझ्या सारख्या फकिराला गांव काय आणि डोंगर काय सगळे सारखेच! तेव्हा माझी चिंता नको. तेव्हा आता ही प्राथमिक तयारी झाली की, साधारण पंधरा दिवसांनी देवीच्या पंचक्रोशीतील सर्व भक्तांची एक सभा सोमजाई मंदिरातच आयोजित करा. म्हणजे तुम्ही गावोगावी जाल तेव्हा तुम्हाला तसे सांगता येईल. माझ्या मते तिथपर्यंत अक्षय तृतिया येईल. अक्षय तृतियेला केलेला संकल्प अक्षय टिकेल. महाराजांनी संकल्पदिनाचा मुहूर्तच सांगून टाकला.

महाराजांचे म्हणणे बरोबरच आहे! तिथपर्यंत आपण आपली तयारी पूर्ण करून अक्षय तृतियेला वृक्ष मंदिराचा संकल्प जाहिर करुया! आणि लगेचच एखादा चांगला दिवस पाहून कामाला सुरवातही करुया! सरपंचांनी जाहीर करून टाकले.

बाकीच्या सगळयांनी त्याला आपले अनुमोदन दिले आणि आजची ही नियोजन बैठक संपन्न झाली.

********

# १३

दुपारी साडेबाराचा सुमार होता. हंबीरराव ओसरीवर निवांत बसले होते. त्याच्या रोजच्या दिनक्रमाप्रमाणे १५-२० मिनिटांत घरातून जेवायला येण्याकरीता निरोप येईल म्हणून ते वाट बघत होते. तेवढ्यात अंगणातून ताई! भिक्षा वाढा असे शब्द कानावर आले! आवाज ओळखीचा वाटला म्हणून ते बाहेर आले बघतात तर महाराज हातात झोळी घेऊन ऊभे होते.

अहो महाराज! असे काय ते? सरळ आत यायचे नां! असे म्हणून सरपंचांनी महाराजांना हाताला धरून आत मध्ये आणले. आणि त्यांना जबरदस्तीने खुर्चीत बसायला लावले. त्यानंतर आतमधून सुमनला बोलावले आणि तिला सांगितले काकूंना बाहेर पाठवं.

काकू बाहेर आल्यावर हंबीरराव त्यांना म्हणाले, अहो ऐकलत कां! महाराज बाहेरूनच भीक्षा मागत होते. त्यांना मी जबरदस्तीने आतमध्ये आणून खुर्चीवर बसवले आहे.

त्यावर काकूंनी महाराजांना सांगितले, महाराज! आता आपण आमच्या बरोबरच जेवायला बसा.

नाही ताई! मी चार घरं मागून आलेलो आहे. आपले पांचवे घर आहे. तेव्हा मला आपण भीक्षाच वाढा. महाराजांनी सांगितले.

महाराज! मग असं करा! ते अन्न घेऊन आमच्या बरोबरच जेवायला बसा. चालेल नां? हंबीररावांनी विचारले.

मी तुमचा आग्रह आहे म्हणून तुमच्या पंक्तीला जेवेन. पण मला आग्रह करायचा नाही. ताई! जे काय असेल ते एकदाच थोडेसे वाढा. मग मी माझ्या रोजच्या प्रथेप्रमाणे कावळयांचा आणि गाईचा भाग काढून आपल्या पंक्तीला बसेन. महाराजांनी सरपंचांच्या आग्रहाला मान तुकवली.

यथावकाश सरपंचांचे आणि महाराजांचे जेवण झाल्यावर ते दोघेजण ओसरीवर बोलत बसले. महाराज म्हणाले, सरपंच! आपले काल देवळात बोलणे झाल्याप्रमाणे आजपासून मी सोमजाई मंदिरात माझा मुक्काम हलवतोय.

कधी जाणार आहांत? सरपंचांनी विचारले.

आता लगेचचं, इथून मारुती मंदिरातून झोळी उचलली की चाललो. महाराजांनी सांगितले.

महाराज, थोडे उनं उतरले की आपण दोघेही जाऊया! मी पणं आपल्या सोबत येतो. कारण बरेच दिवसात मीही तिकडे गेलो नाही. सरपंच म्हणाले.

सरपंच मला आपल्याकडून एक दोन वस्तु देवीच्या डोंगरावर नेण्यासाठी पाहिजे आहेत. महाराजांनी विनंती केली.

अहो घर आपलेच आहे, काय पाहिजे ते न्या! सरपंचांनी लगेचच अनुमती दिली. त्यापेक्षा असे करुया मी आपल्या बरोबर येतोच आहे. तेव्हा तिथली परिस्थिती पहातो आणि आवश्यक असणाऱ्या वस्तु आमच्या गड्याबरोबर पाठवतो. गणेश आजचं गुजराथला जाण्या साठी पांडुरंग बरोबर मुंबईला गेला माहीत आहे नां तुम्हाला? सरपंचांनी विचारले.

हो! मला सांगूनच गेला तो! हंबीरराव मला अजुन एका विषयावर आपल्या बरोबर बोलायचे आहे. महाराज म्हणाले.

बोला नां! नि:संकोचपणाने बोला. हंबीररावांनी परवानगी दिली.

काल आपले वृक्ष मंदिर या विषयावर बोलणे चालले होते, तेव्हा सर्व चर्चा पैशाच्या विषयावर अडकत होती. त्यावर माझ्याकडे एक उपाय आहे. बघा आपल्याला पटतोय कां? महाराजांनी प्रश्न केला.

सांगा ना! आपल्याकडे काय उपाय आहे? या गोष्टीवर रात्रभर विचार करतोय परंतु काही मार्ग दिसत नाही. सरपंच निराशेने बोलले.

सरपंच, अहो निराश नका होऊ! अहो इच्छा आहे तिथे मार्ग आहे. आता मी काय सांगतो ती गोष्ट तुम्हाला मान्य असेल तर हा प्रश्न सुटलाय असे समजा.

तुम्हाला माझा पूर्व इतिहास माहित आहेच. मी बँकेत जवळपास २२ वर्षे नोकरी करत होतो. त्यातली शेवटची चार वर्षे मी मॅनेजर होतो. त्यामुळे मला माझ्या बँकेतून फंड, ग्रॅज्युएटी मिळून चांगली रक्कम मिळालेली आहे. त्याचप्रमाणे सरकारकडून नैसर्गिक आपत्तीत दगावलेल्यांचा जवळचा नातेवाईक म्हणूनही मला खूप मोठी रक्कम मिळालेली आहे. त्या सगळया रक्कमेतील मी अद्याप एकही पैसा खर्च केलेला नाही. सगळी रक्कम बँकेत पडून आहे. त्यापैकी एक पैसाही माझ्या वैयक्तिक खर्चाकरीता वापरायचा नाही असा माझा निश्चय आहे. त्या रक्कमेतून माझ्या दगावलेल्या गाववाल्यांचे आणि माझ्या जवळच्या नातलगांचे एक चांगले स्मारक व्हावे अशी माझी इच्छा आहे.

सज्जनगड सोडल्यानंतर आपल्या गावामध्ये मी चार दिवस राहुन पुढे जाणार होतो. परंतु या गावाने मला माझ्या नकळत एक प्रकारची ओढ लावली आहे. कितीही झाले तरी मी काही संन्यासी नाही. त्यामुळे मला या गावाचा, या गावातील लोकांचा लोभ जडला आहे. त्यामुळे मी माझ्या नकळत आपल्या वृक्ष

मंदिर प्रकल्पामध्ये मनाने अडकलो आहे. तेव्हा माझी आपणाला विनंती आहे की, आपण या वृक्ष मंदिर प्रकल्पाकरीता लागणारी रक्कम मग ती कितीही असो माझ्याकडून स्विकारावी.

त्यात माझ्या काही अटी आहेत. त्या म्हणजे १) हा प्रकल्प सरकारी कायद्याप्रमाणे विश्वस्त संस्था म्हणून रजीस्टर करून घ्यावा. २) गोविंदराव जोशी यांच्याबरोबर रितसर करार करून जागा वृक्ष मंदिर म्हणून विकसित करायला त्या संस्थेच्या ताब्यात घ्यावी. ३) त्या विश्वस्त संस्थेत गोविंदरावांचा किंवा त्यांच्या वारसाची अध्यक्ष म्हणून कायम स्वरुपी निवड करावी. ४) विश्वस्त म्हणून आपण स्वत: त्यात सामिल होऊन प्रकल्पाच्या कामावर देखरेख करावी. ५) या प्रकल्पाचा उद्देश देवीच्या भक्तांचे आणि पर्यावरणाचे रक्षण करून देवीचे वैभव वाढविणे हा असावा. ६) या प्रकल्पातून स्थानिक बेकारांना सन्मानाने रोजगार मिळावा हादेखील त्यातील मुख्य हेतू असावा. असे म्हणून महाराजांनी आपले प्रदिर्घ भाषण थांबविले.

महाराज आपल्या सर्व अटी आणि म्हणणे मला स्वत:ला मान्य आहे. कारण आपण जे काही सांगितलेत ते रितसरच आहे. आपला त्यातील उद्देश स्वागत करण्यासारखाच आहे. त्यात फक्त मी एक दुरुस्ती सुचवितो, ती म्हणजे आपणही त्या संस्थेत एक विश्वस्त म्हणून सामिल व्हावे. दुसरी गोष्ट म्हणजे या एवढ्या मोठ्या विषयाचा निर्णय मी एकटा घेऊ शकत नाही. तेव्हा या बाबतीत मी गावातल्या प्रमुख व्यक्तिंशी बोलेन आणि मगच अंतिम निर्णय आपल्याला सांगेन. सरपंचांनी जबाबदारीने उत्तर दिले.

सरपंच, आपण मला विश्वस्त म्हणून सामिल व्हा हे सांगितल्याबद्दल मी खरोखरच आपला आभारी आहे. परंतु राग मानु नका! मला आता कोणत्याही गोष्टीत गुंतून रहायचे नाही. आपल्याला माहित आहेच मी फार मोठा आघात सहन

केला आहे त्यामुळे मला आता कशाचीच बांधिलकी स्विकारायची नाही. तेव्हा आपण कोणाशी विचार विनिमय करायचाय तो करा आणि माझी अर्थ सहाय्य करण्याची विनंती मान्य करा. शक्यतो माझे नांव पुढे नाही येईल असे बघा. आपला निर्णय झाला की मी माझी रक्कम इथल्या स्टेट बँकेत आणायची व्यवस्था करेन.

हो मी आज रात्रीच या विषयावर गोविंदरावांच्या घरी महत्वाच्या लोकांची बैठक घेतो आणि शक्यतो उद्याच आपल्याला निर्णय कळवतो. माझ्या अंदाजाने सगळयांना हा प्रस्ताव मान्य व्हायला काही हरकत दिसत नाही. तुमच्या नावाऐवजी एक सामाजिक संस्था आर्थिक सहाय्य करणार आहे असे सांगतो. नाहीतर मग तुम्हाला विश्वस्त म्हणून घेतल्याशिवाय आमची लोक ऐकणार नाहीत. मग तुम्हाला चालेल नां? सरपंचांनी विचारले.

हो! हो! चालेल! चालेल! मला माझे नांव कोठेही यायला नकोच आहे. आणि एक लक्षांत घ्या, रक्कम कितिही लागली तरी त्याची चिंता नको! महाराजांनी सांगितले.

सरपंचसाहेब, मी आता निघु कां? बराच वेळ झाला आपण बोलत आहोत. आपल्या म्हणण्याप्रमाणे आता उन्हही कमी झालेले आहे. महाराजांनी विचारले.

हो चालेल! मी ही घरात सांगून येतोच, आपण व्हा पुढे! आपल्या पाठोपाठ मी मारुती मंदिरात येतो.

***********

# १४

गोवेले येथिल स्टेट बँकेची शाखा गावाच्या मध्यवर्ती भागात होती. बँकेच्या बाजुलाच पोस्ट ऑफीस आणि सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शाखा होती. स्टेट बँकेची ही शाखा व्हीलेज ब्रँच म्हणून चालू केलेली होती. त्यामुळे तेथे स्टाफ मोजकाच होता. शाखा व्यवस्थापक म्हणून आचार्य मॅडम काम करीत होत्या. तर कॅशियर म्हणून गोवेल्यातलेच सुहास गोवेलेकर आणि सावंतवाडी येथिल प्रमोद गायकवाड क्लार्क म्हणून काम करीत होते. तर शिपाई म्हणून हनुमानवाडी येथिल हेमंतचा चुलतभाऊ समीर धुमाळ काम करीत होता.

दुपारचे १२ वाजले होते. चैत्र महिना असल्याने हवेत खूपच उकाडा जाणवत होता. आचार्य मॅडम आपल्या केबीनमध्ये बसून दैनंदिन काम बघत होत्या. बँकेच्या काऊंटरला एक माणूस पैसे काढायला आला होता. समीर त्याला पैसे काढायचा फॉर्म भरून देत होता. तेवढ्यात त्याला महाराज बँकेत येताना दिसले. त्याने त्यांचे स्वागत करीत विचारले, काय महाराज इकडे कुठे? एवढ्या उन्हाचे काय काम काढलेत? मला सांगितले असते तर मी केले असते.

काही विशेष नाही! जरा आचार्य मॅडमना भेटायचे होते. त्या आहेत कां? महाराजांनी विचारले.

हो आहेत नां! तिकडे केबीनमध्ये आहेत, चला मी आपली ओळख करून देतो! असे म्हणून समीर त्यांना घेऊन आचार्य मॅडमच्या केबीनमध्ये गेला आणि महाराजांची मॅडमना ओळख करून देऊ लागला. तेव्हा त्या त्याला म्हणाल्या अरे समीर मी ओळखते यांना! परवा तुमच्याच गावातल्या शाळेतील कार्यक्रमाला आले होते तेव्हा त्यांची ओळख झाली आहे.

मग त्यांनी महाराजांचे स्वागत करून त्या म्हणाल्या या महाराज! आमच्या बँकेत आपले स्वागत आहे! प्लीज बसा नां! काय काम काढलेत?

समीर केबीनमधून बाहेर जाताच महाराज बोलले, मॅडम! हे महाराज वगैरे राहूदे आता मी माझी ऑफिशिअल ओळख करून देतो. माझे नांव मंगेश सोमनाथ आंबेकर असे आहे. हे माझे पासबुक मला माझे खाते इथे ट्रान्स्फर करून घ्यायचे आहे. असे म्हणून त्यांनी आपले पासबुक झोळीतून काढले आणि त्यांच्या ताब्यात दिले.

थांबा! थांबा! हे नांव मी कुठेतरी ऐकले आहे, आणि ते माझ्या चांगले लक्षांत आहे! कुठे बरे? हां आत्ता आठवले म्हणजे आपण आपल्या खेड ब्रँचचे मॅनेजर आंबेकर साहेब. अहो माझ्या नोकरीच्या अगदी सुरवातीला मी आपल्या हाताखाली काम केलेले आहे. तुम्ही तेव्हा कदाचित अकाउंटंट असाल. आपल्यावर कोसळलेल्या आपत्तीबद्द्लही मी खूप ऐकले आहे. बापSSरे! आपण मला अशाप्रकारे भेटाल हे माझ्या स्वप्नातदेखील आले नव्हते. परवा हनुमानवाडीला मी आपणाला खरंच ओळखले नाही. बरं पणं आता आपण काय घेणार? चहा, कॉफी का काही थंड?

नाSही नाSही! खरंच काही नको! महाराज म्हणाले.

ते काही नाही, आपल्याला काहीतरी घ्यावेच लागेल! शिवाय माझ्या बरोबर आता जेवायलाही थांबायच आहे! हवेत उष्मा खूप आहे मी थंडच मागवते! मी समिरला बोलावते.

मॅडम एक एक मिनिट! थंड काही मागवु नका फारतर लिंबु सरबत मागवा! आणि आणखी एक, कृपा करून माझी ही आंबेकर साहेब नावाची ओळख शक्यतो

गुप्त ठेवा. मला चिकटलेला महाराज हा बुरखा तसाच राहु दे! तुमच्या स्टाफ मधल्या लोकांनाही सांगा प्लीज. महाराजांनी त्यांना विनवणी केली.

हो ठिक आहे! पण तुम्हाला माझ्या बरोबर जेवायला थांबावे लागेल या अटीवर मी हे मान्य करीन. मॅडमनी बजावले. मग त्यांनी समीरला लिंबू सरबत आणायला सांगितले. बरं आता, तुमचे बँकेचे काम काय आहे ते बघुया असे म्हणून त्यांनी खाते ट्रान्स्फर करण्याची प्रोसेस सुरु केली.

मला या खात्याला चेकबुकदेखील पाहिजे आहे. ते इथेच मिळेल की कुठून बाहेरगावाहून येईल? महाराजांनी विचारले.

नाही ती पद्धत अजुन इथे सुरु झाली नाही. त्यामुळे तुम्हाला चेकबुक येथेच मिळेल. मॅडमनी माहिती दिली.

बरं मॅडम! एक विनंति आहे! हनुमानवाडीत एक नविन प्रकल्प सुरु करायची प्रोसेस सुरु आहे. त्याचा ट्रस्ट स्थापन झाल्यावर त्याचे खाते आपल्याकडे उघडायचे आहे. तेव्हा त्यांना प्लीज मदत करा. कारण मी त्या ट्रस्टला फायनान्स करणार आहे. ही गोष्टदेखील जेवढी गुप्त राहिल तेवढे बरे. महाराजांनी विनंती केली.

अहो आंबेकरसर! ते माझे कामच आहे. तुम्ही विनंती करण्याची काहीच गरज नाही. परंतु तुम्ही सांगताय म्हणून ते काम जास्त आपुलकीने करीन हे माझे वचन आहे.

अशाप्रकारे खाते ट्रान्स्फर करून आणि चेकबुक घेऊन महाराज दुपारी तिन वाजता बँकेतून बाहेर पडले तेव्हा आचार्य मॅडम स्वत: त्यांना निरोप द्यायला बँकेच्या दारापर्यंत आल्या होत्या ते पाहून स्टाफच्या लोकांना खूपच आश्चर्य वाटले. कारण त्या कडक शिस्तीच्या म्हणून स्टाफ मधले सगळे त्यांना ओळखत होते.

************

सोमजाई मंदिराच्या सभामंडपात हेमंत, गणेश आणि हेरंब तिघे बसले होते. देवीचा डोंगर चढून आल्यानंतर आलेला थकवा पोखरणीमध्ये पाय धुतल्याबरोबर दूर झाला होता. देवीचे दर्शन झाल्यावर त्यांनी आजुबाजुला बघितले तो त्यांना आठ दिवसात बराच बदल झालेला जाणवला. सर्व आवार स्वच्छ केलेले दिसत होते. मंदिराच्या छपराच्या आडोशाने अबोली, मोगरा, तगर, जास्वंदीची  रोपे लावलेली दिसत होती. आता दुपारच्या वेळीदेखील ती रोपे टवटवीत दिसत होती. त्या प्रत्येक रोपाच्या बुंधात  एक एक मडके पाण्याने भरून ठेवलेले दिसत होते.

महाराजांना सोमजाई मंदिरात रहायला आल्याला आता आठ दिवस होऊन गेले होते. पहिल्या दिवशी ते सरपंचांबरोबर येथे आले होते. त्यानंतर त्याच दिवशी संध्याकाळी आपल्या गड्याबरोबर एक सतरंजी, चादर, दोन बालद्या, पिण्याच्या पाण्याकरिता एक मातीचे मडके एवढ्या वस्तु पाठवुन दिल्या होत्या. सध्या येथे महाराज एकटेच रहात होते. रोजचा सकाळचा कार्यक्रम आटोपुन ते मंदिराच्या परिसराची स्वच्छता करीत असत. त्याच बरोबर त्यांनी गावातून फुलांची तयार रोपे मागून आणली होती. त्या रोपांच्या बुंधात ठेवायला मातीची मडकीही त्यांनी कुठूनतरी पैदा केली होती. आता त्यांचा उद्योग डोंगरावर येण्याच्या मार्गावर काही सावलीच्या दृष्टीने रोपे लावण्याचा होता. त्या करिता त्यांनी खड्डे तयार करायला सुरवात केली होती.

हा झालेला सगळा बदल हेमंत, गणेश आणि हेरंब हे तिघे बघत होते. तेवढ्यात त्यांना खालून महाराज डोंगर चढताना दिसले. म्हणजे येणाऱ्या व्यक्तीचे पांढरे कपडे दिसले. त्यावरून ते महाराजच असावेत असे अनुमान त्यांनी काढले होते. देवीच्या मंदिरात येण्याच्या वाटेवरच ते त्यांची वाट बघत उभे राहिले.

महाराज डोंगर चढून वर येताच त्यांना हे तिघे दिसले. त्यांना पहाताच महाराजांनी त्यांना विचारले, आज तिघेच कसे काय? जितू कुठाय?

जितू सरपंचकाकांबरोबर शेजारच्या वाडीवर गेलाय. सरपंच, शेळके गुरुजी आणि जितू असे तिघेजण आज तिकडे गेलेत. आज त्यांची शेवटची बैठक आहे. आता परवाच अक्षय तृतिया आली आहे आणि त्या दिवशी या इथे आपण सर्व देवी भक्तांची सभा आयोजित केली आहे नाही कां? हेमंतने उत्तर दिले.

चला! मी हातपाय धुवुन फ्रेश होतो, मग आपण सविस्तर बोलुया! तिथपर्यंत तुम्ही तिघेजण देवीच्या सभा मंडपात बसा. महाराजांनी सांगितले.

१५-२० मिनिटांत महाराज हात पाय धुवुन आणि तोंडावर पाणी मारून फ्रेश झाले. त्यानंतर देवीला नमस्कार करून त्या तिघांच्यात येऊन बसले. त्यांनी गणेशला विचारले तू गुजराथ मधून कधी आलास? आणि तुमच्या दोघांचे काय? कशा झाल्या वाड्या वाड्यांमधील बैठका?

मी कालच गुजराथ मधून आलो. तिकडचे काम बघितले आणि तिकडे गेल्याचे सार्थक झाले असे वाटले. खूप मोठ्या प्रमाणावर तिकडे काम केलेले आहे. त्यांच्या या कामातील एक समान सूत्र स्वाध्याय हे आहे. त्यामुळे त्या कामात जसे रोजमजुरी करणारे आहेत तसेच डॉक्टर, वकील, इंजिनीअरदेखील आहेत. वृक्ष मंदिराकरीता करायचे काम हे त्यांच्या स्वत:च्या परस बागेतील काम असल्याप्रमाणे प्रत्येकजण आपली सेवा तिथे देतो. गणेशने सविस्तर उत्तर दिले.

काका, आम्हीदेखील वाड्या वाड्यांतून फिरलो. लोकांना ही कल्पनाच नविन आहे. परंतु देवीचे काम आहे म्हणून ते श्रद्धेने ऐकून घेत होते. वृक्ष मंदिर म्हणजे नेमके काय हे त्यांना उद्याच्या मिटींग मध्ये समजल्यानंतर प्रत्यक्ष किती लोक सहभागी होतील ते समजेलच. परंतु सध्यातरी लोकांचा उत्साह प्रचंड आहे. हेरंबने आपला रिपोर्ट दिला.

आज संध्याकाळी शेळके गुरुजी, सरपंचकाका, दिनकरदादा आणि गणेशचे बाबा आपल्याला भेटायला देवीच्या मंदिरात येणार आहेत. हेमंतने सांगितले.

*************

सोमजाई मंदिराच्या सभामंडपात घातलेल्या सतरंजीवर शेळके गुरुजी, सरपंचकाका, दिनकरदादा, गणेशचे बाबा आणि महाराज बसले होते. वृक्ष मंदिर संकल्पनेच्या प्रारुपाला अंतिम स्वरुप देण्यासाठी आज ही बैठक होती. बैठकीमध्ये हेमंत, गणेश, जितू आणि हेरंब हेदेखील सामिल होणार आहेत. ते मगाशी गावात गेले होते. ते आता परत येणार होते. या ठिकाणी उपस्थित असणारे सर्वजण त्यांचीच वाट बघत बसले होते.

शेळके गुरुजी, सरपंच आपण वाड्या वाड्यांमधून फिरलात त्या लोकांचा प्रतिसाद कसा काय आहे? कोणी या प्रकल्पात सामिल होण्यास उत्सुक आहेत कां? गोविंदराव जोशींनी विचारले.

लोकांचा प्रतिसाद खूपच चांगला आहे. उद्याच्या मिटींगला किती लोक उपस्थित होतात त्यावरून नेमका अंदाज येईल. शेळके गुरुजी म्हणाले.

बरं या प्रकल्पाच्या खर्चाकरीता लागणाऱ्या निधीची काय तरतुद झाली आहे? कारण या सगळया कल्पना पैशाशिवाय व्यर्थ आहेत. दिनकर दादांनी विचारले.

त्या सगळया बाबीच आता आपण फायनल करणार आहोत. आपल्याला एक रकमी निधी पुरवण्यासाठी एक संस्था तयार आहे. फक्त ते कोणा व्यक्तीला पैसा देणार नाहीत. आपण जर सोमजाई देवीच्या नांवे एक विश्वस्थ संस्था स्थापन केली

तर ती संस्था काही अटींवर आपल्याला आवश्यक असेल तेवढा निधी पुरवायला तयार आहे. फक्त त्यांना आपले नांव गुप्त ठेवायचे आहे. सरपंचांनी सांगितले.

तेवढ्यात आपल्या चौघा मित्रांचे आगमन झाले आणि तेही बैठकीत सामिल झाले. हेरंबने विचारले काय विषय चालला आहे?

त्यावर दिनकरदादांनी सांगितले की, आपली आर्थिक विवंचना दूर झाली आहे. हंबीररावांनी आपल्या प्रकल्पाला निधी देण्यासाठी एक धर्मादाय संस्था शोधून काढली आहे. परंतु त्या करिता आपल्याला सोमजाईच्या नावाने एक विश्वस्त संस्था स्थापन करावी लागेल. त्यांच्या काही अटीदेखील आहेत.

पण त्यांच्या अटी काय आहेत? हेरंबने विचारले.

हा बघा त्यांच्या अटींचा तपशिल. असे म्हणून सरपंचांनी आपल्या हातातील कागद वाचून दाखवला. त्या अटी अशा आहेत १) हा प्रकल्प सरकारी कायद्याप्रमाणे विश्वस्त संस्था म्हणून रजीस्टर करून घ्यावा. २) गोविंदराव जोशी यांच्याबरोबर रितसर करार करून जागा वृक्ष मंदिर म्हणून विकसित करायला त्या संस्थेच्या ताब्यात घ्यावी. ३) त्या विश्वस्त संस्थेत गोविंदरावांचा किंवा त्यांच्या वारसाची अध्यक्ष म्हणून कायम स्वरुपी निवड करावी. ४) विश्वस्त म्हणून हंबीररावांनी स्वत: त्यात सामिल होऊन प्रकल्पाच्या कामावर देखरेख करावी. ५) या प्रकल्पाचा उद्देश देवीच्या भक्तांचे आणि पर्यावरणाचे रक्षण करून देवीचे वैभव वाढविणे हा असावा. ६) या प्रकल्पातून स्थानिक बेकारांना सन्मानाने रोजगार मिळावा हादेखील त्यातील मुख्य हेतू असावा.

मग त्यांचे बरोबरच आहे. लाखो रुपये द्यायचे म्हणजे तो पैसा सत्कारणीच खर्च होतोय याची कोणीही खात्री करून घेणारच. तेव्हा त्यांच्या सर्व अटी मान्य करायला काहीच हरकत नाही. शेळके गुरुजींनी आपले परखड मत व्यक्त केले. त्याला सर्वांनी अनुमोदन दिले.

मग आता घोडं अडलय कुठे?आपल्या या संस्थेला मी नांव सुचवु कां? **“श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थान”** हे नांव कसे वाटते. गणेशने विचारले.

खूपच छान! माझे या नावाला पूर्ण अनुमोदन आहे. सरपंचांनी आपला पाठींबा दिला.

आमचीही या नांवाला संमती आहे. सगळयांनी कोरसमध्ये सांगितले.

चला संस्थेचे नाव तर पक्के झाले. आता या श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थानचे अध्यक्ष कोणाला करायचे? दिनकररावांनी विचारले.

या सर्व जागेचे वहिवाटदार आपले गोविंदराव जोशी आहेत. त्यांना वंशपरंपरागत ही वहिवाटदारी मिळालेली आहे तेव्हा या संस्थानचे अध्यक्षही गोविंदराव जोशीच व्हायला हवेत ते सुद्धा वंशपरंपरेने असे माझे स्पष्ट मत आहे. सरपंचानी सांगितले.

बरोबर आहे आणि ते कायदेशिरही होईल. आपल्या अर्थसहाय्य करणाऱ्या संस्थेची तीच इच्छा आहे. दिनकरारावांनी आपले कायदेशिर मत दिले.

हे बघा! माझा तसा काही आग्रह नाही! कोणत्याही निमित्ताने सोमजाईचे वैभव वाढावे. या जमिनीतून तिच्या भक्तांचेही कल्याण व्हावे हीच माझी इच्छा आहे. त्या ताम्रपटातील अटीचे कोणत्याही कारणाने उल्लंघन होणार नाही हे बघितले की झाले. मग अध्यक्ष कोणिही झाला तरी काही फरक पडत नाही. गोविंदरावांनी आपले स्पष्ट मत सांगितले.

नाही नाही गोविंदराव आपणच या संस्थानचे अध्यक्ष व्हायला पाहिजे. तुम्ही होणार नसाल तर मगं गणेशला करावे लागेल. शेळके गुरुजी म्हणाले. त्यापेक्षा तुमचे हातपाय चालतायत तोवर तुम्ही अध्यक्ष व्हा असा माझा आग्रह आहे. तरुण मुलांना जरा अनुभव आला की आपल्याला हे सर्व त्यांच्याकडेच सोपवायचे आहे.

तर आता संस्थानचे अध्यक्ष गोविंदराव होतील आणि ते आपले विश्वस्त मंडळ निवडतील असे मी सूचवतो. शेळके गुरुजींनी सूचना मांडली आणि त्याला सरपंचांनी अनुमोदन दिले.

गोविंदरावांनी अध्यक्षपद स्विकारताच सर्वांनी त्यांचे टाळया वाजवुन स्वागत केले. त्यानंतर गोविंदरावांनी उपाध्यक्ष म्हणून हंबीरराव, कार्यवाह म्हणून शेळके गुरुजी आणि विश्वस्त म्हणून दिनकरराव, हेरंब, खेर्डीचे सरपंच श्री दत्तात्रेय सावंत, गोवेल्याचे सरपंच श्री नारायण शिंदे यांची नियुक्ती केली.

गोविंदराव मी आपणाला एक दुरुस्ती सुचवु कां? आपल्या चर्चेत आतापर्यंत एक शब्दही न बोललेल्या महाराजांना या संस्थान मध्ये विश्वस्त म्हणून घ्यावे अशी माझी सूचना आहे. शेळके गुरुजींनी एक प्रस्ताव मांडला.

छे! छे! भलतेच काय? कृपा करून मला या गोष्टीत अडकवु नका! मी आपल्याला लागेल ती मदत करीन पण विश्वस्त वगैरे नकोच! महाराज म्हणाले.

माफ करा! खरंच मी ही गोष्ट विसरून गेलो! पण मी आता त्यांचे नाव जाहिर करतो. गोविंदरावांनी जाहिर करून टाकले.

नाही! नाही! मला हे मान्य नाही! असे जर होणार असेल तर मी आपला माझा मुक्कामच हलवतो! मी काय फकिर आहे! आज या गावात तर, उद्या त्या गावात! महाराजांनी निर्वाणिचा इशारा दिला.

ठिक आहे! पण तुम्ही गाव वगैरे सोडून जायची गोष्ट करु नका! आता कुठे हा प्रकल्पाची नांदी झाली आहे. हा वृक्ष मंदिराचा प्रकल्प अर्धवट सोडून जाणार नाही असे सोमजाईच्या साक्षीने वचन देत असाल तरच तुमचे म्हणणे आम्ही मान्य करु. सरपंचानी यावर तोडगा काढला.

बरं नाही जाणार! हा प्रकल्प अर्धवट सोडून. माझ्या या बोलण्याला सोमजाई साक्ष आहे. महाराजांनी आपला शब्द दिला.

एक मुद्दा राहिला, आपण आता निर्माण केलेली संस्था सरकारदरबारी नोंद करायला हवी. त्याकरिता वकीलांना भेटून कायदेशिर कागदपत्रे तयार करायला हवित. ती कोण करणार? हंबीररावांनी विचारले.

ती जबाबदारी मी घेतो! जितून ती जबाबदारी स्वत:हून अंगावर घेतली.

त्याच बरोबर या संस्थेचे आर्थिक व्यवहार करण्याकरिता स्टेट बँकेत खातेदेखील उघडायला हवे. त्याकरीता आजच्या बैठकीचा पद्धतशिर ठराव करून तो बँकेत देऊन खाते उघडायला हवे. महाराजांनी सुचवले. ही जबाबदारी हेमंत पार पाडु शकेल. काय हेमंत मान्य आहे काय?

हो चालेल, हे काम मी करीन! हेमतने ही कामगिरी स्विकारली.

बरं आता मला सांगा दिनकरदादा तुमचे फॉरेस्टवाले मित्र पहाणी करायला आले होते त्यांनी काही अहवाल दिला आहे कां? किती खर्च येईल असा त्यांचा अंदाज आहे? सरपंचांनी विचारले.

हो दिला आहे त्यांनी अहवाल. त्यात त्यांनी अगदी तपशिलवार योजना दिली आहे. त्याच्या म्हणण्यानुसार आपल्याला प्रथम ज्या ठिकाणी आजही ओलावा आहे त्या ठिकाणी विस्तिर्ण पाझर तलाव खोदायला पाहिजे म्हणजे त्यातून निघणाऱ्या दगड मातितून लेव्हलिंग आणि संपूर्ण डोंगराला गडगा किंवा कुंपण घालता येईल. या शिवाय त्यांनी सोलर प्लँट आणि पवनचक्की बसवण्याचेही सूचविले आहे. म्हणजे सगळीकडे पाणी फिरवण्याकरिता वेगळी वीज घ्यायला नको. पाझर तलावात साठलेले पाणी पवन चक्कीच्या सहाय्याने पाईपलाईन टाकून डोंगराच्या माथ्यावर पाण्याची मोठ्ठी टाकी बांधून त्यात साठवायचे नंतर सगळया डोंगरावर फिरवायचे

अशी त्यांची योजना आहे. त्यांनी ढोबळमानाने, साधारण आठ ते दहा लाख लागतील असे सांगितले आहे. याशिवाय कुठली झाडे कुठे लावावित हेदेखील त्यांनी तपशिलवार सांगितले आहे.

माझ्या मते दिनकरदादांच्या या मित्राला आपण सल्लागार म्हणून या योजनेत सामिल करून घ्यायला पाहिजे. त्यांना मान्य असेल तर एक विश्वस्त म्हणूनदेखील घेता येईल. त्यांच्या सल्याकरीता त्यांना योग्य मानधनदेखील द्यायला हवे. महाराजांनी सूचवले.

आपला सल्ला बरोबरच आहे. त्याच बरोबर आपल्याकडे हेरंब, गणेश, जितू, हेमंत यांच्या सारखे या क्षेत्रातले शिक्षण घेतलेले तरुण आहेत त्यांनादेखील आपण योग्य मानधन देऊन यात पूर्णवेळ सामिल करून घ्यायला पाहिजे. शिवाय सोमजाईच्या भक्तांनी जरी सेवा म्हणून काम केले तरी त्यांच्या श्रमाचा मोबदला त्यांना प्रसादाच्या स्वरुपात काहीतरी द्यायला पाहिजे. त्या करिता मापदंडही ठरवायला पाहिजे. सरपंचांनी चर्चेला जरा वास्तवात आणले.

त्याकरिता मंदिराच्या बाजुला एक शेड बांधून त्या मध्ये या संस्थानचे कार्यालय तयार केले पाहिजे. त्याच बरोबर कुदळी, फावडी, घमेली, या सारखी हत्यारे मोठ्या प्रमाणावर खरेदी करायला पाहिजेत. या सर्व कामाकरीता पूर्णवेळ व्यवस्थापक नेमला पाहीजे. या सगळया गोष्टींचा अधिकार आपण सरपंचांना देऊ. ते योग्य माणसे शोधून त्यांच्याकडून कामे करून घेतील. गोविंदरावांनी अध्यक्षांच्या भूमिकेतून सांगितले. सरपंचांनी ते विनाअट मान्यही केले.

आता आपली सगळी तपशिलवार चर्चा झाली आहे. तेव्हा आता उद्याच्या सभेविषयीदेखील ठरवुयात. शेळके गुरुजींनी तातडीच्या विषयाला हात घातला.

उद्याच्या सभेमध्ये मुख्य वक्ता गणेश असेल. तो सर्व योजना तपशिलवार समजाऊन सांगेल. सभेची सुरवात सरपंच करतील. त्यानंतर महाराज बोलतील. सभेचा शेवट शेळके गुरुजी करतील. गोविंदरावांनी सांगितले.

एवढी सगळी लोक भर उन्हाची डोंगरावर येणार त्यांना आपण काहितरी अल्पोपहार देणे आवश्यक आहे असे मला वाटते. महाराज बोलले.

बरोबर आहे! पण काय देता येईल? साधारण दोन अडिचशे माणसे येतील! त्यांना प्रसाद म्हणून शिरा देता येईल! देवीचा विश्वस्त म्हणून मी वस्तू पुरविन पण बनवणार कोण? गोविंदरावांनी विचारले.

त्याची चिंता नको! मी डोंगरावर भांडी आणून शिरा आणि कोकम सरबत बनवायची व्यवस्था गावातल्या महिला मंडळामार्फत करतो! सरपंचांनी सांगितले.

मी सर्व वस्तु पाठविण्याची व्यवस्था करतो. गोविंदराव म्हणाले.

आता आपली आजची बैठक बरखास्त करण्यापूर्वी आज आपण काय काय ठरवले ते बघुया! दिनकररावांनी आजच्या कामकाजाचा आढावा घ्यायला सूचवले.

बघा मी तपशिलवार सांगतो. १) आपण श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थान या संस्थेची स्थापना केली. २) त्याचे अध्यक्ष आणि विश्वस्त मंडळ निवडले. ३) ही संस्था सरकारी दप्तरांत नोंदवुन घ्यायचे ठरविले. ४) या संस्थेच्या नावांने स्टेट बँकेत खाते उघडण्याचे ठरविले. ५) संस्थे मार्फत पहिले काम पाझर तलाव बांधणे आणि जमिनीची लेव्हल करणे हे ठरवले. ६) संस्थे करिता सोमजाई मंदिराच्या बाजुला कार्यालय बांधण्याचे ठरविले. ७) संस्थेकरिता एक मॅनेजर आणि दैनंदिन कामकाज चालविण्याकरिता योग्य व्यक्तींची योग्य मानधनावर नेमणूक करण्याचा अधिकार हंबिररावांना दिला. ८) उद्याच्या बैठकीचा कार्यक्रम ठरविला आणि बैठकीनंतर उपस्थित लोकांना प्रसाद देण्याचे ठरविले. ९) संस्थेचे दैनंदिन कामावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी हंबीररावांनी स्विकारली आहे. जितूने बरोबर आणलेल्या वहित हे सर्व लिहून घेतले होते ते वाचून दाखवले.

शाबास जितू योग्य काम केले आहेस! महाराजांनी त्याला प्रोत्साहन दिले.

अशा त-हेने आजची बैठक संपन्न झाली आहे असे मी जाहिर करतो. गोविंदरावांनी अध्यक्ष म्हणून जाहिर केले.

आता आरतीची वेळ झालीच आहे तर सगळेजण देवीची आरती करून आपापल्या घरी जाऊ. हंबीररावांनी सुचविले. त्यानंतर त्या सर्वांनी देवीची आरती केली आणि मग ते सगळे आपापल्या घरी गेले. एकटे महाराज देवीजवळ राहिले. तेदेखील आपल्या दैनंदिन सायंप्रार्थनेला लागले.

****************

# १५

आज अक्षय तृतीया! सकाळपासूनच सोमजाई मंदिराच्या परिसरामध्ये धावपळ दिसत होती. रोजची सकाळची उपासना पूर्ण झाल्यावर महाराजांनी मंदिराच्या प्रांगणाच्या कडेला परंतु मंदिराच्या अगदी नजिक जमिनीत आठ खड्डे  खणले होते. त्यांना मदत करायला हेमंत आणि गणेश आला होता. त्यांचे खड्डे खणून होईपर्यंत सरपंचानी पाठविलेली माणसे प्रसाद बनविण्याकरिता लागणारे साहित्य घेऊन आले होते. त्यांनी मंदिराच्या मागच्या बाजुला आडोसा तयार करून चुली मांडून ठेवल्या होत्या. त्या लोकांनीच येताना पिण्याचे पाणी साठवण्याकरिता दोन मोठे मातीचे रांजण आणले होते. त्यांनी ते रांजण स्वच्छ करून त्यात पाणी भरून ठेवले होते. हेरंब आणि जितूने मंदिराच्या सभामंडपाच्या प्रांगणाच्या बाजुला लागून असणाऱ्या भागात मोठी सतरंजी अंथरून तो भाग स्टेजसारखा तयार केला होता.

आता तिन वाजले होते. सोमजाई मंदिराच्या प्रांगणात आतापर्यंत बरीच लोकं जमा झाली होती. मंदिराच्या सभामंडपाच्या बाजुला तयार केलेल्या स्टेजवर हंबीरराव, खेर्डीचे सरपंच श्री दत्तात्रेय सावंत, गोवेल्याचे सरपंच श्री नारायण शिंदे, शेळके गुरुजी, गोविंदराव जोशी, दिनकरराव, महाराज यांच्याशिवाय हनुमानवाडी, खेर्डी आणि गोवेले ग्रामपंचायत सदस्य बसले होते.

खाली प्रांगणात एका बाजुला महिला वर्ग तर दुसऱ्या बाजुला पुरुषवर्ग बसला होता. सर्व मिळून १००-१२५ लोकं उपस्थित होती. हजर असलेली सर्व लोकं सोमजाईची निस्सीम भक्त होती. उपस्थितांमध्ये महिलांचे प्रमाण जास्त होते. जमलेल्या लोकांना आजच्या या विशेष सभेबद्दल खूप औत्सुक्य होते. कारण गेले ८-१० दिवस हनुमानवाडीतील लोकांनी सगळया वाड्यांवर जाऊन सोमजाई भक्तांची भेट घेऊन वातावरण निर्मिती केली होती. वृक्ष मंदिर संकल्पने बाबत सूतोवाच केले होते. त्यांच्या सोमजाईवरील श्रद्धेला आवाहन केले होते.

सभेला पुरेशी उपस्थिती झाली आहे. आता आणखी कोणी येण्याची शक्यता नाही  याचा अंदाज आल्यावर सरपंच हंबीरराव बोलायला उभे राहिले. राम राम मंडळी! येथे उपस्थित असलेल्या सर्व सोमजाई भक्तांचे हार्दिक स्वागत करतो. मला माहित आहे आपल्याला सगळयांना आजच्या या सभेबद्दल खूपच उत्सुकता आहे. काही दिवसांपूर्वी आपल्या गावात काही स्वाध्यायी मंडळी आली होती. ती लोक आपल्या सर्व वाड्यांमध्येदेखील आली होती. हे आपल्याला माहित आहेच.

हो! हो! माहित आहे आम्हाला! उन्हातान्हातून फिरत आमच्या वाडीवरदेखील आले होते. येताना स्वत:ची शिदोरीदेखील बरोबर घेऊन आले होते. अगदी देवमाणंस बघा! साधा चहादेखील घेतला नाही त्यांनी! देवाचे काही बाही सांगत होते. शेजारच्या उंबरवाडीतल्या पार्वतीकाकूंनी आपला अनुभव सांगितला. त्या उंबरवाडीतील महिला मंडळाचे काम करतात.

हो! हो! तेच स्वाध्यायी! आमच्या गावातील मारुती मंदिरात त्यांचा एक कार्यक्रम झाला होता. त्यांच्याच आग्रहावरून आम्ही गावातील काही माणसं त्यांच्या गोवेले येथिल भाव मिलन सोहळयाला गेलो होतो. त्या भावमिलन सोहळयामध्ये गुजराथमधील डॉ. नवनीत शहा यांनी त्यांच्या गावाला चालू असलेल्या वृक्ष मंदिराच्या प्रयोगाबाबत सांगितले. ते ऐकून आम्ही खूप प्रभावित झालो. तो प्रकल्प आपल्याकडे राबवता येईल काय या दृष्टीने आम्ही विचार सुरु केला. त्याच संदर्भात आपल्या गोविंदरावांचा मुलगा गणेश तो वृक्ष मंदिराचा प्रयोग पहायला थेट गुजराथ मध्ये जाऊन आला. त्याने सामाजिक वनीकरण या विषयामध्ये डीग्री घेतली आहे. त्याचप्रमाणे त्याचा मित्र हेरंब यानेदेखील शेतीशास्त्रा मध्ये डीग्री घेतली आहे. या दोघांनीही या प्रकल्पाबाबत साकल्याने विचार करून हा प्रकल्प आपल्याकडे राबवता येईल याची खात्री दिली.

आपल्या दिनकररावांचे एक मित्र फॉरेस्टर आहेत त्यांनी आपण आता जमलो आहोत हा देवीचा डोंगर या प्रकल्पाकरीता योग्य जागा आहे हे सांगितले. माझ्या बालपणी हो डोगंर हिरवागार होता. त्यातील झाडीमध्ये निरनिराळे प्राणी पक्षी रहात होते. परंतु मध्यंतरीच्या काळात त्या देवीच्या डोंगराला आपणच उघडा बोडका करून टाकलेला आहे. त्याचा परिणाम आता आपण भोगतो आहोतच. अनियमित पाऊस आणि पाण्याचा दुष्काळ हा त्याचाच परिणाम आहे. वास्तविक ही देवीच्या डोंगराची जागा आपण समजतो तशी सरकारी जागा नाही. तर आपल्या सावंतवाडीच्या राजांनी देवीच्या दैनंदिन पूजेकरिता आणि उत्सवाच्या खर्चाकरीता आपल्या गोविंदरावांच्या पूर्वजांच्या नावाने दान केलेली आहे. आम्ही विनंती करताच ही सर्व जागा गोविंदरावांनी आपल्याला म्हणजेच “श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थानला” वापरायला दिली आहे.

कालच आम्ही या “श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थान” या संस्थेची स्थापना केली आहे. त्या संस्थेचे अध्यक्षपद गोविंदरावांनी स्विकारले आहे. या संस्थेच्या विश्वस्त पदी गोविंदरावांनी खेर्डीचे सरपंच श्री दत्तात्रेय सावंत, गोवेल्याचे सरपंच श्री नारायण शिंदे, आणि खास महिला प्रतिनिधी म्हणून उंबरवाडीतील पार्वती काकूंचीही नेमणूक केली आहे. आपल्याला आता सोमजाईचे भक्त म्हणून देवीच्या या डोंगराला पूर्वीचे वैभव प्राप्त करून देण्याचा निर्धार आजच्या अक्षय तृतियेच्या दिवशी करायचा आहे.

आता आपल्याला गुजराथ मध्ये जाऊन वृक्ष मंदिर प्रत्यक्ष पाहून आलेला गणेश जोशी वृक्ष मंदिर म्हणजे काय? त्याचे पूजारी आपण कसे व्हायचे? आपल्या सर्वांची यात काय भूमिका राहिल हे सर्व स्पष्ट करून सांगेल. त्याचप्रमाणे आपल्या सर्व शंकांचे निरसनदेखील करेल.

आता गणेशने बोलायला सुरवात केली. सोमजाईच्या सर्व भक्तांचे मी या देवीच्या भूमीवर स्वागत करतो. सर्व प्रथम इतके कडक उन असूनही इतक्या मोठ्या संख्येने आमच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन आलात त्यावद्दल धन्यवाद. आताच सरपंचांनी सांगितले त्याप्रमाणे मी आणि सोमजाईचाच भक्त असणारा हनुमानवाडीचा माझा मित्र पांडुरंग वृक्ष मंदिराला भेट द्यायला गुजरात मध्ये गेलो होतो.

तिथे आम्ही एक वेगळेच देऊळ पाहिले. त्या देवळाला ना भिंत होती, ना छप्पर. तिथे कोणतीही मूर्ती बसवलेली नव्हती की घंटा लावलेल्या असे विलक्षण मंदिर होते ते.

देवळात जर मूर्तीच नसेल तर त्याला देऊळ कसे म्हणायचे? गोवेल्याच्या विष्णू कांबळेनी विचारले.

कसं तेच मी आता सांगतोय! आपण पोथी पुराणांत वाचले आहे. नरसिंह अवतारात एका निर्जीव खांबातून देव बाहे पडला. तो निर्जीव खांब काय देव आहे कां! देव सगळीकडे आहे. तो दगडांत आहे, सोन्यात आहे, रुप्यात आहे. आपण गाईला देव मानतो म्हणजे गाईमध्ये देव आहे! म्हणजेच प्रत्येक वस्तूत देव आहे! बरोबर नां? गणेशने लोकांनाच प्रश्न विचारला.

बरोबरच आहे! आम्ही बायका तुळशीची पूजा करतो म्हणजे तुळसही देवच आहे. तुळसाकाकू बोलल्या.

बरोबर आहे काकू तुमचे! गणेशने परत आपले बोलणे चालू केले. आपण वड पोर्णिमेला वडाची पूजा करतो. शनिवारी पिंपळाची पूजा करतो. उंबराला आपण दत्तस्थान म्हणून पूजतो. अशा अनेक प्रकारच्या झाडांमध्ये आपण देव पहातो.

त्याची भक्ती करतो पूजा करतो. बरोबर आहे नां मंडळी. त्यावर सगळयांनी कोरसमध्ये होकार दिला.

तर त्या वृक्ष मंदिरात मी नेमके हेच पाहिले. आपल्या देवीच्या या डोंगरा सारखाच डोंगर तिथे आहे. त्या सर्व जागेवर आखिव रेखीव पद्धतीने वृक्षाची लागवड केलेली आहे. एक एक स्वाध्यायीनी एक एक झाड पूजेकरिता स्विकारले आहे. त्या रम्य परिसरांत सर्वत्र एक वेगळेच पावित्र्य भरलेले आहे. मोर, हरणे मुक्त पणाने कोणालाही न घाबरते तिथे फिरत होती. देवळाच्या घंटेच्या मधुर नादासारखा तेथे अनेक प्रकारचे पक्ष्यांचे आवाज तिथे ऐकू येत होते. तर अशाचप्रकारचे वृक्ष मंदिर या आपल्या देवीच्या डोंगरावर निर्माण करायचा आम्ही संकल्प केला आहे. त्याला आपल्या सर्वांची साथ हवी आहे. आपण आम्हाला आपली साथ देणार नां? गणेशने सर्वांना साद घालत विचारले.

होSSSS! आम्ही नक्की साथ देऊ! पण त्या पूर्वी आमच्या काही शंका आहेत. खेर्डीचे सरपंच श्री दत्तात्रेय सावंत बोलले.

काका, आपल्या कोणत्याही शंकेचे आम्ही निरसन करायचा प्रयत्न करु! विचारा आपली काय शंका आहे ती. गणेशने शंका निरसन करण्याची तयारी दाखवली.

यात आम्ही नेमके काय करायचे? या सर्व गोष्टीकरिता किती वेळ द्यावा लागेल? आम्हाला काही पैसे खर्च करावे लागतील कां? आपण म्हणता ती पूजा कशी करायची? सरपंच सावंतांनी आपल्या शंका विचारल्या.

आपल्या शंकांचे उत्तर देण्यापूर्वी आपण या जागेत नेमके काय करणार आहोत ते आधी सांगतो. आपण आत्ता पहात आहात हा डोंगर उघडा बोडका झालेला आहे. त्यावरील जागा ही कुठे खड्डे तर कुठे टेकाडं अशा स्वरुपात आहे. आता चैत्रमहिना

चालू आहे. तरीही आपल्या या पोखरणी मध्ये एवढ्या उंचीवर असूनदेखील आत्ता भरपुर पाणी आहे. त्याचप्रमाणे आजु बाजुलादेखील बऱ्याच ठिकाणी ओलावा आहे. तेव्हा आपण या जागेला लागवड करण्यायोग्य असे उतारात मोठे मोठे प्लॉट करणार आहोत. त्याकरिता आपल्याला माती आणि दगड लागतील ते मिळविण्याकरिता आणि भविष्यात आपली पाण्याची आवश्यकता पूर्ण करण्याकरिता एक विस्तिर्ण पाझर तलाव तयार करणार आहोत. त्या पाझर तलावामुळे आजुबाजुच्या सर्व विहीरींची आणि तळयांच्या पाणी पातळीत वाढ होईल.

हा झाला प्राथमिक भाग. त्यानंतर लागवडी साठी आवश्यक असणारे बालतरु म्हणजेच रोपे एकतर येथेच तयार करायची आहेत, किंवा जिथे उपलब्ध होतील तिथून आणायची आहेत. ती रोपे लावण्याकरीता खड्डे खणून तयार ठेवायचे आहेत. पावसाळा सुरु झाला की चांगला मूहूर्त पाहुन आपल्याला लागवड करायची आहे. पुढे प्रत्येक भक्ताला रोपे वाटून दिली जातील. त्या रोपांची काळजी त्या भक्ताने घ्यायची आहे. आपण लागवड करीत असलेल्या रोपाला ईश्वर मानुन त्याची पूजा करायची आहे.

आपण सर्व सोमजाईचे भक्त आहोत. आपण येथे करीत असलेले प्रत्येक काम हे तिची सेवा म्हणून करायचे आहे. त्या भावनेने हे काम केल्याने ते देवीला पोचेल. आता आपले प्रश्नांची उत्तरे बघुयात.

आपला पहिला प्रश्न आहे. आपल्याला नेमके काय करायचे आहे? तर याचे उत्तर असे आहे आपणच देवीला कोणती सेवा देऊ शकतो याचा विचार स्वत:च करायचा. आपल्या प्रकृतिला झेपेल ते आणि तेवढे आपण देवीला अर्पण करायचे. आपण या ठिकाणी जी कामे करणार आहोत त्यात आपला सहभाग द्यायचा. मग तो जमिन लेव्हल करण्याचा असूदे, तलाव खोदण्याचा असूदे, खड्डे खणण्याचा असूदे

किंवा रोपे तयार करण्यापासून रोपे वाढवण्या पर्यंत प्रत्येक कामात सेवा म्हणून आपला सर्वांचा सहभाग अपेक्षीत आहे.

आता दुसरा प्रश्न आहे, किती वेळ द्यायचा? या प्रश्नाचे उत्तर मी जरा सविस्तर देतो. आपण एकादशीचा उपवास करतो. म्हणजे काय करतो फक्त खाण्या पिण्यात वेगळे पदार्थ सेवन करतो. स्वाध्याय परिवारात एकादशीची व्याख्या वेगळी आहे. महिन्यातून येणारे हे दोन दिवस आपल्या प्रपंचाला न देता ते परमेश्वराला द्यायचे. म्हणजे वर्षभरातले चोवीस दिवस आपण भगवंताची सेवा करायची. तेव्हा हे एकादशी व्रत आचरायचे. आपण आपल्याला शक्य असेल तेवढा वेळ सोमजाईकरिता द्यायचा. तिची सेवा म्हणून आपल्या प्रकृतीला झेपेल त्या कामात आपला सहभाग द्यायचा. कोणाला आठवड्यांतून एक दिवस देता येईल तर कोणाला महिन्यांतून एक दिवस देता येईल. एखाद्याला दररोज काही तास आपली सेवा देता येईल.

आपण सर्व सोमजाईचे भक्त आहोत. शुक्रवाराला आपण देवीचा वार मानतो. त्या दिवशी आपण देवीच्या नावाने उपवास करतो. हा उपवास म्हणजे काय? फक्त आहारात बदल म्हणजे उपवास होतो कां? असे कसे असेल? तेव्हा उपवास म्हणजे देवीच्या साठी काही काम करणे! तिच्या सान्निध्यात रहाणे म्हणजे उपवास!! महिन्यांतून चार किंवा पाच शुक्रवार येतात. आपण जर सोमजाईच्या नावाने हे चार पांच दिवस देवीच्या या वृक्ष मंदिरात आपली सेवा दिली तरी खूप झाले.

आता आपला पुढचा प्रश्न आपल्याला काही पैसे खर्च करावे लागतील का? हा सहभाग ऐच्छीक आहे. जर कोणाला शक्य असेल तर तर तो पैशाच्या रुपात, वस्तूच्या रुपात आपला सहभाग देऊ शकतो. सध्यातरी आवश्यक तेवढी आर्थिक मदत देणारा सोमजाईचा भक्त आपल्याला मिळाला आहे. तरीही कोणी ती बाजू

सावरणार असेल तर त्याचे स्वागतच असेल. मात्र मी देणगी दिली म्हणून माझ्या नावाचा बोर्ड लावा अशी अट असेल तर अशी मदत आपल्याला नको. आपल्याला या प्रकल्पासाठी आर्थिक मदत करण्याऱ्याने माझे नांव कुठे येऊ द्यायचे नाही या अटीवरच मदत दिली आहे.

आपला शेवटचा प्रश्न असा आहे आपण म्हणता ती पूजा कशी करायची? याचे उत्तर असे आहे. आपण देवाची पूजा कशी करतो त्याला न्हाऊ घालतो, त्याला निरनिराळे उपचार अर्पण करतो. त्याला आवडते ते ते त्याला अर्पण करतो. आपल्या या मंदिरातला देव आहे बालतरु. त्या बालतरुचे संगोपन करायचे, संरक्षण करायचे, त्याला पोषक आहार द्यायचा, त्याचे लाड करायचे हीच आपली पूजा. भगवान श्रीकृष्णांनी गीते मध्ये सांगितले आहे मी सर्व जींवांच्या ठिकाणी आहे. त्यामुळे आपण झाडामध्ये असणाऱ्या त्या भगवंताची पूजा करुया. आपण केलेल्या या सेवेने आई सोमजाई आपल्यावर प्रसन्न होईल आणि आपली, आपल्या परिसराची, आपल्या पर्यावरणाची भरभराट करेल. एवढे बोलून मी आपली रजा घेतो. आपल्या अजुनही काही शंका असल्यास नि:संकोचपणाने विचारा.

आता आपल्याला आमच्या गावातील महाराज चार शब्द सांगतील. आमच्या या निर्णय प्रक्रियेत त्यांचाही मोठा सहभाग आहे. अतिशय निरीच्छ असणारी ही व्यक्ती योगायोगाने आपल्याला लाभलेली आहे. तेव्हा महाराज आपण आता आम्हाला मार्गदर्शन करावे ही विनंती. सरपंचांनी महाराजांना विनंती केली.

हंबीररावांच्या विनंतीला मान देऊन महाराज उभे राहीले. सोमजाईला नमस्कार करून त्यांनी तिचे ध्यान केले आणि बोलायला सुरवात केली.

आई सोमजाईच्या सर्व उपासकांना माझा दंडवत. मी कोणी महाराज वगैरे कोणी नाही परंतु  माझ्या नकळत मला न आवडणारी ही उपाधी मला चिकटली आहे. गेले काही दिवस मी अनेक गावे भटकत भटकत या गावात आलो. आपल्या लोकांनी घातलेल्या भिक्षेवर जगणारा मी आपल्याला काय मार्गदर्शन करणार पण आता सरपंचांना मी नाही म्हणू शकत नाही.

असो. मी आताच सांगितल्याप्रमाणे माझी गेले अनेक दिवस भटकंती चालू आहे. या ठिकाणी आहे तशीच परिस्थिती जवळपास सगळीकडे दिसते आहे. दिवसें दिवस हवेतील उष्णता वाढत चालली आहे. प्यायला पाणी नाही. जनावरांना चारा नाही. सगळीकडे उघडे बोडके डोंगर. या गावातल्या जुन्या लोकांनी मला सांगितले हा देवीचा डोंगर एके काळी हिरवागार होता. त्यामध्ये अनेक प्रकारचे पक्षी, प्राणी रहात होते. आज काय परिस्थिती आहे?  सगळीकडे रखरखाट आहे. देवीचा डोंगर चढताना दम लागल्यावर बसायचे म्हटले तर सावली नाही. पूर्वी माकडांचे दर्शन गावात कधी व्हायचे नाही. परंतु रानात खायला नाही म्हणून त्यांना माणसाच्या वस्तीमध्ये अतिक्रमण करावे लागले.

पण हे सगळे का झाले? कसे झाले? याला जबाबदार कोण आहे? सरकार का देवी? पाण्याचा दुष्काळ झाला. पावसाचे प्रमाण कमी झाले. जनावरांना खायला चारा नाही. या सगळया प्रश्नांना काही उत्तर आहे कां? या सगळया प्रश्नांचे उत्तर एकच आहे! पूर्वी एक प्रश्नांची मालीका विचारली जायची. घोडा का अडला? भाकरी का करपली? असे प्रश्न त्याचे एकच उत्तर होते न फिरवल्या मुळे! त्याचप्रमाणे आपल्याला सध्या सतावणाऱ्या या सर्व गंभीर प्रश्नांचे उत्तर एकच आहे. पर्यावरणाचा समतोल बिघडल्या मुळे.

पर्यावरणाचा समतोल बिघडवण्याला कारण आपणचे आहोत. आपण काय करतो! चुलीला जळवण पाहीजे, तोड झाड. घर बांधायचय, तोड झाडं. फर्निचर करायचय तोड झाड. रस्ता बांधायचाय, निरनिराळे प्रकल्प उभे करायचेत लाव झाडाला कु-हाड. पूर्वीपण लोक झाड तोडायचे पण त्या एका झाडाच्या बदल्यात बागा उभ्या करायचे. तात्पर्य काय आता आपल्याला सोमजाईने जागे केले आहे. तेव्हा या संधीचा फायदा घ्या. देवीचा डोंगर तर हिरवा कराच, पण आपल्या परसात, रस्त्याच्या कडेला जिथे मोकळी जागा मिळेल तिथे झाडे लावा आणि ती जगवा. त्यानंतर देवीचा प्रसाद आपोआपच मिळेल. आई सोमजाई आपल्या सर्वांना सुबुद्धी देवो आपले कल्याण करो हीच तिच्या चरणी प्रार्थना करून माझे चार शब्द पुरे करतो. काही कमी अधिक बोललो असेन तर माफ करा.

आता आपले गोविंदराव जोशी चार शब्द सांगतील. सरपंचांनी जाहिर केले.

त्यानंतर गोविंदरावांनी उभे राहून देवीचे आशिर्वाद घेऊन बोलायला सुरवात केली. आई सोमजाईच्या भक्तगणांना माझा नमस्कार. मी या देवीचा आपल्याप्रमाणेच एक अज्ञानी भक्त आहे. आता महाराजांनी सांगितले त्याप्रमाणे या डोंगराची दुर्दशा होण्याला मीदेखील तेवढाच जबाबदार आहे. आता आपण येथे एक यज्ञ करत आहोत. त्या मध्ये प्रत्येकाने आपली समिधा अर्पण करावी असे मी आपल्याला आवाहन करतो.

ही एवढी मोठी जागा देवीची आहे आणि मी तिचा विश्वस्त आहे ही गोष्टच आठ पंधरा दिवसापूर्वीपर्यंत मला माहीत नव्हती. आपल्याप्रमाणे मीही ही रिकामी जागा सरकारी आहे असे समजत होतो. माझे वडिल माझ्या लहानपणीच वारले. माझ्या विधवा आत्याने मला वाढविले त्यामुळे या विश्वस्तपणाची परंपरा मला ज्ञात नव्हती. काही दिवसापुर्वी वृक्ष मंदिराची कल्पना निघाल्यामुळे आमच्या पूजेत असलेल्या पेटीतील ताम्रपट वाचण्याची बुद्धी देवीने आम्हाला दिली.

त्या ताम्रपटात असलेल्या उल्लेखानुसार आमचे घराणे या जागेचे फक्त विश्वस्त आहे. या जमिनीचा उपयोग देवीच्या पूजेकरीता, उत्सवाकरीता आणि देवीच्या भक्तांच्या कल्याणाकरिता करायचा आहे. त्यामुळे ही जमिन वापरायला परवानगी दिली म्हणजे मी काही विशेष केलेले नाही. फक्त तीचा दुरुपयोग होणार नाही याची आपण सर्वांनी काळजी घेऊया. आपली सभा संपल्यानंतर येथे सर्वांना देवीचा प्रसाद देण्यांत येणार आहे तो घेऊनच सर्वांनी परत जावे ही विनंती आहे.

आता शेळके गुरुजी पुढील नियोजन काय आहे ते सांगतील. हंबीररावांनी परत सूत्र आपल्या हाती घेत जाहीर केले.

लगेचच शेळके गुरुजी उभे राहीले त्यांनी देवीभक्तांचे स्वागत करून थेट विषयाला हात घातला. ते म्हणाले, तर मंडळी आता मला सांगा आपला काय विचार ठरलाय? कोण कोण या वृक्ष मंदिराचे पूजारी होणार आहे?

गुरुजींनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर म्हणून जवळ जवळ सर्वांनीच आपला हात वर करून आपली संमती दर्शवली.

जे कोणी यामध्ये आपला सहभाग देऊ इच्छीतात त्यांनी आपली नांवे सभा संपल्याबरोबर आमचा एक सहकारी हेरंब याच्याकडे नोंदवावित. ती नोंदवताना आपण आपला किती वेळ देऊ शकाल तेही सांगावे म्हणजे त्याप्रमाणे नियोजन करता येईल. सुरवातिला आपल्याला जास्त काम आहे परंतु एकदा आपली लागवड झाली की फक्त देखभालीचीच सेवा आपल्याला करायची आहे. एक गोष्ट मी येथे स्पष्ट करतो की येथे जे कोणी सेवेला येतील त्यांनी आपला दुपारचा जेवणाचा डबा आणण्याची आवश्यकता नाही. देवीचा महाप्रसाद त्यांना दुपारी देण्यांत येणार आहे. आपण उद्या पासूनच आपल्या कामाला सुरवात करीत आहोत. तेव्हा जास्तीत जास्त भक्तांनी सहभाग नोंदवावा ही विनंती आहे. पहिले दोन दिवस ज्यांना शक्य होईल त्यांनी आपली अवजारे आणावित त्यानंतर आपण ती खरेदीच करून टाकु.

आता आपण आपल्या विश्वस्तांच्या हस्ते देवीला प्रिय असणाऱ्या फुलझाडांची नऊ रोपे देवीच्या परिसरात लावुन आपल्या श्री सोमजाई वृक्षमंदिर संस्थानच्या कार्यास प्रारंभ करणार आहोत. ही एकप्रकारे आपण नवदुर्गांची स्थापनाच करीत आहोत. तेव्हा आता आपण आहोत त्या जागेवरच बसून हा वृक्षारोपण सोहळा बघुया.

मी सर्वप्रथम गोविंदरावांना विनंती करतो की त्यांनी येथे असलेले सोनचाफ्याच्या वृक्षाचे पहिल्या खड्यात रोपण करून आपल्या या शुभ कार्याचा शुभारंभ करावा. वृक्षारोपण झाले की आपण सगळे आई सोमजाईची उदो उदो अशी मोठ्याने गर्जना करून तीचा जागर करुया.

त्यानंतर गोविंदरावांनी आपल्या दोन्ही हातात सोन चाफ्याचे बालतरु घेऊन पुढील ध्यानमंत्र म्हणून त्रिगुणात्मक सोमजाईचे ध्यान केले.

खड्गं चक्र गदेषु चाप परिघान् छूलं भुशुंडीं शिरः।
शंखं संदधतीं करैस्त्रिनयनां सर्वांग भूषावृतिम्।।
नीलाश्म द्युतिमास्य पाददशकां सेवे महाकालिकाम्।
याम्स्तौत् स्वपिते हरौ कमलजो हंतुं मधुं कैटभम्।।1।।
अक्षस्त्रक परशू गदेषु कुलिशं पद्मं धनुः कुंडिकां।
दण्डं शक्तिमसिं च चर्म जलजं घंटां सुराभाजनम्।।
शूलं पाश सुदर्शनेच दधतीं हस्तैः प्रवालप्रभाम्।
सेवे सैरिभ मर्दिनी मिह महालक्ष्मीं सरोजस्थितिम्।।2।।
घंटाशूल हलानि शंख मुसले चक्रं धनुः सायकम्।
हस्ताब्जैरदधतीं धनांत विलसच्छीतांशु तुल्यप्रभाम्।
गौरीदेह समुद्भवां त्रिजगतां आधारभूतां महा
पूर्वामत्र सरस्वती मनुभजे शुंभादि दैत्यार्दिनीम्।।3।।

त्यानंतर त्यांनी त्या बालतरुचे रोपण केले, त्याला जलसंजीवन दिले. त्यानंतर सर्वांनी ठरल्याप्रमाणे आई सोमजाईचा उदोSSउदो म्हणून गर्जना केली. त्यानंतर हंबीररावांनी मोगऱ्याच्या, शेळके गुरुजींनी जाईच्या, दिनकररावांनी जुईच्या, खेर्डीचे सरपंच श्री दत्तात्रेय सावंत यांनी शेवंतीच्या, गोवेल्याचे सरपंच श्री नारायण शिंदे यांनी तुळशीच्या, हेमंतने जास्वंदीच्या, गणेशने चाफ्याच्या आणि हंबीररावांच्या खास आग्रहाखातर महाराजांनी जास्वंदीच्या बालतरुंचे रोपण केले. प्रत्येक खेपेला आई सोमजाईचा जागर केला गेला.

वृक्ष मंदिराच्या शुभकार्याचा रितसर प्रारंभ केल्यानंतर सर्वांनी मिळून आई सोमजाईची महाआरती केली. त्यानंतर ठरल्याप्रमाणे प्रत्येकाला द्रोणातून देवीचा प्रसाद म्हणून शिरा देण्यांत आला त्यानंतर कोकम सरबतही देण्यांत आले.

एकीकडे प्रसाद आणि सरबताचे वाटप चालू असतानाचे दुसरीकडे हेरंब आणि हेमंत दोघेजण एक रजिस्टर घेऊन सहभागी होऊ इच्छीणाऱ्या भक्तांची नांवे नोंदवत होते. हेमंत प्रत्येकाला विचारून तो नक्की किती वेळ देऊ शकेल याची खात्री करून घेत होता.

तासाभरात बाहेरगावाहून आलेली सर्व लोक निघून गेली. मोजकीच लोक पुढील नियोजना करिता थांबली होती. प्रत्येकाला कामे वाटून दिली जात होती. संध्याकाळी सात वाजेपर्यंत ही गडबड चालू होती. उद्या पासून प्रत्यक्ष कामाला सुरवात होणार होती. सरते शेवटी सगळे गेले देवीजवळ फक्त महाराज राहिले.

रोजच्या प्रथेप्रमाणे महाराजांनी देवीजवळ दिवा लावला. त्यानंतर त्यांनी सभामंडपात बसून आपला दैनंदिन सायंप्रार्थना आणि दासबोध वाचनाचा कार्यक्रम सुरु केला.

***************

# १६

गेले ३०-४० दिवस देवीचा डोंगर गजबजलेला होता. रोज खणाखणी चालू होती. माणसांबरोबरच यंत्राचा वावरदेखील येथे वाढला होता. देवीच्या डोंगराच्या २०१ एकरचे क्षेत्रापैकी मंदिराचा चार पाच एकराचा सपाट भाग वगळता बाकी सगळा भाग उंच सखल होता. पारंपारीक पद्धतीने जमिनीतील पाणी हातात नारळ घेऊन पाण्याचा उगम शोधणाऱ्या पाणक्याने नेमकी पाणी असणारी जागा शोधून काढली होती. त्याशिवाय आधुनिक तंत्राच्या मदतिनेही त्याच ठिकाणी जमिनीत पाणी असल्याची खात्रीही करून घेतली होती.

त्या पाणी लागण्याची खात्री असलेल्या त्या जागेवर तिन एकर एवढ्या विस्तिर्ण क्षेत्रामध्ये पाझर तलाव खोदण्यास सुरवात केली होती. या पाझर तलावाकरीता सुवातीला देवीच्या भक्तांच्या श्रमदानाने जवळपास सात फुटापर्यंत असलेला मातीचा थर कुदळ फावड्यांच्या सहाय्यान खणून काढला होता. त्यातून निघालेली माती आणि दगड गोटे यांच्या सहाय्याने त्या उंच सखल जागेचे १०-१० एकराचे सलग सपाट प्लॉट तयार करण्यात येत होते. माणसांच्या जोडीला यंत्राची मदतदेखील घेतली गेली होती. उताराप्रमाणे निरनिराळया लेव्हलवर असे ५ एकरापासून १५ एकरांपर्यंत मोठे मोठे प्लॉट तयार करून घेण्यांत आले होते.

मातीचा थर संपल्यानंतर सुरुंग लाऊन कातळ फोडण्यात आला. परवाच जवळपास पस्तीस फुटावर पाण्याचे सात मोठ्ठे जोरदार झरे तिथे लागले होते. त्या पाण्याचा जोर एवढा होता की त्या तिन एकर तलावाच्या दहा फुट उंची एवढे पाणी गेल्या दोन दिवसात साठले होते.

आज जेष्टातली पोर्णिमा म्हणजेच वटपोर्णिमा. महिलावर्गाच्या दृष्टीने हा महत्वाचा दिवस. आजच्या दिवशी पुराणकाळातल्या चतुर सावित्रीने यमाला आपल्या चातुर्याने फसवुन आपल्या पतीचे प्राण परत मिळवले. एका अर्थाने हा

निसर्गाशी जवळीक साधण्याचा दिवस. या निमित्ताने आपल्या मैत्रिणींसह नटून थटून मिरवण्याचाही दिवस. शेतकऱ्यांच्या दृष्टीने कामाला लागण्याचा दिवस.

आज वट पोर्णिमेच्या मुहूर्तावर पांच देवी भक्त दांपत्याद्वारे पाझर तलावातील पाण्याचे जल पूजन करण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणे त्या पवित्र जलाने सोमजाईला सोळा पुरोहितांद्वारे अभिषेक करण्यांत येणार आहे. त्या नंतर आजच देवीच्या १०१ भक्त दांपत्याच्या हस्ते प्रत्येकी पांच बालतरुंचे रोपणही करण्यांत येणार आहे.

देवी मंदिराच्या बाजुलाच श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थानची नवीनच झालेली इमारत आज सजवण्यांत आली आहे. त्याचप्रमाणे सोमजाईचे मंदीरही झेंडूची फुले आणि आम्रपल्लव यांच्या माळांनी सजविण्यांत आले आहे. मंदिराच्या आणि संस्थानच्या इमारतीच्या मधल्या जागेत मोठ्या आकाराची सुरेख रांगोळी काढण्यांत आली आहे. त्या रांगोळीमधून श्री सोमजाई वृक्ष मंदिराचे संकल्पचित्र रेखाटण्यात आले आहे.

गोविंदराव जोशी, हंबीरराव, शेळके गुरुजी, दिनकरराव, गोवेल्याचे सरपंच श्री नारायण शिंदे हे पांचजण आपापल्या पत्नींसह नुकतेच पाझर तलावाकडे गेलेले आहेत. त्यांच्या बरोबर सावंतवाडीहून खास बोलावलेले पांच पुरोहितही गेलेले आहेत. पाचही दांपत्यांनी बांबुच्या परडीत खण, नारळ, तांदूळ, हळद, कुंकू, फुले ठेवली नतंर त्या परडीची पुरोहितांनी सांगितल्याप्रमाणे विधिवत पूजा केली. पूजा झाल्यावर प्रत्येकाने ती परडी पाझर तलावातील पाण्यांत सोडली आणि बरोबर आणलेल्या तांब्याच्या लखलखित घागरीने त्या तलावातील पाणी काढले आणि ते पाणी घेऊन आई सोमजाईच्या मंदिरात गेले.

श्री सोमजाई मंदिराच्या सभामंडपात पांच फुलांच्या माळांनी सजवलेले पाच चौरंग ठेवलेले होते. या पांचही दांपत्यांनी पाझर तलावातून भरून आणलेल्या त्या

चकचकीत घागरी सजवलेल्या चौरंगांवर ठेवल्या. प्रत्येक चौरंगासमोर दोन दोन पाट या दांपत्यांना बसण्याकरिता मांडले होते. ती पांचही दांपत्ये त्या पाटांवर स्थानापन्न होताच त्यांच्या हस्ते त्या पांचही कलशातील गंगेचे पुरोहितांच्या मार्गदर्शनाप्रमाणे विधीवत पूजन केले गेले.

देवीचा गाभाराही आज विशेष सजविण्यांत आला होता. देवींच्या तिनही मूर्ती महाराजांनी पहाटेच स्वच्छ केलेल्या होत्या. आज पहाटे तीन वाजताच ते उठले होते. देनंदिन प्रात:स्मरण होताच त्यांनी देवीचा गाभारा आणि सभामंडप पुष्करीणितून पाणी आणून धुवुन काढला होता. त्यानंतर त्यांनी देवींच्या मूर्तींची पूजा केली होती. आता तिनही मूर्तींच्या डोक्यावर अभिषेक पात्रे टांगण्यात आली होती.

पांचही दांपत्याच्या द्वारे देवीच्या भक्तांच्या कल्याणाकरिता जलाभिषेकाचा संकल्प केल्यावर पांचही घागरी गाभाऱ्यामध्ये नेण्यांत आल्या. सभामंडपामध्ये आठ आठच्या दोन रांगामध्ये सांवतवाडीहून खास बोलावण्यांत आलेले पुरोहित बसले होते. हेरंब आणि जितूकडे अभिषेकपात्रामध्ये पाणी ओतण्याची ड्युटी लावली होती. पुरोहितांनी सूचना देताच पूजन केलेल्या कलशांमधील गंगाजल अभिषेकपात्रांत ओतण्यांत आले.

सोळाही पुरोहित एकाच वेळी श्री सूक्ताचे पठण करीत होते. ते त्यांचे पठणाचे स्वर संपूर्ण देवीच्या डोंगरावर लाऊडस्पीकरच्या माध्यमातून ऐकू येत होते. त्यामुळे वातावरणांत एक वेगळेच पावित्र्य भरून राहिले. श्रीसूक्ताची सोळा आवर्तने झाल्यावर सोळाही पुरोहितांनी एकाच सुरात “**श्रीवर्चस्वम् आयुष्यम् आरोग्यमाविधात् शोभमानं महियते ।धनं धान्यं पशुं बहुपुत्रलाभं शतसंवत्सरं दीर्घमायुः॥**“ हा आशिर्वाद मंत्र म्हटला.

अशाप्रकारे पाझर तलावाचे जलपूजन आणि त्या पाण्याने देवीला अभिषेक करण्याचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतरचा कार्यक्रम अतिशय भव्य स्वरुपात करण्यांत येणार होता.

***********

सोमजाई मंदिराच्या भव्य प्रांगणात १०-१०च्या रांगामध्ये १०१ जोडपी बसली होती. हे सगळेजण आई सोमजाईचे निस्सीम भक्त आहेत. त्यांनी अक्षय तृतियेच्या दिवशी श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थानच्या कार्यामध्ये सक्रीय भाग घेण्याचा संकल्प केला होता. त्या संकल्पाप्रमाणे गेले महिना दिडमहिना ते आपली सेवा येथे देत होते. आज वटपोर्णिमेच्या पवित्र दिवशी बालतरुंच्या रोपणाचा मुहूर्त करण्याचे ठरविले होते. त्यानुसार ही एकशे एक दांपत्य आज प्रत्येकी वड, उंबर, बेल, पिंपळ आणि अशोक अशा सावली देणाऱ्या आणि देवाच्या पूजेसाठी लागणाऱ्या पांच वृक्षांच्या बालतरुंची विधिवत पूजा करून त्यांचे आधीच तयार करून ठेवलेल्या खड्ड्यांमध्ये रोपण करणार आहेत.

या तयारीत बसलेल्या १०१ जोडप्यांच्या समोर वर सांगितलेल्या पांच प्रकारचे बालतरु ठेवलेले आहे. प्रत्येकाच्या डाव्या हाताला पूजेचे साहित्य ठेवलेले आहे. देवीच्या सभामंडपातही दोन रांगामध्ये सर्व विश्वस्थ मंडळी अशाच प्रकारे समोर पांच प्रकारचे बालतरु घेऊन त्यांच्या पूजेकरिता तयारीत बसलेले आहेत. या मंडळींच्या शेजारीच पांच पुरोहित समोर लाऊड स्पिकरचा माईक घेऊन पूजा सांगण्या साठी बसलेले आहेत.

त्या पांचही पुरोहितांनी एकाचवेळी सर्वांना पूजेचा संकल्प सांगण्यास सुरवात केली. पुरोहित सांगत होते त्याप्रमाणे प्रत्येक दांपत्य आपल्या समोरच्या बालतरुंची पंचामृती पूजा करीत होते. पूजा संपन्न होताच प्रत्येकजण आपापल्या नेमलेल्या खड्यांमध्ये बालतरुंचे रोपण करण्यास गेले. प्रत्येक पुरुषाच्या एका हातात

फावडे  आणि दुसऱ्या हातात बालतरु ठेवलेली पिशवी होती. आपल्या पतीच्या मागोमाग चाललेल्या महिलांच्या डोक्यावर पाण्याने भरलेला तांब्याचा कलश होता.

देवीला जाण्याच्या रस्त्याच्या दुतर्फा हे सर्व बालतरु रोपण करण्यासाठी आधीच खड्डे तयार करून ठेवलेले होते. या शिवाय देवीच्या देवालयासमोरील मोकळया मैदानाभोवतीही हे बालतरु लावले जाणार होते. एकाच वेळी साडे पाचशे सावली देणाऱ्या आणि देवपूजेमध्ये मानाचे स्थान असणाऱ्या या वृक्षांचे रोपण करण्यांत येत होते. आता लावण्यात येत असलेल्या प्रत्येक झाडाची देखभाल आज ज्या दांपत्यांनी ती रोपण केली त्यांनी घेतली होती.

ते आपले दैनंदिन कामकाज सांभाळून या झाडांची काळजी घेणार आहेत. आता पावसाळा सुरु झाला असल्याने या झाडांना पाणी घालण्याची आवश्यकता नव्हती. देवीच्या डोंगराला पूर्णपणे संरक्षक भिंत बांधण्यात आलेली असल्यामुळे ढोरे गुरे त्रास देतील हादेखील प्रश्न शिल्लक राहीला नव्हता. फक्त वाऱ्या वादळापासून त्या बालअवस्थेत असलेल्या वृक्षांची काळजी त्यांना घ्यायची होती. पावसाळा संपल्यावर पाझर तलावातील पाणी डोंगरमाथ्यावर टाक्या बसवुन त्यात साठवण्यांत येणार होते. आणि तेच पाणी ठिबक सिंचनाद्वारे प्रत्येक झाडाला देण्याची योजनाही कार्यान्वीत करण्यात येणार आहे.

देवीच्या डोंगराच्या सर्वात उंच असलेल्या पठारावर पवनचक्की उभारण्याचे काम जोरात सुरु होते. त्याचप्रमाणे देवीच्या मंदिराच्या जवळच सौरउर्जेसाठी पॅनेल बसवण्याचेही काम एकीकडे सुरु होते. या दोनही उर्जा स्त्रोतातून देवीच्या मंदिरातील आणि श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थानच्या इमारतिमधील सर्व इलेक्ट्रीकल उपकरणे चालविण्यांत येणार होती. वृक्ष मंदिराच्या दररोज सेवेला येणाऱ्या भक्तांना देण्यांत येणारा खिचडी प्रसाद बनविण्याकरिता तयार केलेल्या पाकगृहातील शेगड्यादेखील या उर्जेवरच चालविण्यांत येणार आहेत. याशिवाय

देवीच्या मंदिरात येण्या करिता असलेल्या रस्त्याच्या कडेला आणि मंदिर परिसरातदेखील या हायब्रीड उर्जेतून पथदिप लावण्यांत येणार आहेत.

वृक्ष मंदिराच्या सेवेकरिता सध्या सरासरी १०० भक्त रोज हजेरी लावत आहेत. या भक्तांनी आतापर्यंत पाझर तलाव खणणे, संपुर्ण डोगराचे निरनिराळया लेव्हलवर निरनिराळया आकाराचे प्लॉट पाडणे ही कामे केली आहेत. या त्यांच्या सेवेबद्दल त्यांना मानधन म्हणून सरकारी रोजगार हमी योजनेमध्ये मिळणाऱ्या रोजमजुरीपेक्षा जास्त रक्कम देण्यांत येते आहे. आता उद्यापासून आणखी दोन हजार बालतरुंचे रोपण करण्याच्या दृष्टीने नियोजन चालू आहे.

या सर्व चालू असलेल्या कामावर सरपंच हंबीरराव जातीने लक्ष देतात. त्यांनी हेमंतला या कामी मॅनेजर म्हणून काम पहाण्यास सांगितले आहे. त्याला मदतनिस म्हणून जितेंद्र काम करीत आहे. हेरंब आणि गणेशला त्यांनी सर्व चालू असलेल्या कामांवर  देखरेख करण्यासाठी नियुक्त केले आहे. होत असलेल्या या कामांमध्ये शेतीशास्त्र आणि वनीकरण शास्त्र यांच्या दृष्टीने कामचा दर्जा राखणे हे त्यांचे मुख्य काम होते. त्यामुळे ते दोघे करायच्या कामाचा आराखडा तयार करीत असत त्यावर दिनकररावांचे फॉरेस्टर स्नेही श्री मारुती माने आपल्या अनुभवी नजरेने मार्गदर्शन करीत असत.

आतापर्यंत या सर्व चालू असलेल्या कामांचा खर्च दहा लाखांच्या घरात गेला होता. महाराजांनी सरपंचांकडे दोन वेळा आठ आठ लाखांचे चेक दिले होते. सरपंचांनी कबुल केल्याप्रमाणे त्यांनी आणि स्टेट बँकेतील मॅनेजर आचार्य मॅडम यांनी महाराजांचे नाव गुप्त ठेवले होते. महाराजही त्यांचा दैनंदिन उपासनेचा आणि भिक्षेचा काळ वगळता दिवसातले जवळपास दहा तास वृक्ष मंदिराच्या कामात व्यतित करत होते.

*************

# १७

संध्याकाळचे सात वाजले होते. सोमजाई मंदिराच्या सभामंडपामध्ये नवीनच बसवलेल्या एल्. ई. डी. दिव्यांचा प्रकाश पसरलेला होता. मंदिरात येण्याचा रस्ताही अशाच एल्. ई. डी. दिव्यांच्या प्रकाशात उजळला होता. रस्त्याच्या दुतर्फा नवीनच लावलेल्या रोपांनी आता बाळसे धरलेले दिसत होते. सभामंडपामध्ये सतरंजीवर गोविंदराव, हंबीरराव, शेळके गुरुजी, दिनकरराव, फॉरेस्टर श्री मारुती माने, हेरंब, खेर्डीचे सरपंच श्री दत्तात्रेय सावंत, गोवेल्याचे सरपंच श्री नारायण शिंदे, मारुती माने, जितेंद्र, गणेश आणि हेमंत ही सगळी वृक्ष मंदिराची विश्वस्थ आणि संचालक मंडळी बसली होती. दर पंधरा दिवसांनी ही लोक कामाचा आढावा घेण्यासाठी आणि पुढिल योजना ठरविण्यासाठी संध्याकाळी देवीच्या आरतीच्या वेळी जमत असत. आजही त्याप्रमाणेच ही मंडळी जमली होती.

सर्वप्रथम हेमंतने झालेल्या कामांचा अहवाल द्यायला सुरवात केली. तो म्हणाला आतापर्यंत आपले सौरशक्ती पॅनेल आणि पवनचक्कीचे काम पूर्ण झाले आहे. आपण ठरविल्याप्रमाणे मंदिराच्या पूर्ण रस्त्याच्या आणि मंदिराच्या परिसरातील पथदिपांचेही काम पूर्ण झाले आहे. आपल्या कार्यालय आणि मंदिरातील इलेक्ट्रीक वायरींगचेही काम बरेचसे पूर्ण झाले आहे. अजुन प्रसाद बनविण्याच्या पाकगृहाचे थोडे वायरींग बाकी आहे पण ते दोन दिवसांत पूर्ण होईल.

आपण ठरविल्याप्रमाणे दोन हजार बालतरुंच्या रोपणाकरिता खड्डे खणण्याचे काम जोरात सुरु आहे. आतापर्यंत अठराशे खड्डे पूर्ण झाले आहेत. दोनशे खड्डे येत्या पाच सहा दिवसात पूर्ण होतील. या खड्यांमध्ये रोपण करण्याकरिता बालतरुंची आपण निरनिराळया ठिकाणी ऑर्डर दिली आहे. त्याचा तपशिल जितू देईल.

आपण आपल्याच देवी भक्तांकडून एक हजार बालतरु घेणार आहोत. त्या मध्ये मुख्यत: आंब्याची आणि काजुची कलमे आपण घेणार आहोत. याशिवाय

जांभुळ पांचशे, औषधी वृक्षांची पाचशे बालतरु आपण निरनिराळया नर्सरी मधून खरेदी करणार आहोत. हे सर्व बालतरु येत्या चार पांच दिवसात आपल्या ताब्यात येतील. जितूने सांगितले.

सगळयांना आपण योग्य मोबदला देत आहोत नां? हंबिररावांनी विचारले.

हो! आपण बाजारभावाप्रमाणे रक्कम अदा केली आहे! जितूने उत्तर दिले.

अवजारे पुरेशी खरेदी केली आहेत नां? त्याची कमतरता पडायला नको! मानेसाहेब आपण आखुन दिलेल्या पद्धतीने सगळे व्यवस्थित चालले आहे नां? दिनकररावांनी शंका उपस्थित केली.

अवजारे पुरेशी आहेत आणि कामही ठरवलेल्या प्लॅनप्रमाणे व्यवस्थित चालू आहे. उलट माझ्या अपेक्षेपेक्षा कामाची गती खूपच जास्त आहे. मात्र पावसाळा संपल्यावर आपल्याला पाईपलाईन टाकून पाझर तलावातील पाणी वरती टाकी बांधून किंवा तयार प्लॅस्टीक टाक्या बसवनुन चढवावे लागेल म्हणजे सर्व झाडांना व्यवस्थित पाणी देता येईल. मानेसाहेबांनी सांगितले.

टाक्या, पाईप, मोटार वगैरे सामान थेट मुंबईहूनच मागवावे म्हणजे चांगले होईल. नाहीतर कोल्हापुरहून सुद्धा चालेल. नारायण शिंदे यांनी आपले मत दिले.

या दोन हजार बालतरुंचे रोपण कधी पर्यंत पूर्ण होईल? त्यानंतर आपण किती लागवड करु शकतो? गोविंदरावांनी विचारले.

आपली ही दोन हजार झाडे जुलै अखेर पर्यंत लावुन पूर्ण होतील. त्यानंतर महिन्याभरात ती व्यवस्थित जीव धरतील असे वाटते. गणेशने सांगितले.

आतापर्यंत आपण जवळपास सातशे झाडे लावली आहेत. ही दोन हजार म्हणजे सरासरी तिन हजार होतील. आपण या पूर्ण जागेत सात ते साडेसात हजार झाडे लावु शकतो. म्हणजे त्यांना वाढायला पुरेशी जागा मिळेल. म्हणजेच आपण

अजुन साडे चार हजार झाडे लावु शकतो. व्यवस्थित हिशेब करून हेरंबने उत्तर दिले.

बरोबर आहे हेरंबने सांगितले ते! माने साहेबांनी हेरंबला दुजोरा दिला.

आपल्या कामाच्या आजच्या गतीने पूर्ण डोंगर हिरवा करायला आणि या आपल्या कामातून काही उत्पन्न सुरु व्हायला किती कालावधी लागेल? आपण सध्या नुसता खर्चच करतो आहोत. आपल्याकडे दाता आहे म्हणून त्याचा आपण गैरफायदा घेतो असे व्हायला नको! हंबीररावांनी चर्चेला व्यावहारीक पातळीवर आणले.

आपल्याला जर आपला खर्च या लागवडीतूनच काढायचा असेल तर नगदी आणि कमी कालावधीत उत्पन्न देणारी झाडे लावायला लागतील. गणेशने सांगितले. याकरिता आपण शेवगा, अननस लागलेचतर आपण अगदी भातासारखे पीक सुद्धा आता थोड्याफार प्रमाणात घेऊ शकतो.

कोणती झाडे लावायची याचा विचार गणेश, हेरंब आणि माने साहेब आपण तिघांनी मिळून घ्यावा. मात्र आपल्याला शक्यतो लवकर आपला दैनंदिन खर्च भागु शकेल एवढे उत्पन्न होईल अशी योजनाही करायला हवी. आपण भांडवली रक्कम दानाच्या स्वरुपात घेतली इथपर्यंत ठिक आहे. परंतु आपला दैनंदिन खर्च आपणच भागवायला हवा असे मला वाटते. हंबीररावांनी आपले मत दिले.

पुढल्या अक्षय तृतियेला आपण आपले नियमित उत्पन्न चालू केलेले असेल याची ग्वाही आम्ही देतो. आम्ही त्यादृष्टीने नियोजन करु. हेरंब आणि गणेशने एकदम सांगितले.

अशाप्रकारे भविष्यातील नियोजन करून आजची बैठक बरखास्त करण्यांत आली. त्यानंतर आरती होऊन सर्व मंडळी आपापल्या घरी निघून गेली.

## १८

रोजच्या सवयीप्रमाणे महाराज पहाटे साडे तिन वाजता उठले. आपले दैनंदिन प्रात:स्मरण स्नान वगैर उरकल्यावर त्यांनी नित्याप्रमाणे आजुबाजुला फिरून १०-१२ प्रकारची फुले गोळा केली. सोमजाईची पंचोपचारी पूजा केली. त्यांच्या पुजेला मोरांच्या केकांची साथ होती. आतापर्यंत सहा वाजले होते. चैत्र महिना असल्याने चांगले फटफटीत उजाडले होते. देवळाजवळ असलेल्या नळाला पाईप जोडून नित्याप्रमाणे त्यांनी तेथील फुलझाडांना पाणी घालणे सुरु केले.

महाराज पाईपने फुलझाडांना पाणी घालत असतानाच त्यांना मंदिराकडे येणारे हंबीरराव आणि शेळके गुरुजी दिसले. दोघेजण मंदिरापाशी पोचेपर्यंत महाराज त्यांना सामोरे गेले. त्यांनी गुरुजींना विचारले, नमस्कार गुरुजी! आज सकाळीच कसे काय?

काही विशेष नाही! रोजच्या सवयीप्रमाणे मॉर्निंग वॉकला बाहेर पडलो होतो. वाटेत हंबीरराव भेटले ते म्हणाले चला आज सोमजाई मंदिरात जाऊ. म्हणून आलो झाले. हंबीररावांचाही काही खास उद्देश असेल असे वाटत नाही. शेळके गुरुजी म्हणाले. त्यानंतर ते आणि हंबीरराव दोघेही सोमजाईच्या दर्शनाला गेले.

काल रात्री महाराजांनी दासबोधा मधला महंत लक्षण हा समास वाचला. त्या समासातल्या पुढिल ओव्या त्यांच्या समोर सारख्या फेर धरून नाचत होत्या.

जयास येत्नचि आवडे| नाना प्रसंगीं पवाडे |

धीटपणें प्रगटे दडे| ऐसा नव्हे ||१२|| श्रीराम ||

सांकडीमधें वर्तो जाणे| उपाधीमधें मिळों जाणे |

अलिप्तपणें राखों जाणे| आपणासी ||१३|| श्रीराम ||

आहे तरी सर्वां ठाईं| पाहों जातां कोठेंचि नाहीं |

जैसा अंतरात्मा ठाईंचा ठाईं| गुप्त जाला ||१४|| श्रीराम ||

त्तेव्हापासून त्यांचे सतत विचार चक्र सुरु झाले होते. आपण या गावात आलो त्याला आता तीन वर्षे होऊन गेली. आपण सज्जनगड सोडताना समर्थांच्या समाधीसमोर जो निश्चय केला तो आपण पाळतोय कां? आपण तर या गावाच्या लोभात अडकतच चाललोय. आपण सोमजाई समोर सगळयांना काय वचन दिले आहे ते आता ते आठवु लागले. आपण खरोखरच अलिप्तपणाने येथे राहिलो आहोत कां? का आपल्यालाच हे महाराजपण आवडु लागले आहे? आपल्याला जे कार्य येथे व्हावेसे वाटत होते ते आता मार्गी लागले आहे. ज्या चौघा दुर्लक्षीत मुलांचे आयुष्य मार्गी लागावे ही आपली अंतर्यामी इच्छा होती ती आता जवळपास पुरी झाली आहे. वृक्ष मंदिराचा प्रकल्पही आता जवळपास पूर्ण झाला आहे. दोन दिवसांनी अक्षय तृतियेला हा प्रकल्प सुरु केल्याला तीन वर्षे पूर्ण होणार आहेत. तो समारंभ झाला की गुपचुप येथून प्रस्थान करावे हे बरे. जर याची वाच्यता केली तर कोणी आपल्याला जाऊन देणार नाही. वर्धापनदिनाच्या कार्यक्रमानंतर हा गाव सोडण्याचा निश्चय झाल्यावर त्यांच्या मनाला समाधान वाटले. एकीकडे डोक्यात विचार चालू असताना ते फुलझाडांना पाणी घालण्याचे कामही करीत होते. तेवढ्यात त्यांच्या बाजुला सरपंच येऊन उभे राहीले. परंतु महाराजांच्या काही ते लक्षात आले नाही.

महाराज! आज कुठल्या विचारात गढले आहात? हंबिररावांनी त्यांच्या खांद्याला हात लावत विचारले.

नाही काही विशेष नाही! पण गुरुजी कुठे गेले आहेत? महाराजांनी विचारले. त्यानंतर ते हंबीररावांना म्हणाले, हंबीरराव! मनात विचार चालू होता की, आता आपला वृक्ष मंदिराचा प्रकल्प मार्गी लागला. आपण नियोजित वृक्ष मंदिराचे जे स्वप्न बघितले होते ते आता प्रत्यक्षात उतरलेले दिसत आहे. मी आई सोमजाईच्या साक्षीने जे वचन आपल्याला दिले होते ते आता पूर्ण झाले आहे.

महाराज मलाही एक मनावरचे ओझे हलके करावे असे वाटते. मी आपल्याला एक वचन दिले होते. त्या वचनांतून आपण मला मुक्त करावे ही आपल्याला प्रार्थना आहे. हंबीररावांनी महाराजांना विनंती केली.

कसले वचन हंबीरराव? महाराजांनी विचारले.

कसले काय विचारता महाराज. आपण या गावात आलेत त्याच्या दुसऱ्याच दिवशी तुम्ही मला आपली खरी ओळख सांगितलीत. त्यानंतर जेव्हा वृक्ष मंदिर ही संकल्पना जेव्हा प्रत्यक्षात आणायचा विचार झाला तेव्हा आपण या प्रकल्पाच्या पाठीशी भक्कमपणाने उभे राहिलात. आतापर्यंत जवळपास अठरा लाख रुपये आपण या प्रकल्पाला दिलेत. या गोष्टीची मला सोडून कोणालाच माहिती नाही. आपले नांव गुप्त ठेवावे असे आपण माझ्याकडून वचन घेतलेत. त्या वचनाचाच मला हल्ली रोज त्रास होतोय.

अहो हजारभर रुपये कोणी दान दिले तर तो आपल्या नांवाची पाटी लावायला पाहिजे ही अट घालतोय. त्या पार्श्वभूमीवर आपण आपले नांव लपवुन ठेवताय हे मनाला पटत नाही. शिवाय आपला उद्देश आपल्या गावाचा आणि आपल्या कुंटुंबातील व्यक्तींचे स्मारक असावे हा होता. तर त्यांची नावे तरी जाहिर व्हायला पाहिजेत असे मला वाटते. तेव्हा आज रात्री होणाऱ्या विश्वस्थांच्या बैठकीत मला आपले नांव जाहिर करण्याची मला परवानगी द्यावी हा माझा आपल्याजवळ हट्ट आहे.

महाराजांनी क्षणभर मनाशी विचार केला. नाहीतरी उद्या आपल्याला हे स्थान सोडून जायचे आहेच. तेव्हा नांव जाहिर झाले तरी काही फरक पडणार नाही. आपण या जागेपासून खूप लांब जाऊयात म्हणजे झाले. प्रत्यक्षात ते हंबिररावांना बोलले, हंबीरराव तुम्ही मला अडचणीत टाकलेत. बर ठिक आहे उद्याच्या कार्यक्रमांत माझे नांव जाहिर करा. पण कुठेही ही गोष्ट कागदावर यायला नको. कोठेही माझ्या नावाचा बोर्ड लावायचा नाही. म्हणजे उद्याच्या कार्यक्रमानंतर काही दिवसांनी लोक ही गोष्ट विसरून जातील. लोकांच्या मनांत माझे नांव न रहाता “श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थान’ हेच नांव लक्षांत रहायला हवे.

चालेल महाराज आपण माझ्या मनावरचे फार मोठे ओझे हलके केलेत. हंबिरराव आनंदाने बोलले.

***********

देवीच्या डोंगरावरील दैनंदिन कार्यक्रमाला आता सुरवात झाली होती. दररोज कढीपत्ता, भाजीपाला, शेवग्याच्या शेंगा, फळभाज्या घेऊन जाणारा श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थानचा टेंपो भरून कोल्हापुरला जायला निघाला. निरनिराळया प्लॉटमध्ये जाणाऱ्या ठिबक सिंचनाच्या पाईपलाईनचे व्हॉल्ह चालू करणारे सेवेकरी आले व त्यांनी आपले काम सुरु केले.

आतापर्यंत डोंगराचा सर्वभाग लागवडीखाली आला होता. साधारण आठ हजार लहानमोठी झाडे लावण्यांत आली होती. त्या मध्ये आवळा, हरडा, बेहडा, दशमुळामधील सर्व वनस्पती, आंबा, चिंच, जांभुळ, अगस्ती, कडुनिंब, कढीपत्ता, नारळ, चंदन, रक्तचंदन, बदाम, मसाल्याची झाडे अशी अनेक प्रकारची झाडे होती. कमीत कमी पाचशे जातीची झाडे येथे लावली होती. मात्र सगळी झाडे देशी होती. त्यामध्ये परदेशी झाडे लावणे जाणुन बुजुन टाळले होत.

या निर्माण झालेल्या झाडीमध्ये खास गुजराथमधून पांच मोर लांडोरींच्या जोड्या आणल्या होत्या. याशिवाय अनेक प्रकारच्या पक्षांनी आता आपला मुक्काम या वृक्ष मंदिरात हलविला होता. सध्या चैत्र महिना चालू असल्याने सतत कोकिळांची कुहू कुहू या सर्व परिसरांत ऐकु यायला लागली आहे.

शेळके गुरुजी पाझर तलावाकडे गेले होते. तेथे त्यांना आमराईमध्ये झाडांवर बसलेले मोर दिसले. सगळा परिसर हिरवागार दिसत होता. त्यांना तिन वर्षापूर्वीचा देवीचा डोंगर आठवला, किती उजाड होता हा परिसर तेव्हा. विचार करत करत ते पाझर तलावापाशी आले. त्या तलावाला आता छान घाटही बांधण्यात आला होता. तलावामध्ये निरनिराळ्या प्रकारचे मासे सोडण्यांत आले होते. तसेच अलिबाग आणि मुंबईहून खास कमळाचे गड्डे आणून या तलावात सोडले होते. तलावाचा पृष्टभाग लाल, पांढऱ्या आणि सहसा न आढळणाऱ्या नीळया कमळांनी भरून गेला होता. तलावाच्या पाण्यामध्ये १५-२० बदकेही डुंबताना दिसत होती. या सर्व प्रसन्न करणाऱ्या वातावरणाने त्यांचे मन एकदम प्रफुल्लीत झाले. तलावाच्या पायऱ्या उतरून त्यांनी प्रत्येक प्रकारची पांच पांच कमळे काढली आणि ते सोमजाईला, मारुतीला वहाण्याकरिता सोमजाई मंदिराकडे निघाले. तेथे सरपंच त्यांची वाटच बघत होते. दोघांनीही परत मंदिरात जाऊन देवीला कमल पुष्पे वाहिली.

*************

रात्रीचे नऊ वाजले होते. गोविंदरावांचे नुकतेच जेवण झाले होते. जेवण झाल्यावर आत्ता ते अंगणात शतपावली करीत होते. शतपावली करताना त्यांचे लक्ष देवीच्या डोंगराकडे गेले. देवीचा डोंगर आणि डोंगरावर जाण्याचा रस्ता पथ दिव्यांनी उजळून गेलेला दिसत होता. दोन दिवसांनी अक्षय तृतीयेला वृक्ष मंदिर प्रकल्प सुरु केल्याला तिन वर्ष पूर्ण होणार होती. तिन वर्षापूर्वी केलेला संकल्प

समोर पथदिव्यांच्या माळेच्या रुपाने साकार झाल्याचे जाणवत होते. शतपावली करताना त्यांच्या डोळयासमोर तिन वर्षांपूर्वीच्या देवीच्या डोंगराचे स्वरुप आले. आताच्या समोर दिसणाऱ्या चित्राशी तुलना करता त्यांच्या मनाला समाधान झाले. आता थोड्याच वेळात त्यांच्या घरी श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थानच्या विश्वस्त मंडळाची बैठक होणार होती. दोन दिवसांनी होणाऱ्या संस्थानच्या तृतिय वर्धावनदिनाच्या कार्यक्रमा संबंधी चर्चा करण्याकरीता सगळे आज येथे जमणार होते.

साडेनऊ वाजेपर्यंत सर्व विश्वस्त गोविंदरावांच्या माजघरांत जमा झाले. आतापर्यंतच्या प्रथेप्रमाणे बैठकीची सुरवात सोमजाईच्या प्रार्थनेने करण्यांत आला. सर्वप्रथम गोविंदरावांनी सर्व विश्वस्थाचे आपल्या घरी स्वागत केले. ते म्हणाले तिनवर्षांपूर्वी आपण एक संकल्प केला. त्या संकल्पाची बहुतांश पूर्ती गेल्या तिन वर्षांत आपल्या सर्वांच्या सहकार्याने झाली आहे असे मला वाटते. त्याबद्दल आपणा सर्वांचे अभिनंदन. यापुढेही आपण आई सोमजाईच्या आशिर्वादाने उरलेले कार्य पूर्ण करुयात.

माझ्याकडे असलेल्या ताम्रपटामधील मजकूराप्रमाणे आपण देवीच्या भक्तांचे कल्याण व्हावे या उद्देशाने वृक्ष मंदिराचे काम चालवले आहे. आपण केलेल्या या प्रयोगाचा साईड इफेक्ट काय झालाय हे आपल्या लक्षांत आले आहे का ते मला माहित नाही. परंतु आमच्या परसातल्या विहिरीला यंदा या चैत्र महिन्यांतदेखील भरपुर पाणी आहे. या शिवाय गावात आता निरनिराळया पक्षांचे दर्शन व्हायला लागले आहे. गेल्या काही वर्षांत मी कोकीळेचा आवाज आपल्या गावात ऐकला नव्हता तो यंदापासून ऐकायला येतो आहे. गोविंदरावांनी प्रदिर्घ प्रस्तावना केली.

आपले म्हणणे बरोबर आहे गोविंदराव! गावातल्या विहिरींच्या पाण्याच्या पातळीत गेले दोन वर्षात झालेली वाढ मलाही जाणवली आहे. त्यामुळे गावातही थोडीफार हिरवळ आता दिसायला लागली आहे. हंबीरराव म्हणाले.

पण हा आपला प्रयोग आपण विस्तारला पाहिजे. आजुबाजुच्या गावांना वाड्यांना अशाप्रकारचा प्रयोग करायला आपण प्रोत्साहन दिले पाहिजे. शेळके गुरुजी म्हणाले.

बरोबर आहे गुरुजी तुमचे. “जे जे आपणासी ठावे। ते दुसऱ्यासी सांगावे। शहाणे करुनी सोडावे। सकल जन।।“असे समर्थांनी म्हटलेच आहे. आपण अक्षय तृतीयेला होणाऱ्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला आजुबाजुच्या ग्रामपंचायत सदस्यांना बोलवुया त्यांना आपला प्रयोग दाखवुया म्हणजे त्यांना आपणही असे काहितरी करायला पाहिजे याची जाणिव होईल. दिनकरराव म्हणाले. परंतु आता आपण त्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरवुयात.

वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून आपण स्टेट बँकेच्या आचार्य मॅडम यांना बोलावुया. त्यांनी आपल्याला खूप सहकार्य केले आहे. शेळके गुरुजी बोलले.

आज मी आपल्या पाझर तलावावर गेलो होतो. तिथले वातावरण पाहून मन खूप प्रसन्न झाले. तेव्हाच मला एक कल्पना सुचली. आपण या सरोवराला काहितरी चांगले नांव द्यायला हवे. कोणाला काही सुचत असल्यास सांगावे. शेळके गुरुजींनी नामकरणाचा प्रस्ताव ठेवला.

या बाबतित मला एक वेगळीच गोष्ट सांगायची आहे. हंबीरराव म्हणाले. कोणती गोष्ट? त्याचा या पाझर तलावाशी काय संबंध? गणेशने विचारले.

सांगतो! सगळे सांगतो! आपल्याला सगळयांना माहित आहे आपण वृक्ष मंदिराचा प्रकल्प करण्याचे ठरवित होतो. पण आपली गाडी अडकत होती एकाच ठिकाणी! आपण सगळे म्हणत होतो, सगळे सोंग आणता येईल पण पैशाचे सोंग

आणता येणार नाही! त्यावेळी आपल्या पाठीशी उभा राहिला एक दानशूर माणूस. त्या माणसाने आपल्या या प्रकल्पाला एकुण अठरा लाख रुपये अर्थसहाय्य केले आहे.

त्या व्यक्तीची एकच अट होती ती म्हणजे त्या व्यक्तीचे नांव गुप्त ठेवायचे. परंतु आजच मी त्या व्यक्तीला मनवण्यांत यशस्वी झालो आहे. त्यांना दिलेल्या गुप्ततेच्या वचनातून त्यांनी आज मला मुक्त केले आहे. त्यांनी या प्रकल्पाला अर्थसहाय्य करताना अशी कल्पना केली होती की हा प्रकल्प म्हणजे त्यांच्या जवळच्या नातेवाईकांचे ते एक स्मारकच आहे. तेव्हा त्या व्यक्तीच्या जवळच्या त्या नातेवाईकाचे नांवच आपण त्या पाझर तलावाला देऊया. सरपंचांनी गौप्यस्पोट केला.

पण काका तुम्हीतर अर्थसहाय्य करणारी एक संस्था आहे असे सांगितले होतेत. गणेशने आपली शंका उपस्थित केली.

तुझे म्हणणे बरोबर आहे गणेश पण त्या व्यक्तीची तशी अटच होती. मग मी आयत्यावेळी एक खोटी संस्था उत्पन्न केली झाले. हंबीररावांनी स्पष्टीकरण दिले.

पण काका अजुनही आपण त्या दानशूर व्यक्तीचे नांव काही सांगितले नाही. हेमंतने विचारले.

बरोबर आहे, अहो हंबीरराव! सगळे सांगितलेत पण त्या दानशूर व्यक्तीचे नांव अजुनही आपण सांगितले नाही! गोविंदरावांनी उत्सुकतेने विचारले.

सांगतो ती व्यक्ती आपल्या सगळयांच्या परिचयाची आहे. आपल्या सर्व नियोजनात त्यांचाही सक्रीय सहभाग होता. हंबीरराव बोलले.

म्हणजे? कोणऽऽ महाराज? पण त्यांच्याकडे एवढी रक्कम कशी काय? हेरंबने आश्चर्याने विचारले.

बरोबर आहे! महाराजच त्यांनीच आपल्या या प्रकल्पाला एक रकमी अठरा लाख रुपये दिले आहेत. त्यांचा इतिहास फार मोठा आहे. त्यांनी त्यांच्या गत आयुष्यात फार मोठा आघात सोसला आहे. असे म्हणून त्यांनी महाराजांचा सर्व इतिहास सगळयांना सांगितला.

हंबीररावांनी सांगितलेला महाराजांचा इतिहास ऐकून सगळेच हळहळले. इतका मोठा आघात सोसूनही महाराजांनी गावाच्या कल्याणासाठी जे कष्ट घेतले त्याचे ऋण फेडता येणे शक्य नाही हे प्रत्येकाला मनांतून जाणवले. हे सर्व ऐकून प्रत्येकाचाच मुड एकदम बदलून गेला.

पण आपला पाझर तलावाला काय नांव द्यायचे हे राहुनच गेले. शेळके गुरुजींनी सगळयांना परत जमिनीवर आणले.

महाराजांच्या वडिलांचे नांव होते सोमनाथ आणि गावाचे नांव होते जाई. महाराजांची इच्छा आपल्या गावाचे आणि गावकऱ्यांचे एकत्रीत स्मारक व्हावे ही होती. तेव्हा आपण त्या तलावाचे नांव **“सोमजाई स्मृती सागर”** असे ठेवुया. हंबीररावांनी आपली इच्छा व्यक्त केली.

या नावाला माझे अनुमोदन आहे! हेरंबने अनुमोदन दिले. सर्वानुमताने सोमजाई स्मृती सागर हे नांव कायम करण्यांत आले.

शेळके गुरुजींनी हेमंतला कोल्हापुरला जाणाऱ्या गाडीबरोबर जाऊन अशा मजकुराचा फ्लेक्स बोर्ड उद्याच तयार करून आणायला सांगितले. हेमंतने ते लगेचच मान्य केले.

वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात आपण महाराजांची जाहिर कृतज्ञता व्यक्त करुया आणि त्यांचा श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थान तर्फे सत्कारही करुया. गोविंदरावांनी अध्यक्ष म्हणून आपले मत व्यक्त केले त्याला सर्वांनी एकमुखी मान्यता दिली.

पण सत्कार कोणाच्या हस्ते करायचा? जितूने विचारले.

आपण स्टेट बँकेच्या मॅनेजर आचार्य मॅडम यांच्या हस्ते  महाराजांचा सत्कार करावा असे मला वाटते. दिनकररावांनी सूचवले.

यावर माझी अशी सूचना आहे की, आपण हा सत्कार आपल्या संस्थेतर्फे कृतज्ञता म्हणून करणार आहोत तेव्हा तो संस्थेच्या अध्यक्षांच्या म्हणजेच गोविंदरावांच्या हस्त व्हावा. शेळके गुरुजींनी आपला प्रस्ताव मांडला त्याला सर्वांनी संमती दिली.

वर्धापन दिनाची आजुबाजुच्या गावामध्ये जाऊन निमंत्रण देण्याची जबाबदारी जितूवर सोपवण्यांत आली. ती त्याने मान्य केली. परंतु स्टेट बँकेच्या मॅनेजर आचार्य मॅडम यांना प्रमुख पाहुण्या म्हणून बोलावण्याची जबाबदारी हंबिररावांनी स्विकारावी असे मात्र त्याने सुचविले. सरपंचांनीही ते लगेचच मान्य केले आणि उद्याच बँकेत जाऊन ते काम करीन असेही सांगितले.

आता वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाची रुपरेषा आपण ठरवुया. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन हेमंत करेल. प्रास्ताविक हंबीरराव करतील. आतापर्यंत झालेल्या कामाचा आढावा दिनकरराव घेतील. संस्थानच्या भावी योजनां संबंधी शेळके गुरुजी सांगतील आणि समारोप करतील. गोविंदरावांनी सुचवले आणि त्याला सर्वांनी मान्यता दिली. त्यानंतर चहापान होऊन आजची बैठक समाप्त झाली.

***************

# १९

सोमजाई मंदिराच्या भव्य प्रांगणात श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थानच्या कार्यालयाला लागूनच असलेल्या व्यासपीठावर खुर्च्या मांडण्यात आल्या होत्या. खुर्च्यांच्या पाठीमागे उच्चासनावर श्री सोमजाईचा मोठा फोटो ठेवलेला होता. त्याला वृक्ष मंदिरातीलच फुलांचा हार घातला होता. हे व्यासपीठ गेल्याच वर्षी बांधण्यात आले होते. एरवी याचा उपयोग कोल्हापुरला पाठवायच्या मालाचे पॅकींग आणि सॉर्टींग करण्याकरिता केला जायचा. व्यासपीठाच्या समोरच्या बऱ्याच भागावर आता सावल्या आलेल्या होत्या. तिन वर्षांपूर्वी लावलेल्या झाडांनी आता सावली द्यायला सुरवात केली होती. तरीही व्यासपीठासह त्याच्या समोरच्या भागावर हिरव्या जाळीची शेड तयार करण्यांत आली होती.

व्यासपीठावरील खुर्च्यांवर महाराज, श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थानचे सर्व पदाधिकारी बसले आहेत. याशिवाय स्टेट बँक ऑफ इंडीचाच्या शाखा व्यवस्थापक आचार्य मॅडम आणि शेजारच्या पाच गावांमधील सरपंच तसेच ग्राम पंचायत सदस्य बसले आहेत. व्यासपीठाच्या मागे श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थानचा तिसरा वर्धापन दिन असा मजकूर असलेला रंगित फ्लेक्स बोर्ड लावलेला आहे. व्यासपीठासमोरील मैदान सोमजाईच्या सक्रीय भक्तांनी भरलेले आहे. आम्ही करून दाखवले याचा सार्थ अभिमान प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आत्ता दिसत होता.

बरोबर साडेतीन वाजता सर्व अपेक्षीत पाहूणे उपस्थित झाले आहेत याची खात्री झाल्यावर हेमंतने माईक आपल्या हातात घेऊन सगळया देवीभक्तांचे हार्दिक स्वागत केले. व्यासपीठावर बसलेले आमच्या संस्थानचे सर्व पदाधिकारी, आमचे आवडते काका म्हणजेच महाराज, आजच्या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या आचार्य

मॅडम, सर्व गावांचे सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य या सर्वांचे श्री सोमजाई वृक्ष मंदिर संस्थानतर्फे मी हार्दिक स्वागत करतो. आपल्याला माहितच आहे की तिनवर्षांपूर्वी या देवीच्या डोंगराची काय अवस्था होती. आई सोमजाईच्या आशिर्वादाने आणि तिच्या भक्तांच्या सक्रीय सहभागामुळे तिन वर्षात आपली संस्था हा कायापालट करु शकली. आता आपण प्रथम शेळके गुरुजींच्या हस्ते आपल्या महाराजांचे या कार्यक्रमात पुष्पगुच्छ देऊन स्वागत करुया. त्यानंतर आजच्या प्रमुख पाहुण्या आचार्य मॅडम यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत आमच्या राधाकाकु करतील. त्याचप्रमाणे सर्व सरपंचांचे स्वागत हंबीरराव काका करतील. ग्रामपंचायत सदस्यांचे स्वागत आमचे दिनकरकाका करतील. अशा प्रकारे सर्वांचे स्वागत करून झाल्यावर हेमंतने हंबीररावांना आजच्या कार्यक्रमाचे प्रास्तावीक करण्याची विनंती केली.

हंबीररावांनी सर्वांना नमस्कार करून आजच्या कार्यक्रमाचे प्रयोजन सांगण्यास सुरवात केली. ते म्हणाले, तिन वर्षांपूर्वीच्या अक्षय तृतीयेच्या दिवशी स्वाध्याय केंद्रातर्फे गुजराथमध्ये चालु असलेल्या वृक्ष मंदिराच्या कल्पनेने प्रभावित होऊन आपण या सोमजाईच्या डोंगरावर तशाच प्रकारचे परंतु आपल्या संस्कृतीला रुचेल असे वृक्ष मंदिर उभे करण्याचा संकल्प केला. त्या संकल्पाला आई सोमजाईचा आशिर्वाद तर होताच. शिवाय अशा एका व्यक्तीचा भक्कम आणि सक्रिय पाठींबा होता, की ज्यांनी या प्रकल्पाच्या कार्यात प्रत्यक्ष अंगमेहेनत तर केलीच परंतु या संकल्पनेच्या नियोजनातदेखील सहभाग दिला. ती व्यक्ती एवढ्यावरच थांबली नाही तर संस्थानला त्यांनी भक्कम आर्थिक पाठबळही दिले आहे.

गेल्या तिन वर्षात त्यांनी संस्थानला एकुण अठरा लाख रुपयांची रोख मदत केली आहे. त्यांनी घातलेल्या बंधनामुळे मी यापूर्वी त्यांचे नांव जाहिर करु शकलो नाही. ती व्यक्ती आज आपल्या मध्ये बसली आहे. आपली म्हण आहे वेश असावा बावळा परी अंतरी नाना कळा. तशी परिस्थिती आपली झाली होती. साधा लेंगा

शर्ट आणि टोपी असा वेश असलेले महाराज म्हणजे ती व्यक्ती आहे. हे जाहिर करायला मला खूप आनंद होत आहे. मगाशी हेमंतने सांगितल्याप्रमाणे या डोंगराचा खरोखरच काय पालट झाला आहे. त्याचे फार मोठे श्रेय आपल्या या प्रकल्पाचे प्रेरणास्थान श्री महाराज यांच्याकडे जाते.

अशा या आपल्या महाराजांच्या या ऋणांतून आम्ही उतराई होऊ इच्छीत नाही. परंतु त्यांचा आदर सत्कार करण्याची संधी आम्ही घेऊ इच्छीतो. मी आपल्या संस्थानचे अध्यक्ष श्री गोविंदराव जोशी यांना विनंती करतो की त्यांनी महाराजांचा शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार करावा. मी या ठिकाणी विशेष उल्लेख करतो की हे श्रीफळ याच वृक्ष मंदिरातील कल्पवृक्षाला आलेले आहे. पहिली पाच फळे आपण सोमजाईला अर्पण केली. त्यानंतरच्या सहाव्या फळाने आपण आज महाराजांचा सत्कार करीत आहोत.

त्यानंतर गोविंदराव आपल्या जागेवरून उठले महाराजांच्या जवळ जाऊन त्यांना शाल पांघरली. त्यानंतर हातात पुष्पगुच्छ आणि श्रीफळही दिले. दोघांचेही मन भरून आले होते. त्यामुळे महाराजांनीही काही न बोलता सगळयांना हाताने नमस्कार करून आपल्या जागेवर बसले.

त्यानंतर परत हंबीरराव उभे राहिले त्यांनी आपले बोलणे पुढे चालू केले. आता आम्ही अशा व्यक्तीचा सत्कार करणार आहोत ती व्यक्ती आपल्या संस्थानची मार्गदर्शक आहे. त्यांनी आम्हाला आपले बहूमोल मार्गदर्शन दिले नसते तर हा प्रकल्प भरकटत राहिला असता. असे ते आमचे मार्गदर्शक श्री मारुती माने रिटायर्ड फॉरेस्टर यांचा शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार करतील शेळके गुरुजी.

माने साहेबांचा सत्कार झाल्यानंतर हेरंबने दिनकररावांना झालेल्या कामाचा आढावा घेण्याची सूचना केली. दिनकररावांनी देवीच्या डोंगराची तिन वर्षांपूर्वीची स्थिती विशद केली. त्यानंतर त्यांनी तिन वर्षापुर्वी केलेल्या संकल्पाची सर्वांना आठवण करून दिली. त्या संकल्पापैकी आपला पाझर तलाव सध्या भरपुर भरलेला

आहे. सोलर आणि पवनचक्की यांच्या सहाय्याने आपण त्यावर मोटर बसवुन पाझर तलावातील पाणी आपण पूर्ण डोंगरावर पाईपलाईनने फिरवले आहे. आपण पहात आहाच देवीला यायच्या रस्त्याच्या दुतर्फा आणि देवीमंदिर परिसरात आपण या उपलब्ध झालेल्या उर्जेच्या सहाय्याने पथदिवे लावले आहेत. देवीचे मंदिर, संस्थानचे ऑफिस प्रसाद बनविण्याचे पाकगृह येथेही आपण या उर्जेचा वापर केला आहे. संपुर्ण देवीचा डोंगर आज आपण हिरवागार केलेला आहे. जवळपास आठ हजार झाडे आपण या डोंगरावर लावली आहेत. या सर्वाचा परिणाम म्हणून हनुमान वाडीतील विहिरींच्या पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. आज आपले संस्थान आपला दररोजचा खर्च भागवुन चार पैसे शिल्लक टाकायच्या परिस्थितीत आले आहे. आपल्या उत्पादनांचा टेंपो दररोज कोल्हापुर बाजारात जात असतो. हा आहे आपल्या एकजुटीचा, आई सोमजाईच्या भक्तीचा आणि श्रमशक्तीचा प्रभाव.

यानंतर आजच्या आपल्या प्रमुख पाहुण्या स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या शाखा व्यवस्थापक आचार्य मॅडम आपल्याला मार्गदर्शन करतील. हेमंतने जाहिर केले आणि मॅडम बसल्या होत्या तिथे त्यांना बोलायला माईक नेऊन दिला.

आई सोमजाईच्या सर्व भक्तांना माझा दंडवत. आतापर्यंत मी आपल्या संस्थानबद्दल बरेच काही ऐकले होते. व्यासपीठावर येण्यापूर्वी देवीच्या डोंगराचा सर्व परिसर मी फिरून आले. तीन वर्षापूर्वीही मी नवरात्रीमध्ये आई सोमजाईच्या दर्शनाला आले होते. तीन वर्षापुर्वीचा देवीचा डोंगर आणि आज मी पहात असलेला डोंगर याची तुलना मी स्वर्ग आणि पाताळ या कल्पनेशी करीन. खरोखरच नितांत रमणीय असे हे स्थळ आपण बनविले आहे. विशेषत: आपण पाझर तलावाला ज्या पद्धतीने सजवले आहे ते पाहून आपल्या रसिकतेची दाद द्यावीशी वाटते. भविष्यात हे स्थळ पर्यटन स्थळ म्हणून नावारुपाला येईल यात संशय नाही. इथला प्रयोग बघायला गावोगावाहून लोक येतील याची मला खात्री आहे. अशाप्रकारची देवीची

सेवा केल्यावर ती का प्रसन्न होणार नाही? अर्थात होणारचं! तिचा पूर्ण आशिर्वाद आपणा सर्वांच्या पाठीशी राहिल असे मला वाटते.

आता मी थोडेसे वेगळ्या विषयावर बोलणार आहे. आताच आपल्या संस्थान तर्फे ज्यांचा सत्कार केला, त्यांच्याबद्दल त्यांची परवानगी न घेता मी चार गोष्टी सांगणार आहे. कारण त्यांना परवानगी विचारली तर ते ती कधीही देणार नाहीत याची मला खात्री आहे. आपण ज्यांना महाराज म्हणता ते एक मोठे बँक ऑफिसर आहेत. माझ्या बँकेतल्या नोकरीची सुरवात मी त्यांच्या हाताखाली काम करून केली आहे. खेडसारख्या मोठ्या शहरातील स्टेट बँकेच्या शाखेचे ते मॅनेजर होते. त्यांच्या कुटुंबावर आणि त्यांच्या गावावर येऊन कोसळलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे त्यांनी ही फकिरी पत्करली आहे. त्याच्या आताच्या रुपावरून त्यांची जर पारख कराल तर फसाल. मी पाहिलेले आमचे हे साहेब नेहमी कडक इस्त्रीमध्ये आणि सुटा बुटात असत. त्यांच्या प्रभावी व्यक्तीमत्वाला भले भले घाबरत असत. परवा ते बँकेत आले तेव्हा मीदेखील प्रथम ओळखले नाही. त्यांनी मलाही त्यांची खरी ओळख प्रकट करण्यास बंदी घातली आहे. परंतु आता सरपंच हंबीररावांनी त्यांची जाहिर ओळख करून दिली म्हणून मी बोलण्याचे धाडस केले आहे.

मला आपल्या या वर्धानपन दिनाच्या कार्यक्रमाला बोलावुन एक वेगळीच अनुभूती घेण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद देऊन मी माझे चार शब्द पूर्ण करते.

आता मी आमच्या काकांना म्हणजेच महाराजांना आम्हाला मार्गदर्शन करायला सांगणार आहे. आमच्या चौघा मित्रांकरीता हे काका परिसासारखेच आहेत. त्यांच्या पवित्र स्पर्शाने आमच्यात जाग्या होणाऱ्या वाल्याला त्यांनी माणसात आणले. आम्हाला सन्मानाने जगण्याची संधी दिली. ते जर आमच्या गावात आले नसते तर आमचे काय झाले असते ही कल्पनाच आता आम्हाला हवालदिल करते. मी आता आपल्या महाराजांना आम्हाला मार्गदर्शन करण्याची विनंती करतो. असे म्हणून हेमंतने आपल्या हातातला माईक महाराजांकडे दिला.

माझ्या सोमजाई आईच्या भगतांनो आपल्याला माझा दंडवत. आपण केलेल्या भगतगिरीने सगळयांनाच थक्क करून सोडले आहे. तुम्ही किमयागार आहात. अक्षरश: शून्यातून हे हिरवे वैभव आपण उभे केले आहे. याबद्दल आपल्या सर्वांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. परंतु आता खरा धोका निर्माण होणार आहे. या केलेल्या कामाचा अहंकार आता निर्माण होऊ शकतो. तेव्हा त्या पासून सावधान रहा. आता आपला सर्वांचा कसोटीचा काळ सुरु होणार आहे. जे निर्माण केले आहे ते टिकवणे महत्वाचे आहे. नाहीतर मागच्या पिढीमध्येदेखील हे वैभव येथे उभे होतेच. पण आपणच त्याला भस्म केले होते. आता आपल्याला हे उभारण्याकरिता लागलेल्या कष्टाची जाण आहे. म्हणूनच ते कोणीही ओरबाडून नेणार नाही याची दक्षता घ्या.

त्याहुनही महत्वाचे म्हणजे तुम्ही आता जागे झाला आहात. पण तुमच्या शेजाऱ्यांचे काय? तुम्ही पोहायला शिकलात तर तुमचे हे कर्तव्य आहे की जो निसर्गाचा ऱ्हास करून स्वत:बरोबर दुसऱ्यालाही बुडवितो आहे. त्याला बुडू न देता तारले पाहिजे. समर्थांनी म्हटलेच आहे,

आपण येथेष्ट जेवणें| उरलें तें अन्न वाटणें |

परंतु वाया दवडणें| हा धर्म नव्हे ||

तैसें ज्ञानें तृप्त व्हावें| तेंचि ज्ञान जनास सांगावें |

तरतेन बुडों नेदावें| बुडतयासी ||

उत्तम गुण स्वयें घ्यावे| ते बहुतांस सांगावे |

वर्तल्याविण बोलावे| ते शब्द मिथ्या ||

आपण पोटभरून जेवल्यावर जर काही उरले तर ते दुसऱ्यांना वाटावे. माज आल्यासारखे ते वाया घालवु नये. आता तुम्हाला एक चांगला मार्ग सापडला आहे. आता तुमची जबाबदारी वाढली आहे. जे पथभ्रष्ट झाले आहेत त्यांना योग्य मार्गावर आणायचे काम आता तुम्हाला करायचे आहे. तेव्हा हा प्रयोग इतरांनाही दाखवा त्यातील फायदे त्यांना समजाऊन सांगा. त्यांना या मार्गानी जाण्यास मदत करा. म्हणजे सोमजाईचा प्रसाद सर्वांनाच मिळेल.

असो. आता उपदेश पुरा करतो. आता माझी ओळख आपल्याला झाली आहेच. तेव्हा त्याबद्दल मी काही बोलत नाही. मी या प्रकल्पाकरिता जो निधी दिला त्यातला एकही पैसा मी माझ्या कष्टाने मिळविलेला नाही. तो पैसा समाजाचा होता तो मी या निमित्ताने समाजाला परत केला आहे इतकेच. आपण काही वर्षांपूर्वी पेपरमध्ये वाचले असेल रायगड जिल्ह्यामध्ये जाई नावाचे एक गाव होते ते निसर्गाच्या एका तडाख्यात जगाच्या नकाशावरून पुसले गेले. ते गाव माझे होते. त्याची भरपाई म्हणून मला सरकारने जी काही रक्कम दिली होती ती रक्कम मी या ठिकाणी सोमजाईच्या चरणी अर्पण केली इतकेच.

सज्जनगडावरून मी काही निश्चय करून निघालो होतो. त्या निश्चयालाच आपल्या गावाने गेले काही दिवस मायेच्या जाळयात अडकवले आहे. ते जाळे तोडायचा मी अनेक वेळा प्रयत्न केला परंतु तो अयशस्वी ठरला. परंतु आज मला एक समाधान आहे, जो यज्ञ आपण येथे केलात त्यात मलाही चार समिधा टाकायची संधी मिळाली. परंतु आता आपण मला नारळ दिला आहे त्याने मला समाधान वाटले. आपल्या संस्कृतीत नारळ देण्याला एक वेगळा अर्थ आहे. मी आपल्याला आई सोमजाईच्या साक्षीने जो शब्द दिला होता त्यातून मी आता मुक्त झालो आहे. वृक्ष मंदिराचा हा प्रकल्प आता मार्गी लागला आहे. तेव्हा आपण मला आता निरोप द्यावा ही विनंती आहे. आई सोमजाईला प्रणिपात करून मी आपली रजा घेतो. रजा घेताना प्रार्थना करतो.

सर्वेपि सुखिन: सन्तु सर्वे सन्तु निरामय:।

सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित दु:ख माप्नुयाSSत् ।।

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

महाराजांचे बोलणे संपल्यावर हेमंतने लगेचच कार्यक्रमाचे सूत्र आपल्या हातात घेतले. आजच्या कार्यक्रमाचा समारोप करण्यापूर्वी आपल्याला एक महत्वाचे काम करायचे आहे. आता आपण आपल्या पाझर तलावाचे नामकरण करणार आहोत. मी आपल्या संस्थानचे अध्यक्ष श्री गोविंदकाका जोशी यांना विनंती करतो की आपण व्यासपीठावरच ठेवलेल्या फलकाचे अनावरण करून नांव जाहिर करावे. असे बोलून हेमंतने गोविंदराव काकांना फलकाचे अनावरण करण्यासाठी त्या फलकापर्यंत नेले.

त्यानंतर गोविंदरावांनी भगव्या कापडामध्ये ठेवलेल्या फलकाचे अनावरण केले आणि माईकवरून नांव वाचून दाखवले. ते म्हणाले आपण आपला तलावाचे **“सोमजाई स्मृती सागर”** असे नामकरण केले आहे. या नावातील रहस्य महाराजांच्या लगेचच लक्षांत आले. ते नांव ऐकून त्यांच्या मनाला समाधान वाटले.

आता आजच्या कार्यक्रमाचा समारोप आपले शेळके गुरुजी करतील. असे म्हणून हेमंतने आपल्या हातातला माईक गुरुजींकडे दिला.

शेळके गुरुजींनी समारोप करताना सांगितले. आताच आपल्याला महाराजांनी सांगितल्याप्रमाणे आमचे पोट आता जरी भरलेले आहे. तरी या झालेल्या कामाने संतोष न मानता आम्ही या संस्थानचे कार्य चालूच ठेवणार आहोत. संस्थानतर्फे आम्ही एक रोपवाटीका तयार करतोय. त्या रोपवाटीकेमध्ये तयार होणारी रोपे आम्ही गावागावात जाऊन पोचवणार आहोत. तेथील सेवाभावी व्यक्तींच्या किंवा संस्थांच्या मार्फत त्या रोपांची लागवड आणि त्यांची देखभाल करण्याची व्यवस्था करून वृक्ष मंदिराची ही संकल्पना जास्तीत जास्त गावात पोचवण्याची

मोहिम राबवणार आहोत. जेणे करून सर्वत्र पर्यावरणाचा ऱ्हास न होता पर्यावरण समृद्धीच होईल.

आता माझी सर्वांना विनंती आहे की सगळयांनी प्रसाद घेऊनच आपल्या घरी जायचे आहे. आता मी आपला आजचा कार्यक्रम समाप्त झाल्याचे जाहिर करतो. आता लगेचच आधी आई सोमजाईची आरती होईल. नंतर प्रसाद वाटपाला सुरवात होईल.

***********

अक्षयतृतीयेचा दुसऱ्या दिवशी मोरांच्या केकांनीच महाराजांना जाग आली. देवळातले घड्याळ पहाटेचे तीन वाजल्याचे दाखवत होते. महाराजांनी आपले प्रातर्विधी आवरले. स्नान झाल्यानंतर प्रात:स्मरण करून त्यांनी देवीची मनोभावे पूजा केली. काल सत्कारामध्ये मिळालेला नारळ देवीपुढे ठेवला. ते सध्या रहात असलेल्या संस्थानच्या ऑफिस जवळील खोलीतील आपली झोळी उचलली. झोळीमध्ये दैनंदिन पारायणची दासबोधाची छोटी प्रत आणि रोजचे कपडे या व्यतिरिक्त काही नाही याची खात्री केली. त्यामध्ये असलेली शाल काढून देवीच्या पायाजवळ ठेवली. देवीला मनोभावे सर्वांच्या कल्याणाचे साकडे घातले. देवीचा निरोप घेऊन ते परत न येण्यासाठी निघाले. त्यांचा इथला ऋणानुबंध आता त्यांच्या दृष्टीने संपला होता.

आता ते कुठे जाणार होते हे त्यांनाही माहित नव्हते. फक्त त्यांना या स्थानापासून जास्तीत जास्त लांब जिथे त्यांना कोणी ओळखत नाही अशा ठिकाणी जायचे होते. त्यांना आपली ओळख पुसून टाकायची होती. त्यांना फक्त एवढेच माहित होते. आपण एक प्रतिज्ञा केली आहे. कोणाच्या घरी रहायचे नाही. जिथे जायचे तिथे रामदासी भिक्षेकरी म्हणूनच जायचे. जे अन्न मिळेल त्याच्या बदली

अन्नदात्याचे कल्याण चिंतायचे. त्या अन्नदात्याकडे नैसर्गिक आपत्ती येऊ नये म्हणून सर्वतोपरी प्रयत्न करायचे.

**************

दोन दिवसांनी औरंगाबाद जिल्ह्यातील चिखली नावाच्या दुष्काळी गावात दुपारच्या वेळेला भर उन्हात एका भिक्षेकऱ्याची आरोळी ऐकु आली.

शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे । वसिष्टापरी ज्ञान योगेश्वराचे ।।

कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा । नमस्कार माझा सद्‌गुरु रामदासा ।।

जSय जSSय रघुवीSर समर्थ।।

माई भिक्षा वाढा!! असा खणखणित पुकारा करीत तो दारात उभा राहिला होता. स्वच्छ पांढरा लेंगा, त्यावर स्वच्छ पांढरा नेहरु शर्ट, डोक्यावर स्वच्छ पांढरी टोपी, काखेत शबनम सारखी पिशवी अडकवलेल्या त्या भिक्षेकऱ्याने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. साधारण पन्नास वयाचा वाटणारा तो भिक्षेकरी चेहऱ्यावरून तरी चांगल्या सुखवस्तु घरातला वाटत होता. जरी त्याची दाढी वाढलेली होती तरी ती अस्ताव्यस्त दिसत नव्हती. अशा व्यक्तिमत्वाचा माणूस भिक्षा मागतोय हे पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटत होते.

***********

## समाप्त

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.